सेवा परमो धर्मः

# शिवराज २०१६

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज

## शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय

## संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय

गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

नॅक पुनर्मूल्यांकन 'ब' श्रेणी



# भावपूर्ण श्रध्दांजली





डॉ. एपीजे अब्दूल कलाम





कवी मंगेश पाडगांवकर

महाराष्ट्रामध्ये पडलेल्या महाभयानक दुष्काळाचे बळी पडलेल्या शेतकऱ्यांना ,
भारत मातेचे रक्षण करताना शहीद झालेल्या जवानांना आणि समाजामध्ये सामाजिक,
राजकीय, शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम केलेले परंतु ते आज या जगामध्ये अस्तित्वात नाहीत
अशा सर्वांना शिवराज परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली....

शिवराज २०१६




# कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे



शिक्षक आमदार श्री. दत्तात्रय सावंत यांचे
स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष
प्रा. किसनराव कुराडे

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे नूतन कुलगुरू
डॉ. देवानंद शिंदे यांचा सत्कार करताना
संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे





शिक्षण सहसंचालक,कोल्हापूर विभाग डॉ. अजय साळी यांनी
महाविद्यालयास भेट दिली त्यावेळी त्यांचे
स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे

मा. श्री. विजय पोवार (प्रशासन अधिकारी
विभागीय सहसंचालक कार्यालय, कोल्हापूर)
यांचे स्वागत करताना प्रा. अनिल कुराडे



कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे

अध्यक्ष



# मा. किसनरावजी कुराडे

# अभिनंदनिय सुयश




कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किसनराव कुराडे यांच्या लेखनीतून साकारलेल्या **सीतायण** या कादंबरीचे प्रकाशन करताना माजी. राष्ट्रपती श्रीमती. प्रतिभाताई पाटील .




ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे वाचनालयाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट साहित्यिकृती (**सीतायण**) पुरस्कार बिहारचे राज्यपाल डॉ. डी.वाय. पाटील यांच्या शुभहस्ते स्वीकारताना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे




**प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे**
**M.Sc.,Ph.D.**



## प्रा. आर.बी. कांबळे एम.ए.,बी.एड.

उपप्राचार्य, संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज



## प्रा. पी.एम. भोईटे एम.एस्सी.,बी.एड.

पर्यवेक्षक, संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज



## श्री. संतोष शहापूरकर एम.ए.

प्रबंधक, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज संचलित

शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय
आणि संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

# शिवराज २०१६

## संपादक मंडळ

**प्रमुख संपादक**



प्रा. अशोक मोरमारे

**अध्यक्ष**



प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे

## संपादन साहाय्य

**विशेष साहाय्य**



प्रा. अनिल कुराडे

**मराठी विभाग**



डॉ. ए. बी. कुंभार

**हिंदी विभाग**



डॉ. एस. बी. माने

**इंग्रजी विभाग**



प्रा. डी.यू. जाधव

**विज्ञान विभाग**



डॉ. एस. के. नेर्ले



डॉ. एम. पी. पाटील



प्रा. आर. डी. कमते

# महाविद्यालयातील विशेष/नाविण्यपूर्ण कार्यक्रम


'हितगुज समारंभ' प्रसंगी मार्गदर्शन करताना
संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे


'हितगुज समारंभ' प्रसंगी मार्गदर्शन करताना
ज्येष्ठ विचारवंत मा.श्री.भाई वैद्य


'हितगुज समारंभ' प्रसंगी मार्गदर्शन करताना
ज्येष्ठ संपादक (दैनिक सकाळ समूह) मा. श्री. उत्तम कांबळे


छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त मार्गदर्शन
करताना मा. जे. बी. बारदेस्कर


छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त मार्गदर्शन
करताना संस्थेचे संचालक मा. जे. वाय बारदेस्कर


छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त मार्गदर्शन
करताना संस्थेचे संचालक ॲड. दिग्विजय कुराडे


समाजवादी प्रबोधिनी, गडहिंग्लज, गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व शिवराज महाविद्यालय
गडहिंग्लज,यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत 'पंचायतराज आणि ग्रामपंचायत
सदस्यांची भूमिका' या विषयावर बोलताना श्री. इंद्रजित देशमुख

## सेवानिवृत्ती


श्री.बाळासाहेब सावंत
आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती निमित्त घेण्यात आलेले कार्यक्रम



व्याख्यान कार्यक्रमाचे उद्घाटन
प्रसंगी दीपप्रज्वलन करताना डॉ. आनंद बल्लाळ



व्याख्यान कार्यक्रमात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार
आणि दलित साहित्य' या विषयावर मार्गदर्शन
करताना डॉ. आनंद बल्लाळ



'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर आधारित भित्ती पत्रकाचे
उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे



'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर आधारित भित्ती पत्रकाच्या
उद्घाटन प्रसंगी उपस्थितीत प्राध्यापक



'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर आधारित ग्रंथ प्रदर्शनाचे
उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे



'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर आधारित पोस्टर प्रदर्शनाचे
निरीक्षण करताना प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे



'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, राजकिय, आर्थिक व शैक्षणिक विचारावर
मार्गदर्शन करताना प्रा. जे. व्ही. सतापे, प्रा. एस. डी. सावंत, प्रा. एन. आर. कोल्हापूरे,
प्रा. सुधीर मुंज, प्रा. आर. पी. हेंडगे व अध्यक्षिय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे .



# विविध समितींमार्फत वर्षभरात राबविलेले कार्यक्रम



'डॉ. बाबासाहेब आंबेडकर'या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. अवधूत माने



मतदान दिनानिमित्त आयोजीत मतदार जनजागृती या विषयावर मार्गदर्शन करताना श्री कुणाल खेमणार




इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा समारंभात मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किसनराव कुराडे




इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा समारंभात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. एस. वाय कोतमिरे




मराठी विभागाच्या वतीने आयोजित 'कवितेच्या गावा जावे' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. चंद्रकांत पोतदार



कर्मवीर वि. रा. शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे विजेते चषकासह



वाचन प्रेरणा दिना निमित्त मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र गुंडे



अग्रणी महाविद्यालय अंतर्गत 'ग्राहक जागरूकता' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. रमेश तिबिले

# विविध समितींमार्फत वर्षभरात राबविलेले कार्यक्रम



न्यायाधिश श्री. संजय देशमुख (वर्ग १) विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन करताना



प्रा. अनिल कुराडे स्वागत समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



युवा महोत्सवात सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक



मराठी राज्य भाषा दिना निमित्त एकत्र जमलेले मराठी भाषेचे विद्यार्थी



वृक्षारोपन संकल्पनेतून कर्मचाऱ्यांना रोपांचे वाटप करताना ॲड. दिग्विजय कुराडे



मराठी राज्य भाषा दिना निमित्त मार्गदर्शन करताना मराठी विभाग प्रमुख प्रा. एल. सी. जोशी



स्वामी विवेकानंद जयंती निमित्त मार्गदर्शन करताना डॉ. एस. डी. पाटील



मराठी राज्य भाषा दिना निमित्त मार्गदर्शन करताना प्रा. अशोक मोरमारे

# अभिनंदनिय सुयश



शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वतीने दिला जाणारा गुणवंत प्रशासकीय कर्मचारी पुरस्कार मा. डॉ. देवानंद शिंदे (कुलगुरू शिवाजी विद्यापीठ) यांच्या हस्ते स्वीकारताना प्रबंधक श्री. संतोष रंगराव शहापूरकर




आविष्कार फाऊंडेशन, चाटे शिक्षण समूह आणि रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मा. चंद्रकांतदादा पाटील (सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य ) यांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ. एल. वाय. कोतमिरे



**श्री. संतोष पाटील**

'शर्यत – द रेस ऑफ लाईफ ' ग्रामीण कथासंग्रह प्रकाशित



**डॉ.संदीप परीट**

इंग्रजी विषयातील पीएच.डी. संपादन



**डॉ. राजेंद्र गुंडे**

मानसशास्त्र विषयातील पीएच. डी संपादन

## आमचे गुणवंत विद्यार्थी



**तेजश्री भुईंबर**

बी. सी. एस.३
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत दुसरी



**पौर्णिमा पाटील**

बी. सी. एस.३
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत सहावी



**प्रियंका कडोलकर**

बी. सी. एस.३
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत सातवी



**बियामा वाटंगी**

बी. कॉम. ३
शिवाजी विद्यापीठात ॲनव्हान्स अकाउंट्सी या विषयात प्रथम

# वरिष्ठ क्रीडा विभाग धवल यश



प्रा. राहूल मगदूम
शारीरिक संचालक



प्रमोद काळे
हॉकी नॅशनल



स्नेहल लगळी
हॉकी नॅशनल



अश्विनी कुरळे
हॉकी नॅशनल



पवन कोकितकर
ॲथलेटिक



अभिजीत कोकाटे
ॲथलेटिक



स्नेहल कांबळे
योगासन



ऐश्वर्या कदम
क्रॉस कंट्री ॲथलेटिक



अमृता वडाम
ॲथलेटिक



कावेरी चव्हाण
हॉकी



आकाश कडुकर
ॲथलेटिक



श्रेयस कुराडे
फेनसिंग



स्वप्निल कुसाळे
* १३ एशियन शुटींग चॅम्पियन शुटींग-
३ गोल्ड, १ सिल्वर,
* ५९ नॅशनल शुटींग चॅम्पियन-
शिप ६ गोल्ड, १ सिल्वर, १ ब्रॉंझ



अतुल पाटील
ॲथलेटिक



तानुबाई चव्हाण
हॉकी



राहुल गुंठे
राज्यस्तरीय ॲथलेटिक



हर्षाली शेवाळे
नॅशनल फुटबॉल खेळाडु



प्रियांका गवळी
नॅशनल फुटबॉल खेळाडू



मालू शेंडे
नॅशनल फुटबॉल खेळाडू



पूजा शिंदे
राज्यस्तरीय ॲथलेटिक



अमित पाटील
क्रॉस कंट्री



आकाश रायकर
राज्यस्तरीय ॲथलेटिक



नितीन कली
फेनसिंग



अमोल जाधव
राज्यस्तरीय ॲथलेटिक



सारीका चिटणीस
क्रिकेट,ॲथलेटिक



दिग्विजय गंभीर
हॉकी



अंकुश पताडे
ॲथलेटिक



रामू गाडीवडर
ॲथलेटिक



शितल दळवी
फूटबॉल खेळाडू

# वरिष्ठ क्रीडा विभाग
## धवल यश



शिवाजी विद्यापीठाची सलग चौथ्या वर्षी विभागीय ॲथॅलेटिक स्पर्धेची चॅम्पियनशिप मिळविलेला महाविद्यालयाचा संघ



शिवाजी विद्यापीठ क्रांस क्रॅन्टी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणारा महाविद्यालयाचा पुरुष संघ



आपल्या महाविद्यालयात आयोजित केलेल्या तलवारबाजी स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला.



शिवाजी विद्यापीठ हॉकी स्पर्धेतील उपविजेता महिला संघ



शिवाजी विद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धेत सलग चौथ्या वर्षी चॅम्पियनशिप मिळविणारा महिला संघ



फुटबॉल दर्शन ट्रॉफी उपविजेता संघ



सन २०१५- २०१६ मध्ये सर्वाधिक प्रभावशाली खेळाडू कु. नम्रता दंडगीदास

# शिवराज २०१६

संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज.

## क्रीडा विभाग धवल यश



तेजाली पाटील
राज्यस्तरीय खेळाडू



ऋतुजा मगदूम
राज्यस्तरीय खेळाडू



नम्रता पाटील
राज्यस्तरीय खेळाडू



प्रा. जयवंत पाटील
क्रीडा विभाग प्रमुख



खेळाडूंचे अभिनंदन करताना अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे
विद्यार्थी– * ऋतूजा अजित मगदूम ८०० मी. धावणे द्वितीय
* प्राजक्ता देसाई – स्केटींग राज्यस्तरीय सहभाग



शालेय सांघिक तालुकास्तरीय स्पर्धेमधील आमच्या महाविद्यालयाचा विजेता संघ

## राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर



प्रा. एम. एस. घस्ती
कार्यक्रम अधिकारी



प्रा. टी. व्ही. चौगुले
कार्यक्रम अधिकारी



प्रा. सौ. एल. एम. डिसोजा
कार्यक्रम अधिकारी







बुगडीकट्टी येथील बंधाऱ्यातील गाळ काढताना एन.एस.एस चे विद्यार्थी

# कलाविष्कार




शुभम चौगुले
बी.कॉम.३



तेजश्री विचारे
बी.एस्सी३

रोहीत कोरे बी. एस्सी ३





शिवराज पाटील
बी. कॉम.१










प्रियदर्शनी माळी
बी.एस्सी.३

## शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

### स्थानिक व्यवस्थापन समिती
### (सन २०१५-१६ पासून)

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. के. व्ही. कुराडे | : अध्यक्ष |
| २) | मा. प्रा. जे. वाय. बारदेस्कर | : संस्था प्रतिनिधी |
| ३) | मा. प्रा. व्ही. बी. कुरळे | : शिक्षक प्रतिनिधी |
| ४) | मा. प्रा. ए. व्ही. कुराडे | : शिक्षक प्रतिनिधी |
| ५) | मा. प्रा. के. बी. केसरकर | : विविध क्षेत्रातील प्रतिनिधी |
| ६) | मा. श्री. आर. जी. येरटे | : विविध क्षेत्रातील प्रतिनिधी |
| ८) | मा. श्री. एस. आर. शहापूरकर | : प्रशासक सेवक प्रतिनिधी (४ जुलै २०१५ पासून) |
| ८) | मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे | : सचिव |

## संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

### शाळा समिती
### (सन २०१५-१६ पासून)

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. के. व्ही. कुराडे | : अध्यक्ष |
| २) | मा. प्राचार्य बी. एम. चांडके | : संस्था प्रतिनिधी |
| ३) | मा. प्रा. जे. वाय. बारदेस्कर | : संस्था प्रतिनिधी |
| ४) | मा. प्रा. ए. व्ही. कुराडे | : संस्था प्रतिनिधी |
| ५) | मा. प्रा. आर. बी. कांबळे | : प्राध्यापक सदस्य |
| ६) | मा. श्री. एस. आर. शहापूरकर | : प्रशासक सेवक प्रतिनिधी |
| ७) | मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे | : सचिव |

## दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक अॅक्ट नियम फॉर्म नं. ४ प्रमाणे निवेदन

**प्रकाशन स्थळ** : शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज (जि. कोल्हापूर)

**प्रकाशन काळ** : वार्षिक

**प्रकाशक** : **प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे**

**राष्ट्रीयत्व** : भारतीय

**पत्ता** : शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर – ४१६ ५०२.

**दूरध्वनी** : ०२३२७ – २२२३०७.

**संपादक** : **प्रा. ए. के. मोरमारे**

**राष्ट्रीयत्व** : भारतीय

**पत्ता** : शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर – ४१६ ५०२.

**दूरध्वनी** : ९४२१३८३६१०.

**मुद्रक** : **अतुल कोलते**

**राष्ट्रीयत्व** : भारतीय

**पत्ता** : श्री सरस्वती ऑफसेट, कडगांव रोड, गडहिंग्लज ४१६ ५०२.

**स्वामित्व** : शिवराज कला वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर – ४१६ ५०२.

**मी प्राचार्य, डॉ. एस. वाय. कोतमिरे असे जाहीर करतो, की वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे सत्य आहे.**

**ह्या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखनाची निवड, संपादन व मुद्रीत शोधन सहसंपादकांनी केले आहे.**

# संपादकीय....



'शिवराज २०१६' हे वार्षिक नियतकालिक आपल्या सर्वांच्या समोर मांडत असताना मला मनस्वी आनंद होत आहे. या नियतकालिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्य मनातील खंत मी व्यक्त करु शकलो याचे मला समाधान आहे.

२३ एप्रिलची दैनिक सकाळमधील 'अभ्यासातील टॉपरकडून आठ घरफोड्या' या मथळयाची बातमी वाचून माझे मन सुन्न झाले. मी बराच वेळ विचार करतच राहिलो. कशासाठी हे धाडस ? फक्त आणि फक्त चैनीसाठी ! इतरांसारखे चंगळवादी जीवन जगायला मिळावे! महागडा मोबाईल, बाईक, उंची कपडे वापरायला मिळावेत म्हणून आई-वडील खस्ता खाऊन कष्ट करुन त्याला कोल्हापूरमध्ये खर्चासाठी पुरेसा पैसा देत असतानाही तो या मार्गाला आलाच कसा ? दहावीमध्ये ९४% टक्के मार्क्स आणि इंग्रजीचे उत्तम ज्ञान असणारा हा विद्यार्थी उद्याचा एक इंजिनिअर, डॉक्टर किंवा एखादा सनदी अधिकारी नक्कीच आहे. पण तो या चुकीच्या मार्गाने वाटचाल करु लागला आहे. तसे म्हणायला गेले तर ही एक उघड झालेली बातमी आहे. उघड न झालेल्या या स्वरुपाच्या या आजच्या तरुणाईच्या कारनाम्याच्या विविध घटना (चोरी, घरफोडी, बलात्कार) घडलेल्या दिसतात. या सर्व गोष्टीचा विचार केला असता ही तरुणाई जगण्याचे संदर्भ कोठे शोधायला लागली आहे ? जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी कोणती आहे? याची उत्तरे शोधायला गेले की त्याचे एकच उत्तर पुढे येते ती म्हणजे 'जगामध्ये वाढलेली स्पर्धा' या धक्काधक्कीच्या जीवनामध्ये प्रत्येक तरुणाला वाटायला लागले आहे, की या स्पर्धेच्या युगामध्ये आपल्या हाताला काही लागेल की नाही? याची चिंता त्याला सतावत आहे. अशातच चैनीचे जीवन जगण्याचा हव्यास आणि सोशल मीडियाने त्याच्या मनावर केलेले गारुड आजच्या तरुणाला नकारात्मक जीवनाकडे घेऊन जात आहे. पण अशाही परिस्थितीत आजच्या तरुणांनी जीवनाकडे होकारात्मक दृष्टीनेच पाहायला पाहिजे. जगात निर्माण झालेल्या स्पर्धेला धाडसाने, नेक मार्गानेच सामोरे जायला पाहिजे. यातून तो नक्कीच यशस्वी जीवन जगू शकतो. हा आशावाद या वार्षिक अंकाच्या माध्यमातून व्यक्त करत आहे.

हाच एक धागा पकडून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची वैचारिक क्षमता वाढावी, त्यांच्या वैचारिक जाणीवेतून त्यांना आपल्या जीवनाचे मूल्यमापन करता यावे व यातून त्यांची लेखनी अधिक सजग व्हावी या अनुषंगाने 'शिवराज २०१६' या वार्षिक नियत कालिकासाठी विविध कथा, कविता, वैचारिक लेख या सारख्या साहित्याची मागणी विद्यार्थ्यांकडून केली तेव्हा म्हणावा तेवढा प्रतिसाद मला मिळाना नाही, पण जेव्हा मी प्रत्येक वर्गामध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्य प्रतिभाशक्तीला जागृत केले. त्यांच्यातील लेखन कौशल्याविषयी त्यांना जाणीव करुन दिली तेव्हा विविध प्रकारचे लेख, कविता, माझ्याकडे जमा झाल्या. याचाच अर्थ विद्यार्थ्यांमधील सुप्तशक्तीला या नियतकालीकाच्या माध्यमातून मी बाहेर काढू शकलो याचे मला समाधान आहे. असो.

या वार्षिक अंकाची जबाबदारी प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे सरांनी माझ्यावर सोपविली व वेळोवेळी अनमोल मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किसनराव कुराडे व संस्थेचे सर्व पदाधिकारी गेली अनेक वर्षापासून प्रेरणा देत आहेत. संपादक मंडळातील सर्व सदस्य, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय विभाग व त्यांचे प्रमुख श्री. संतोष शहापूरकर, शिवराज परिवारावर प्रेम करणारे हितचिंतक आणि सरस्वती मुद्रणालयाचे श्री. अतुल कोलते व त्यांचे सर्व कर्मचारी या सर्वांच्या सहकार्यामुळेच 'शिवराज'ने आकार घेतला आहे. या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

**प्रा. अशोक मोरमारे**

मुख्य संपादक

# मनोगत,,,,



देशातील ६७५ पैकी २५६ जिल्ह्यांना या वर्षी दुष्काळाचा तडाखा बसला असून या जिल्ह्यातील ३३ कोटी जनतेला पाण्याच्या अभावी हाल अपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. थोडक्यात देशातील अडीच लाख खेडी आणि प्रत्येकी चार माणसातील एक दुष्काळाने व्याकूळ झालेला आहे. या दुष्काळाच्या झळा संबंध महाराष्ट्रभर ही पसरलेल्या आहेत. 'शिवराज' साठी मनोगत लिहिताना या व्याकूळपणाची वेदना व उन्हाळ्याचा दाह अनुभवता येतो आहे. गेली दोन वर्षे तुलनेने कमी झालेले पाऊसमान या वर्षीही दुष्काळाची जाणीव प्रारंभापासून करून देत होते. आम्ही शिवराज संकुलाचे सर्व घटक ही जाणीव ठेऊन या वर्षी कार्यरत झालो.

आम्ही उपक्रमांची सुरूवात केली वृक्षारोपणाने. पाऊसमान आम्ही आणि एकूणच निसर्गसंतुलनासाठी ५१००० वृक्ष लागवडीचे स्वप्न-उदिष्ट घेऊन महाविद्यालयीन परिसरासह करंबळी, ऐनापूर, इंचनाळ, नांगनूर, जरळी या परिसरात आमच्या विद्यार्थ्यांनी ५००० झाडे लावली. या वर्षीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व उपक्रमांचा केंद्र बिंदू जल साक्षरता, जल संधारण असाच राहिला. कडगावमधील चार विहिरीचे पुनर्रज्जीवन, कडगाव पाझर तलाव गारवेल मुक्त करणे, त्याची साठवणक्षमता व पुनर्भरणक्षमता वाढविणे, बुगडीकट्टी येथील तलावाची स्वच्छता यातून 'शिवराजीयन्स'ची सामाजिक बांधिलकी सिद्ध झाली. खारीचा वाटा देत अल्पशक्ती कृती आम्ही करत राहिलो.

या वर्षी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये महाविद्यालयाच्या कला शाखेस प्रथम क्रमांकाने शिवाजी विद्यापीठातर्फे गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाने यावर्षी धवल यश संपादन केले. शिवाजी विद्यपीठाची जनरल चॅम्पियनशिप पुरुष व महिला संघांने सलग ४ थ्या वर्षी संपादन करुन शिवाजी विद्यापीठामध्ये शिवराजच्या खेळाडूंनी एक दबदबा निर्माण केला आहे. याच विभागातील स्वप्नील कुसाळे या आंतरराष्ट्रीय क्रीडापट्टूने आशियाई शुटींग चॅम्पिशनशिपमध्ये ३ सुवर्ण, १ सिल्वर अशी पदके प्राप्त करुन शिवराजच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या वर्षात औषधी वनस्पती संवर्धन व उपयोग (मार्गदर्शक डॉ. मधुकर बाचूळकर) आणि ग्राहक जागृकता आणि कायदे (मार्गदर्शक डॉ. रमेश तिबीले) या अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत दोन कार्यशाळा आम्ही घेतल्या. अशाच कार्यशाळामध्ये डॉ. एस. डी. पाटील, डॉ. आर. व्ही. गुंडे आणि प्रबंधक संतोष शहापूरकर यांनी अन्य महाविद्यालयात प्रमुख वक्ते म्हणून योगदान दिले.

वर्षभरात विविध नैमित्रिक आणि प्रेरणादायी व्याख्यानांचे आयोजन आम्ही केले. यामध्ये सहाय्यक जिल्हाधिकारी मा. कुणाल खेमणार, तहसिलदार मा. हनुमंत पाटील, ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री शरद काळे, ज्येष्ठ कवी डॉ. चंद्रकांत पोतदार, गटविकास अधिकारी मा. शाम वाखर्डे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अच्युत माने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. इंद्रजित देशमुख, पोलीस उपअधिक्षक डॉ.सागर पाटील, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या डॉ. भारती पाटील आणि डॉ. मेघा पानसरे अशा अनेक मान्यवरांना आम्ही निमंत्रित केले. त्या सर्वांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. गोविंद पानसरे

अध्यासन, समाजवादी प्रबोधिनी बरोबरचे संयुक्त कार्यक्रम यातून विवेकवादी तरूण घडविण्याचा आम्ही प्रयत्न केला. नवी क्षितिजे, नवी आव्हाने, नवी उमेद यासाठीचा सदैव उत्साह बाळगणारा, संवेदना जपणारा 'शिवराजीयन' आम्ही घडवीत राहिलो. घडवत राहणार आहोत. छ. शिवाजी महाराज, कर्मवीर वि. रा. शिंदे, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद इ. फुले अशा राष्ट्रपुरुषांच्या जयंती पुण्यतिथी निमित्ताने त्यांच्या कर्तृत्व विचारांचा जागर आम्ही करतोच पण प्रेरणादायी सोहळाच आम्ही प्रतिवर्षी साजरा करतो. हे वर्षही त्याला अपवाद नव्हते.

वाचन प्रेरणा दिन, राज्यशास्त्र विभाग, कवितेच्या-मराठी विभाग, मराठी राजभाषा दिन-मराठी विभाग, शिवराज केमक्विझ-रसायनशास्त्र विभाग, जे.एन.यू.मधील संघर्ष-पानसेर अध्यासन, हिंदी दिन-हिंदी विभाग, पोलीस भरती प्रशिक्षण कार्यशाळा, स्पर्धा परीक्षा विभाग, घनकचरा व्यवस्थापन, वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. आंबेडकर ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथालय विभाग, मैदान, प्रयोगशाळा, ग्रंथालय ही हार्डवेअर्स आणि प्राध्यापक प्रशासनांचे सॉफ्टवेअर वापरून भोवताली दुष्काळ असला तरी परिवर्तनासाठीचा विवेकवादी विचार पेरणारे आमचे संकुल मा. अध्यक्ष प्राध्यापक किसनराव कुराडे सरांच्या मार्गदर्शनाखाली 'ओॲसिस' सारखे काम करत आहे. अनेक उपक्रम, अनेक स्वप्ने, नव्या जाणिवेसाठीची उमेद, जिद्द, सामर्थ्य या सर्वोच्च स्त्रोत 'शिवराज' आहे. 'सेवा परमो धर्म' हे ब्रीद आणि वसा जपत आपणा सर्वांसोबत आम्ही चालत राहाणार आहोत... ते केवळ कुणावर तरी मिळवायच्या विजयासाठी नव्हे तर समूहमनाच्या परिवर्तनासाठी...! आपणा सर्वांच्या भविष्यासाठी...! स्वावलंबन आवश्यक पाणी परस्परालंबन सर्वात महत्त्वाचे त्यासाठी आपण कार्यरत राहूया.

उपक्रम पुरस्काराने मात्र आमचे संकुल नेहमीप्रमाणे गजबजून गेले. आमच्या संस्थेचे अध्यक्ष आणि आमचे मार्गदर्शक प्रा. किसनराव कुराडे यांच्या 'सीतायण' या वेगळ्या ग्रंथाचे प्रकाशन यावर्षी झाले. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, ज्येष्ठ साहित्यिक आणि सकाळ वृत्तपत्रसमूहाचे मुख्य संपादक उत्तम कांबळे यांनी या पुस्तकाची विशेष नोंद घेतली.

प्रा. चंद्रकुमार नलगे सार्वजनिक वाचनालय उजळाईवाडी यांच्यावतीने विशेष पुरस्कार देऊन या लेखनाचा गौरव करण्यात आला. आमचे तरुण उत्साही प्रबंधक संतोष शहापूरकर यांना मिळालेला शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचा गुणवंत कर्मचारी पुरस्कार आणि शिवाजी विद्यापीठ कृती समितीचा शिव पुरस्कार, डॉ. एस. डी. पाटील यांना कुरुंदवाड येथील म. ल. पाटील फाऊंडेशनचा शिक्षणसेवा पुरस्कार या गोष्टींनी महाविद्यालयन 'गुणवंत' राहण्यात मदत झाली.

प्राचार्य

**डॉ. एस. वाय. कोतमिरे**

# शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद

## ■ वनस्पतीशास्त्र विभाग

**प्रा. डॉ. एस. वाय. कोतमिरे** (एम्. एस्सी.,पीएच्.डी.)

**प्रा. जे. व्ही. सरतापे** (एम्. एस्सी.)

**प्रा. डॉ. एस्. के. नेर्ले** (एम्. एस्सी.,पीएच्.डी.)

**प्रा. व्ही. वाय. पाटील** (एम्. एस्सी.)

**प्रा. के. डी. गुरव** (एम्. एस्सी.)

**प्रा. पी. एस. यादव** (एम्. एस्सी.)

## ■ मराठी विभाग

**प्रा. एस्. सी. जोशी** (एम्. ए., डी.एच.ई.,डी.ए.ई.)

**प्रा. डॉ. एम्. व्ही. राजे** (एम्. ए.,पीएच्.डी.नेट)

**प्रा. डॉ. ए. बी. कुंभार** (एम्. ए., पीएच्.डी.नेट)

**प्रा. ए. के. मोरमारे** (एम्. ए., नेट)

## ■ इंग्रजी विभाग

**प्रा. डॉ. एन्. आर. सावंत** (एम्.ए.,एम्.फिल्.पीएच्.डी.)

**प्रा. डी. यु. जाधव** (एम्. ए., नेट)

**प्रा. के. बी. केसरकर** (एम्. ए.)

**प्रा. पी. ए. पाटील** (एम्. ए., सेट)

**प्रा. पी. एस. होनगेकर** (एम्. ए.बी.एड्.,एम.एड्.,पी.जी.सी.टी.ई.)

**प्रा. डॉ. एस. बी. परीट** (एम्.ए.,एम्.फिल्.पीएच्.डी.,सेट)

**प्रा. व्ही. पी. चौगुले** (एम्.ए.,सेट)

## ■ हिंदी विभाग

**प्रा. एन. बी. एकिले** (एम्. ए., एम.फील. नेट)

**प्रा. डॉ. एस. बी. माने** (एम्. ए.,पीएच्.डी.)

## ■ मानसशास्त्र विभाग

**प्रा. आर. व्ही. गुंडे** (एम्. ए., एम्.फिल.)

## ■ समाजशास्त्र विभाग

**प्रा. ए. व्ही. कुराडे** (एम्. ए.)

**प्रा. एस्. डी. सावंत** (एम्. ए.,एम्. फिल., नेट) २१/२/२०१३ FIP

**प्रा. आर. पी. हेंडगे** (एम्. ए.,एम्. फिल., नेट)

## ■ राज्यशास्त्र विभाग

**प्रा. एन्. आर. कोल्हापूरे** (एम्. ए.,एम्. फिल.,सेट)

**प्रा. डॉ. ए. जी. हारदारे** (एम्. ए.,एम्. फिल्.,पीएच.डी.,नेट)

## ■ अर्थशास्त्र विभाग

**प्रा. डॉ. डी. आर. खटके** (एम्. ए., एम्.फिल.पीएच.डी.)

**प्रा. जी. जी. गायकवाड** (एम्. ए., बी.लिब्., नेट)

**प्रा. एस. जी. मुंज** (एम्.ए.)

**प्रा. ए. यु. पटेल** (एम्.ए.,बी.एड.)

## ■ वाणिज्य विभाग

**प्रा. डॉ. आर. बी. तेली** (एम्.कॉम., एम्. फिल्.पीएच्.डी.)

**प्रा. डी. पी. खेडकर** (एम.कॉम., बी.एड्.,सेट)

**डॉ. एम. डी. चौगुले** (एम.कॉम.,एम्.फिल.,पीएच.डी.)

**प्रा. आर. आय. पालकर** (एम.ए.,एल.एल.बी.)

## ■ भौतिकशास्त्र विभाग

**प्रा. डॉ. एस. ए. जोडगुद्री** (एम्.एस्सी.,एम्.फिल.पीएच. डी.)

**प्रा. डॉ. बी. डी. मुरगी** (एम्. एस्सी.,पीएच.डी.)

**प्रा. डॉ. एम्. पी. पाटील** (एम्. एस्सी.,डी.एच.ई.,पीएच.डी.)

**प्रा.बी. एम्. कुलकर्णी** (एम्. एस्सी.,एम्.फिल.)

**प्रा. डॉ. एस्. एम्. कदम** (एम्. एस्सी.,पीएच.डी.)

**प्रा. डॉ. पी. एस्. चिगरे** (एम्. एस्सी.,डी.एच.ई.,पीएच.डी.)

**प्रा. कु. एस. डी. खन्ना** (एम्. एस्सी.)

**प्रा. डी. ए. डावरे** (एम्. एस्सी.)

**प्रा. आर. टी. पाटील** (एम्. एस्सी.)

## ■ संख्याशास्त्र विभाग

**प्रा. डी. एम्. म्हेतर** (एम्.एस्सी.,एम्.फिल.)

प्रा. आर. के. देशपांडे (एम्.एस्सी.)

प्रा. सौ. एम्. आर. दंडगे (एम्.एस्सी.)

प्रा. जे. के. पाटील (एम्.एस्सी.)

प्रा. कु. एच. एस. शेख (एम्.एस्सी.)

प्रा. कु. एस. एस. पोवार (एम्.एस्सी.)

## गणित विभाग

प्रा. डी. जी. वाठारे (एम्.एस्सी.)

प्रा. पी. एस. वाली (एम्.एस्सी.)

## रसायनशास्त्र विभाग

प्रा.डॉ.टी. एन्. पोवार (एम्. एस्सी.डी.एच.ई.,पीएच्.डी.)

प्रा. डॉ. बी. जे. देसाई (एम्. एस्सी.,पीएच्.डी.)

प्रा. व्ही. बी. कुरळे (एम्. एस्सी.,एम्.फिल.)

प्रा. डॉ. ए. एम्. हसुरे (एम्. एस्सी.,पीएच्.डी.)

प्रा. डॉ. बी. डी. अजळकर (एम्.एस्सी.,पीएच्.डी.)

प्रा. डॉ. एस्. डी. पाटील (एम्.एस्सी.,पीएच्.डी.)

प्रा. पी. आर. डोंगरे (एम्.एस्सी.)

प्रा. ए. आर. पोवार (एम्.एस्सी.)

प्रा. एस. ए. समडोळे (एम्.एस्सी.)

प्रा. वाय. बी. पाटील (एम्.एस्सी.)

प्रा. बी. जे. कांबळे (एम्.एस्सी.)

प्रा. ए. ए. पाटील (एम्.एस्सी.)

प्रा. एस. एस. देसाई (एम्.एस्सी.)

## प्राणीशास्त्र विभाग

प्रा. के. जे. अदाटे (एम्. एस्सी.)

प्रा. एस. बी. नदाफ (एम्.एस्सी.)

प्रा. एस. आर. पाटील (एम्.एस्सी.)

प्रा. ए. ए. शेट्टी (एम्.एस्सी.)

प्रा. टी. एस. पाटील (एम्.एस्सी.)

प्रा. कु. जे. के. कुलकर्णी (एम्.एस्सी.)

प्रा. सी. के. जाधव (एम्.एस्सी.)

प्रा. जी. ए. राऊत (एम्.एस्सी.)

प्रा. सी. ए. कणसे (एम्.एस्सी.)

प्रा. एस. बी. नदाफ (एम्.एस्सी.)

## शारीरिक शिक्षण

प्रा. आर. डी. मगदूम (बी. कॉम.,एम्.पी.एड्.)

## बी.एस्सी. कॉम्प्युटर

प्रा. सी. एस. निकम (एम्. सी. ए.)

प्रा. आर. बी. खोत (एम्.एस्सी., कॉम्प्युटर)

प्रा. सौ. डी. एस. खांडेकर (एम्.एस्सी., कॉम्प्युटर)

## पर्यावरण शास्त्र

प्रा. सौ. एस. एस. देसाई (एम्. एस्सी.)

प्रा. कु. के. एस. काळगे (एम्. एस्सी.)

# पदव्युत्तर विभाग - प्राध्यापक वृंद

## ■ मराठी विभाग

प्रा. एस. सी. जोशी (विभाग प्रमुख) : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. डॉ. एम. व्ही. राजे : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. ए. बी. कुंभार : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. ए. के. मोरमारे : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. डॉ. ए. पी. गवळी : यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी
प्रा. डॉ. बी. व्ही. चौगुले : आर्टस् , कॉमर्स कॉलेज, गड.
प्रा. बी. जे. शिंदे : आर्टस् , कॉमर्स कॉलेज, गड.
प्रा. ए. एस. बल्लाळ : आजरा महाविद्यालय, आजरा

## ■ हिंदी विभाग

डॉ. के. आर. पाटील : प्राचार्य, आर्टस् , कॉमर्स कॉलेज, नेसरी
प्रा. यु. एस. पाटील : यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी
प्रा. एस. एन. खरुजकर : यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी
प्रा. डॉ. एस. बी. घरपणकर : राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागाव
प्रा. एन. डी. केसरकर : आर्टस् , कॉमर्स कॉलेज, नेसरी
प्रा. ए. के. कांबळे : आर्टस् कॉलेज, कोवाड
प्रा. एस. एन. कांबळे : आर्टस् , कॉमर्स कॉलेज, नेसरी
प्रा. सौ. एस. एस. पाटील : आर्टस् , कॉमर्स कॉलेज, गड.

## ■ इंग्रजी विभाग

प्रा. डॉ. एन.आर.सावंत (विभाग प्रमुख): शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. सौ. एस. ए. मुजूमदार : शिवराज महाविद्यालय, गड. (३०/११/२०१४ पर्यंत)
प्रा. ए. एस. जरग : डी. आर. माने कॉलेज, कागल
प्रा. सौ. पी. ए. पाटील : शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज
प्रा. पी. ए. पाटील : यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी
प्रा. आय. आर. जरळी : यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी
प्रा. ए. एस. आरबोळे : आर्टस् कॉलेज, कोवाड
प्रा. सौ एम. एस. पाटील : सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड

## ■ अर्थशास्त्र विभाग

प्रा. डॉ. डी.आर. खटके (विभाग प्रमुख): शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. जी. जी. गायकवाड : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. एस. जी. मुंज : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. डी. जी. चिघळीकर : ऑर्टस, कॉमर्स आणि विज्ञान महाविद्यालय, गड.
प्रा. ए. जी. मगदूम : सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड
प्रा. सौ. यू. एस. रसाळ : वाय. डी. माने कालेज, कागल
प्रा.डॉ.पी. वाय. निंबाळकर : यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी
प्रा. के. एस. पोवार : सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड
प्रा. के. आर. तणंगे : ऑर्टस, कॉमर्स आणि विज्ञान महाविद्यालय, गड.

## ■ वाणिज्य विभाग

प्रा. डॉ. आर. बी. तेली (विभाग प्रमुख): शिवराज महाविद्यालय, गड.
डॉ. एन. बी. जाधव : प्राचार्य, राज शिवछत्रपती महाविद्यालय, महागाव
प्रा. ए. एम. शिरदवाडे : डी. आर. माने कॉलेज, कागल
प्रा. व्ही. एस. वांद्रे : दत्ताजीराव ऑर्टस् , कॉमर्स, सायन्य कॉलेज, इचलकरंजी
प्रा. टी. के. जाधव : आर्टस् , कॉमर्स कॉलेज, कुरुंदवाड
प्रा. एम. ए. कोळी : सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड
प्रा. एम. एम. बागवान : देवचंद कॉलेज, अर्जुननगर
प्रा. एन. बी. भागवत : डी. आर. माने महाविद्यालय, कागल



# संभाजीराव माने कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राध्यापक वृंद (अनुदानित विभाग)

## ■ मराठी विभाग

प्रा. व्ही. एस्. मुसाई (एम्. ए.,बी.एड्.,एम.फील.)

प्रा. टी. व्ही. चौगुले (एम्. ए., बी.एड्.)

## ■ इंग्रजी विभाग

प्रा. आर. बी. कांबळे (एम्. ए., बी.एड्., डी.एच्.ई.)

प्रा. के. ए. सावेकर (एम्. ए., डी.एच्.ई.)

प्रा. आय. डी. नेर्लेकर (एम्. ए.,बी. एड्.)

## ■ हिंदी विभाग

प्रा. सौ. एल्. एम्. डिसोझा (एम्. ए., बी.एड्.)

## ■ समाजशास्त्र विभाग

प्रा. एस. पी. पाटील (एम्. ए., बी.एड्.)

## ■ अर्थशास्त्र विभाग

प्रा. एस. ए. कांबळे (एम्. ए., बी.एड्.)

प्रा. टी. डी. भांदूगरे (एम्. ए., बी.एड्.)

## ■ राज्यशास्त्र विभाग

प्रा. आर. एस. सरनाईक (एम्. ए., बी.एड्.)

## ■ मानसशास्त्र विभाग

प्रा. ई. जी. कांबळे (एम्. ए., बी.एड्.)

प्रा. एम्. एस्. घस्ती (एम्. ए., बी.एड्.)

## ■ पर्यावरणशास्त्र विभाग

प्रा. सौ. एस. पी. गाडवी (एम्. एस्सी.,बी.एड.)

प्रा. कु. के. एस. काळगे (एम्. एस्सी.,बी.एड.)

## ■ वाणिज्य विभाग

प्रा. ए. व्ही. पाटील (एम.कॉम.,बी.एड.)

## ■ पदार्थ विज्ञान विभाग

प्रा. ए. बी. कोकणे (एम्. एस्सी.,बी. एड्.)

प्रा. के. व्ही. कांबळे (एम्. एस्सी.,बी. एड्.)

प्रा. आर. टी. पाटील (एम्. एस्सी.,बी. एड्.)

प्रा. डी. ए. डावरे (एम्. एस्सी.,बी. एड्.)

## ■ रसायनशास्त्र विभाग

प्रा. पी. एम्. भोईटे (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)

प्रा. एस्. एच्. रावण (एम्. एस्सी., बी.एड्.)

प्रा. सौ. आर. के. अदाटे (एम्. एस्सी., बी.एड्.)

प्रा. सौ. एस. एन. कांबळे (एम्. एस्सी., बी.एड्.)

## ■ जीवशास्त्र विभाग

प्रा. पी. टी. कट्टी (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)

प्रा. कु. पी. आर. जाधव (एम्. एस्सी.)

प्रा. व्ही. वाय. पाटील (एम्. एस्सी.,बी.एड.)

प्रा. डी. टी. पाटील (एम्. एस्सी., बी.एड्.)

प्रा. कु. सी. के. जाधव (एम्. एस्सी., बी.एड्.)

## ■ गणित विभाग

प्रा. एन्. एम्. गरुड (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)

प्रा. पी. टी. शेवाळे

प्रा. जी. आर. हिंगनिरे

## ■ शारीरिक शिक्षण विभाग

प्रा. जयवंत पाटील (एम्. ए., एम्.पी.एड्.)

## ■ आय. टी. विभाग

प्रा. एस. पी. कुराडे (एम.एस.ई. कॉम्प्यू.)

प्रा. यु. पी. कानडे (एम.सी.ए.)

प्रा. कु. आर. एम. फर्नांडीस (एम.सी.ए.)

# महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी वृंद

## कार्यालय -

### ■ प्रबंधक
श्री. एस. आर. शहापूरकर (बी. ए.)

### ■ अधीक्षक
श्री. बी. एस. सावंत (बी. ए.)

### ■ कनिष्ठ लघुलेखक
श्री. के. टी. कुंभार (एम. कॉम.)

### ■ कनिष्ठ लेखनिक
श्री. एम. बी. माने (बी. कॉम्., एम्. लिब.)

श्री. पी. डी. पाटील (बी. कॉम्.)

श्री. ए. एम्. पोवार (बी. कॉम्., एम्. लिब.)

श्री. एन्. एस्. काबळे (बी. ए., एम्. लिब.)

श्री. एन. झेड. दळवी (बी. कॉम्.)

श्री. बी. बी. जाधव (बी.ए.)

श्री. पी. डी. सोरप (बी. ए.)

## ग्रंथालय -

### ■ ग्रंथपाल
प्रा. एस. आर. कुराडे (बी.एस्सी.,एम.लिब सेट)

### ■ साहाय्यक ग्रंथपाल
श्री. आर. ए. जाधव (एम्. ए., एम्. लिब.,एफ.फिल.)

### ■ ग्रंथालय लेखनिक
श्री. बी. एल. कोरवी (बी. ए.)

### ■ ग्रंथालय परिचर
श्री. एस्. एस्. हजारे

श्री. व्ही. आर. टेंबरे

श्री. पी. बी. नडगेरी

श्री. ए. एल्. कलकुटकी (एम. ए.)

श्री. ए. एस. सावंत

श्री. एन. बी. असोदे

श्री. एम. बी. शिंदे

### ■ प्रयोगशाळा साहाय्यक
श्री. डी. जी. रेंदाळे (बी.ए.)

श्री. आर. बी. आयरनाईक (एम्.ए.)

श्री. पी. जी. पोवार (एम्.ए.)

श्री. एस्. व्ही. शिंदे (बी.एस्सी.,बी.लीब.सायन्स)

### ■ प्रयोगशाळा परिचर
श्री. बी. डी. मोरे

श्री. एस्. बी. खोत (बी. कॉम्.)

श्री. एस्. डी. पाटील

श्री. टी. आर. देवडकर

श्री. व्ही. व्ही. कोंडूसकर

श्री. एम्. जी. खोत (बी. ए.)

श्री. टी. बी. कांबळे

श्री. आर. के. वडर

श्री. एस्. एम्. मोरबाळे

श्री. के. आर. कांबळे

श्री. एस्. एम्. कांबळे

श्री. व्ही. बी. पाटील

श्री. डी. जी. हुंदळेकर (बी. कॉम्.)

श्री. एस. एस. कांबळे

श्री. एस. एन. पाटील (एम.ए.,एम.बी.ए.)

### ■ शिपाई
श्री. एस्. डी. कुरळे

श्री. यु. डी. राऊत

श्री. एम. के. गोटुरे

श्री. व्ही. ए. सुतार

श्री. ए. एच. नाईक

श्री. व्ही. एस. गुरव

श्री. के. एम. सूर्यवंशी

श्री. एस. जी. हिले

## प्राध्यापकवृंद (विना अनुदान विभाग)

प्रा. आर. डी. कमते (एम.बी.ए.,एम.फील) हेड, बीबीए डिपार्मटमेंट

प्रा. प्रा. ए. यू. पटेल (एम.ए.,एम.फील)लेक्चरर, इकॉनॉमिक्स

प्रा. सी. एस. निकम (एम.सी.एम.,एम.सी.ए.) हेड, कॉम्प्युटर डिपाटमेंट

प्रा. एम. आर. दंडगे (एम.एस्सी.(स्टॅट)) लेक्चरर, स्टॅट

प्रा. के. एस. देसाई (एम.बी.ए.,जी.डी.सी.अँड ए.,एम.फील.नेट) हेड, बीसीए डिपार्टमेंट

प्रा. एन. जी. चव्हाण (एम.एस.सी.(इले.)) लेक्चरर, इलेक्ट्रॉनिक्स

प्रा. पी. एस. वाली (एम.एस्सी. (मॅथ)) लेक्चरर, मॅथ्स

प्रा. आर. बी. खोत (एम.एस्सी. (कॉम्प्यु.)) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. एस. बी. शिंदे (बी.ए.,एल.एल.बी.)सीएचबी, लॉ

प्रा. यु. बी. देसाई (एम.सी.एम.,एम.सी.ए.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. डी. एस. खांडेकर (एम.एस्सी. (कॉम्प्यु.))लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. एस. एस. देसाई (एम.एस्सी. (इनव्हॉरमेंट))सीएचबी, इनव्हारमेंट सायन्स

प्रा. बी. एस. पठाण (एम.एस्सी. (कॉम्प्यु.)बी.एड.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. व्ही. पी. कळसगोंडा (एम.एस्सी. (कॉम्प्यु.)) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. एस. पी. गाडवी (एम.एस्सी. (इनव्हॉरमेंट)) सीएचबी, इनव्हारमेंट सायन्स

प्रा. आर. के. पाटील (एम.एस्सी. (कॉम्प्यु.)) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. ए. टी. महाडीक (बी.ई. (आय.टी.))लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. आय. पी. सुतार (एम.सी.एम.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. यु. बी. पाटील (बी.ई. (कॉम्प्यु.)) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. पी. एस. पाटील (एम.बी.ए.) लेक्चरर, मॅनेजमेंट

प्रा. एस. एम. बेल्लद (एम.बी.ए.) लेक्चरर, मॅनेजमेंट

प्रा. टी. बी. घाटगे (एम.सी.ए.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. एम. ए. पाटील (एम.सी.ए.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. जे. एस. घाटगे (एम.सी.ए.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स

प्रा. एस. एस. पाटील (एम.बी.ए.) सीएचबी, कॉमर्स

प्रा. जी. ए. पाटील (एम.कॉम.,एम.बी.ए.,बी.एड.,जी.डी.सी. अँड ए.)सीएचबी, कॉमर्स

प्रा. जी. डी. नेर्ले सीएचबी, इलेक्ट्रॉनिक्स

## प्रशासकीय कर्मचारी वृंद (विना अनुदान विभाग)

श्री. पी. ए. शेंडे (बी.एस्सी.,एम.बी.ए.) हेड क्लार्क

श्री. वाय. बी. पाटील (एम.सी.ए.) लॅब.असिस्टंट

श्री. एस. ए. शिरहट्टी (एम.कॉम.) ज्यु.क्लार्क

सौ. एस. बी. निकम (एम.कॉम.) ज्यु.क्लार्क

श्रीमती जी. जे. शिंदे (बी.कॉम.,बी.लीब) लिब.असिस्टंट

श्री. एन. टी. पाटील (बी.कॉम.) ज्यु.क्लार्क

श्री. डी. बी. देसाई (बी.कॉम.) ज्यु.क्लार्क (पी.जी.सेक.)

सौ. पी. आर. सलावाडे (बी.कॉम.) ज्यु.क्लार्क

सौ. एस. बी. आजरी (बी.कॉम.) ज्यु.क्लार्क

श्री. सी. आय. बाबर (एम.ए.) ज्यु.क्लार्क

श्री. व्ही. एम. घेज्जी (बी.ए.) ज्यु.क्लार्क

श्री. वाय. एस. शेंडे (एम.ए.) ज्यु.क्लार्क

श्री. बी. जी. चौगुले (एच.एस.सी.) लॅब. अॅटेंड.

श्री. आय. बी. गोवस (एच.एस.सी., आयटीआय) लॅब. अॅटेंड.(इले.)

श्री. आर.एन.कांबळे (बी.ए.,डिप्लोमा कॉम्प्यु.हार्ड.अँड नेटवर्क) लॅब. अॅटेंड.(हार्ड.टेक.)

श्री. एस.एस.जाधव (बी.ए.,डिप्लोमा कॉम्प्यु.हार्ड.अँड नेटवर्क) लॅब. अॅटेंड.(हार्ड.टेक.)

श्री. ए. जी. भाटले (एम.ए.) लिब.अटेंडेंट

श्री. डी. के. पताडे (एच.एस.सी.) लॅब.अटेंडेंट

श्री. जी. डी. निढोरी (बी.ए.) झेरॉक्स ऑपरेटर

श्री. एस. टी. हजारे (एच.एस.सी.) शिपाई

श्री. एम. बी. रेडेकर (एच.एस.सी.) शिपाई

श्री. एम. बी. यादव (एच.एस.सी.) शिपाई

श्री. एस. एस. गवळी (बी.ए.) शिपाई

श्री. डी. एस. पाटील (एच.एस.सी.) शिपाई

श्री. एस. जे. साबळे (एच.एस.सी.) शिपाई

श्री. एस. एस. कांबळे (एम.ए.) शिपाई

श्री. एस. व्ही. पाटील (एच.एस.सी.) शिपाई

श्री. के. के. सागर (एस.एस.सी.) गार्डनर

सौ. एस. एस. ठाबे (७ वी) स्विपर

श्री. एम. डी. पाटणे, लॅब. अॅटेंड (हार्ड.टेक.)

सौ. एस. एस. घोटणे (बी.ए.) लॅब. अॅटेंड

कु. एम. सी. दबाडे (बी.सी.ए.) ज्यु.क्लार्क

कु. आर. ए. सावरतकर (डिप्लोमा कॉम्प्यु. इंजि.) लॅब. इन्स्ट्रक्टर

श्री. बी. डी. केसरकर, वाचमन

# संभाजीराव माने कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राध्यापक वृंद (विनाअनुदानित विभाग)

प्रा. एस. पी. कुराडे (एम.एस्सी.कॉम्पु.) हेड, ज्यु. सायन्स बी अँड सी डीव्हीजन

प्रा. आर. के. अदाते (एम.एस्सी.,बी.एड.) केमिस्ट्री

प्रा. आय. डी. नेर्लीकर (एम.ए.,बी.एड.) इंग्लिश

प्रा. व्ही. वाय. पाटील (एम.एस्सी.,बी.एड.) बायॉलॉजी

प्रा. यु. पी. कानडे (एम.सी.ए.) आय.टी.

प्रा. के. एस. काळगे (एम.एस्सी.,बी.एड.) इनव्हारमेंट सायन्स

प्रा. पी. टी. शेवाळे (एम.एस्सी.,बी.एड.) मॅथ्स

प्रा. डी. टी. पाटील (एम.एस्सी.,बी.एड.) केमिस्ट्री

प्रा. जी. आर. हिंगमीरे (एम.एस्सी.,बी.एड.) मॅथ्स

प्रा. एस. एल. कांबळे (एम.एस्सी.,बी.एड.) केमिस्ट्री

प्रा. डी. ए. डावरे (एम.एस्सी.,बी.एड.) फिजिक्स

प्रा. आर. टी. पाटील (एम.एस्सी.,बी.एड.) फिजिक्स

प्रा. आर. एम. फर्नांडीस (एम.सी.ए.) आय.टी.

प्रा. सी. के. जाधव (एम.एस्सी.,बी.एड.) बायॉलॉजी

## कर्मवीर वि. रा. शिंदे शिक्षण संस्था (प्रशासकीय कर्मचारी वृंद)

- **प्रशासकीय प्रमुख** - श्री. एल. एस. शिंदे (बी.कॉम.), लेखनिक - श्री. नारायण पाटील (बी.कॉम.)



# मराठी विभाग

सांगा, कसं जगायचं ?
कण्हत कण्हत की गाणं म्हणत
तुम्हीच ठरवा !
डोळे भरुन तुमची आठवण
कुणीतरी काढतंच ना ?
ऊन ऊन दोन घास
तुमच्यासाठी वाढतंच ना ?
शाप देत बसायचं की दुवा देत हसायचं
तुम्हीच ठरवा !
काळ्या कुट्ट काळोखात
जेव्हा काही दिसत नसतं
तुमच्यासाठी कुणीतरी
दिवा घेऊन उभं असतं
काळोखात कुढायचं की प्रकाशात उडायचं
तुम्हीच ठरवा !
पायात काटे रुतून बसतात
हे अगदी खरं असतं
आणि फुलं फुलून येतात
हे काय खरं नसतं
काट्यासारखं सलायचं की फुलासारखं फुलायचं
तुम्हीच ठरवा !
पेला अर्धा सरला आहे
असं सुद्धा म्हणता येतं
पेला अर्धा भरला आहे
सरला आहे म्हणायचं की भरला आहे म्हणायचं
तुम्हीच ठरवा !
सांगा कसं जगायचं ?
कण्हत कण्हत की गाणं म्हणत
तुम्हीच ठरवा !



- मंगेश पाडगावकर

सहसंपादक
डॉ. ए. बी. कुंभार
मराठी विभाग

# अनुक्रमणिका

## ✲ गद्य विभाग ✲


- जीवनावर प्रेम करणारा कवी — कु. प्रगती डोंगरे व कु. रानी पाटील
- निवडणूक आणि आजची तरुणाई...! — कु. तेजश्री तानाजी विचारे
- माणुसकीच्या आपुलकीचं दालन - कुटुंब — कु. मनाली शिवाजी केसरकर
- २१ व्या शतकाकडे — कु. अंकिता सदानंद दिवटे
- अन्नदात्याचे दु:ख — कु. अंकिता महादेव पोवार
- पुस्तक वाचा, मस्तक सुधारेल — कु. नीलम तुकाराम गोडसे
- आत्महत्या : एक संकट — बाळकृष्ण बाळू परीट
- हवामान बदल आणि त्याचे मानवावरील परिणाम — अजित रघुनाथ पाटील
- मैत्री – एक गरज — वैभव मनोहर रेडेकर
- राष्ट्रीय मतदार दिन — सिद्धलिंग वि. हिरेमठ
- पुरोगामी विचाराची हत्या — शुभम बाबासाहेब चौगुले
- बळीचं राज्य येऊ दे ! — विकास शिवाजी मोरे
- सावित्रीबाई फुले : एक अलौकिक समाजसेविका — कु. शितल डी. परीट
- कॉलेज लाईफ — अभिजित शिवाजी कांबळे
- ये मेरे वतन के लोगो — महेश मनोज माने
- आयुष्यातील खरी कमाई — संतोष बोरगांवी
- आजची स्त्री — कु. स्वाती दत्तात्रय जाधव


## ✲ पद्य विभाग ✲


- स्वार्थ — कु. तेजश्री विचारे
- धुंद संध्याकाळी — विकास मोरे
- वाचव वसुंधरा — अमेय कांबळे
- लेक वाचवा — पंकज खवरे
- मैत्री — नामदेव कांबळे
- निरोप घेताना — बाजीराव दळवी
- आजचे युग अंधाराचे — अंकिता दिवटे
- आई — कु. सुनिता जाधव
- जीवनाचा खेळ — कु. प्रांजली रावण
- झोप — कु. प्रियांका शिंदे
- पाऊस — वैष्णवी जोशी
- विश्वास — बाळकृष्ण परीट
- अंधार — अमेय कांबळे
- युग — कु. श्रुती स्वामी
- कॉलेज जीवन — रवि कोले
- बललायचं मल... — दिनेश कुट्रे
- आयुष्य — सुविदास हजारे
- आठवण — प्रियांका जाधव
- आई-बाप — कु. गीता पन्हाळकर
- पुस्तके — अनिल मगदूम
- आज वेळ नाही — कु. पूनम देसाई
- जीवनाचे सार — आशिष पाटील
- आयुष्य एक सफर — कु. सारिका कुराडे


## ✲ इतर ✲


- सुविचार — कु. सोनम श्रीराम गुप्ता
- वेळ — प्रमिला लक्ष्मण धुरे
- आठवणीचा पाऊस — कु. पूजा रामा कोचरी
- लहानपणीचा आनंद — प्रितमराजे बेलवाडे
- "क" पासून Amazing Marathi — सुमित विनायक रांगणेकर




# जीवनावर प्रेम करणारा कवी

✍..... कु. प्रगती डोंगरे व कु. रानी पाटील
(एम.ए. भाग-१)

*फूल कोमेजणार म्हणून कधी फूलायचं थांबतं का ?*
*मरण येणार म्हणून कोणी जगायचं थांबतं का ?*

हा आशावाद निर्माण करणारे कवी मंगेश केशव पाडगावकर यांचा जन्म सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले या निसर्गरम्य गावी १० मार्च १९२९ रोजी झाला. त्यांचे शिक्षण वेंगुर्ले आणि मुंबई या दोन ठिकाणी झाले. मुंबई विद्यापीठातून मराठी आणि संस्कृत या भाषाविषयात एम.ए. केले. 'साधना' साप्ताहिकाचे सहसंपादक म्हणूनही त्यांनी थोडे दिवस काम केले. त्यानंतर त्यांनी 'युनायटेड स्टेट्स इन्फॉर्मेशन' मध्ये काम केले.

वयाच्या १४ व्या वर्षीपासून कविता लिहिण्यास सुरूवात केली. कुसुमाग्रज आणि बा. भ. बोरकर याचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. मात्र ते कोणत्याच साच्यात अडकले नाही. त्यांनी स्वत:ची शैली निर्माण केली. 'धारानृत्य' हा पहिला कवितासंग्रह १९५० मध्ये प्रसिद्ध झाला. निसर्ग आणि प्रेम भावना यांना त्यांच्या कवितेत प्रधान स्थान लाभले आहे. उपहासात्मक पद्धतीची कविता लोकप्रिय करण्याचे क्षेत्रही त्यांच्याकडेच जाते. बालगीते हा काव्य प्रकारही त्यांनी यशस्वीरित्या हाताळला आहे. अखंड कविता लेखन करून मराठी मनावर अभंग अधिराज्य गाजवणारे मंगेश पाडगांवकर म्हणजे मराठी साहित्यातील 'सदाहरित कवितांचे एक दुर्मिळ झाड.' कविता कधी म्हातारी होत नसते आणि कवी म्हातारा झाला तरी त्याची कविता सातत्याने तारुण्याच्या उंबरठ्यावरच असते असे म्हणतात. ही उक्ती पाडगांवकर यांना तंतोतंत लागू पडते.

शाळेच्या पहिल्या दिवशीच 'सांग सांग भोलानाथ' ही पाडगावकरांची कविता भेटायची आणि विद्यार्थी म्हातारा झाला तरी त्याच्या ओठावर रेंगाळायची 'सावर रे सावर रे उंच उंच झुला, जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारे' 'अखेरचे येतील माझ्या ओठी हेच शब्द' किंवा 'असा बेभान हा वारा' यासारख्या प्रेमकविता त्यात्या पिढीच्या प्रेमाला, विरहाला यशस्वी प्रेम कथांना एक उर्जा देत गेल्या. या कविता ओठांवर आल्या नाहीत तर ती तरुणाई कसली! असं म्हणण्या इतपत या कवितांनी अधिराज्य गाजवले होते. 'कण्हत, कण्हत जगायचं की गाणी म्हणत जगायचं' या सारख्या त्यांच्या ओळी जगण्यासाठी दिलासा देत होत्या. जगणं सुंदर करण्यासाठी ऊर्जा देत होत्या. 'धारानृत्य' पासून पाडगावरकरांचा प्रवास सुरू होतो. 'सलाम', 'जिप्सी' करत करत तो 'शब्द' पर्यंत पोहचतो. सातत्यानं लेखन आणि सातत्यानं चिंतन हे पाडगावकरांचं एक वैशिष्ट्य होते. मीराबाईच्या भजनाचा आणि कबिरांच्या दोह्यांचा अनुवाद त्यांनी केला आणि उच्च भक्तीशी तसेच माणसाच्या मनावरचे वेगळे धुके दूर करणाऱ्या कबिराशी त्यांनी नाते सांगितले.

*असं वाटतंय की, झाड असतं,*
*पाणी असतं, आकाश असतं,*
*फुल असतं, चांदणं असतं, पाऊस असतो,*
*अगदी तसं आपलं जगणं आहे...*

पागडगावकरांना माणसाची जगणयाची जी नैसर्गिक लय असते ती सापडली होती. आपल्या कवितेतून त्यांनी वारंवार ती लय पकडली. जीवनावर कमालीचे प्रेम करतात. मानवी जीवनातील सौंदर्य जसं त्यांनी पाहिलं तसं त्यांनी जगण्यातील विशिष्ट संघर्ष, मतलबी हेतू ढोंग आणि अनैतिकता पचवून सत्तास्थाने बळकावणारे नेते, हिंसा, भय, माणसाचे अवमूल्यन करुन त्याला बाजारी वस्तू करून टाकणारी आणि शोकेशमध्ये मांडणारी व्यवस्था मानवी संवेदना जागी ठेवून पाहिलं आहे. जीवनाची ही रुपे त्यांच्या कवितेत येतात. पण या सर्वांमध्ये आपल्याला अधिक जवळचे वाटतात ते जीवनाचा सुंदर अर्थ सहजपणे सांगणारे पाडगावकर जे आपल्या जीवनातलं गाणं आणि आपल्या मनाच्या फांदीवर बसून झुलत गाणारा पक्षी आणि त्याचं सप्त सुरातले गाणं जपतात ते

पहाटवाऱ्याची झुळूक यावी तसे आहेत. त्याचं हे सौंदर्यासक्त मन जेव्हा कवितेतून उमलतं तेव्हा रसिकांना ते हिरव्या कुरणात नाचणाऱ्या मोरासारखे भासतात. भावकाव्याला अनुकूल अशी त्यांची वृत्ती होती. निसर्गाचं अत्यंत मोहक रूप त्यांच्या काव्यातून व्यक्त होत जाते स्वत:च्या खोलमनात दडून कवितेमधून नित्यनव्या अनुभवांचा शोध घेणारा आणि जीवनाला सामोरं जाताना सौंदर्याचा निखळ अनुभव देणारा कवी 'जिप्सी'च्या रुपानं व्यक्त होतो. कविला 'जिप्सी'च्या जीवनाची चाकोरी नको आहे. तो नित्य नवा अनुभव आणि जीवनाचं नित्य नवं रूप शोधतो आहे. हिच वृत्ती त्यांनी आजन्म जोपासली आहे. पण ते आत्मनिष्ठ आणि सौंदर्यानुभव व्यक्त करणारी कविताच लिहीत आले नाही. तर त्यांनी राजकीय आशयाची, समाजातील विसंगतीवर उपरोधपूर्ण भाष्य करणारी आणि दांभिकता, अनैतिकतेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या मतलबी व्यवस्थेवर हल्ला करणारी कविता लिहिली. त्यांनी आणीबाणीच्या काळात कराडच्या साहित्य संमेलनात 'सलाम' नावाची कविता सादर केली. सत्तांध, शोषण करणाऱ्या आणि सामान्य माणसाचा आवाज दाबून टाकणाऱ्या अशा व्यवस्थेविरुद्ध उपरोधपूर्ण भाष्य करणारी ही कविता अत्यंत गाजली. आजही ती तितकीच भेदक वाटते. 'गझल' 'विदूषक' आणि 'सलाम' या काव्य संग्रहातून त्यांनी ही कविता सादर केली. सत्तेच्या संपर्कात राहणाऱ्या वर्गातील लोकांकडून साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील माणसांचा केला जाणारा मानभंग, मध्यमवर्गियांमध्ये असलेली दांभिकता आणि लाचारी त्याबद्दल त्यांच्या मनात संताप होता. तो संताप ते उपरोधपूर्ण भाषेत व्यक्त करतात. त्यांच्या कवितेत फार पूर्वीच बाजारू संस्कृतीवर भेदक टीका व्यक्त झाली आहे. आधी एक गाणे, मग एक गाणे; दोन गाण्यामध्ये 'जुलाबाच्या गोळ्या' या ओळीमध्ये तोच उपरोध बाजारीकरणावर रोखला आहे. १९६० नंतरच्या वास्तवावर भेदक प्रकाश टाकणारी ही कविता नवसमृद्ध वर्गाची, त्यांच्या स्वस्त संस्कृतीची संवेदनाहीन मनाची चिरफाड करते ती कविता वाचताना वाचक अंतर्मूख होतो. 'जिप्सी', 'छोरी', 'उत्सव' या संग्रहामधून जी कविता निसर्ग आणि प्रेमाविषयक अनुभव व्यक्त करते तिचे रुप कमालीचे सौंदर्यपूर्ण नादमधूर आणि लयबद्ध आहे. त्यांची भाव कविता आणि त्यातून सिद्ध झालेली भावगीते हे अत्यंत समृद्ध असे दालन आहे. १९५३ पासूनच त्यांची भावगीते येऊ लागली.

*पहिलीच भेट झाली पण ओढ ही युगाची*
*जादू अशी घडे ही या दोन लोचनांची.*

या भावगीतानं प्रेमाची नवथर अनुभूती व्यक्त केली आणि नंतर 'शुक्रतारा मंदवारा', 'हात तुझ्या हातात', 'धुंद ही हवा', 'रोजचा चंद्र भासतो नवा', 'शब्दावाचून कळले आज सारे शब्दांच्या पलिकडले', 'भातुकलीच्या खेळामधली' आदि प्रेमभावना व्यक्त करणारी भावगीते रसिकांच्या हृदयात अक्षय स्थान संपादन करून बसली आहेत. 'श्रावणात घननिळा बरसला' या गीताशी तुलना करता येईल असं केवळ बालकवीचं गीतच मराठीत आहे. 'कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे शोधिशी काशी', 'स्वर आले जुळूनी', 'अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओठी', 'लाख चुका असतील केल्या', 'केली पण प्रीती'', 'असा बेभान हा वारा', 'कुठे ही नाव मी नेऊ' अशी त्यांची अनेक भावगीते तर कधीच कोमेजणार नाहीत. पाडगावरांनी आणखी वेगवेगळ्या प्रकारची कविता लिहिली.

मयुरपंखी प्रतिभा घेऊन जन्मला आलेला हा कलावंत राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार-सन्मानाचा मानकरी ठरला १९८० ला साहित्य अकादमी पुरस्कार २०१३ मध्ये पद्मभूषण पुरस्कार, २००८ मध्ये महाराष्ट्र भूषण पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा म.सा.प. सन्मान पुरस्कार २०१३ अशा अनेक पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. अशा या माणसाच्या जीवनावर प्रेम करणाऱ्या कवीला आमचे त्रिवार अभिवादन !



# निवडणूक आणि आजची तरुणाई...!

✍..... कु. तेजश्री तानाजी विचारे
(बी.एस्स. भाग-३)

निवडणूक म्हटलं की आधी आठवायची ती एकमेकांच्यातील चढाओढ, ईर्ष्या राजकीय डावपेच. सर्वसामान्य लोकांची निवडणुकीकडे माणसांची मात्र याकडे पाठ असते पण आता सगळीच समीकरणे बदललेली आहेत. आता निवडणूक म्हटलं की समोर दिसते ती पैशाची उधळपट्टी, कार्यकर्त्यांची चैनी, कॉलेज कुमारांच्या पार्ट्या, कॉलेज, शाळा चुकवन सभेला आणि रॅलीला असलेली तरुण वर्गाची उपस्थिती, रात्री उशिरा पर्यंत घराबाहेर राहणे, व्यसनाच्या अधिन होणे. हे दृश्य पाहता आजची पिढी नक्की सुधारत आहे की अजून बिघडत आहे हा प्रश्न मनात उभा राहतो.

पूर्वी निवडणुका, राजकारण फक्त आणि फक्त समजकल्याण आणि लोकांच्या भल्यासाठी केल्या जायचे. पण जसं जसं समाजाचं रुप बदलत गेलं तसं या निवडणुकीचं रुप पालटलं. निवडणूक ही स्वार्थासाठी, ईर्षेमुळे, वर्चस्ववाद, पैशाच्या हव्यासापोटी होवू लागल्या. आपलीच तिजोरी भरावी म्हणून लोक वारसा हक्कांप्रमाणे आपल्या तरुण मुला-मुलींना, नातेवाईकांना यात गुंतवू लागले आणि निवडणुकीचा बाजार, व्यवहार होवू लागला. हे सर्व होत असताना याला सामोरे जाऊन हे चित्र बदलायचं सोडून आजची यंग जनरेशन त्यांच्यांच पाऊलावर पाऊल ठेऊन त्यांना सपोर्ट करु लागली आहे. थोड्याशा पैशासाठी आणि निवडणुकीच्या काळात मिळणारं हॉटेलचं जेवण, दारु या तरुणाईला कॉलेज आणि लेक्चरपेक्षा महत्त्वाचे वाटू लागले आहे. आजच्या तरुणांची ही चंगळवादी वृत्ती या राजकारणी लोकांकडून अधिक जोपासली जात असल्यामुळे व्यसनाधीनमध्ये आजची तरुणाई अडकत जात आहे. एकानव्या संकटाची ती चाहूल आहे, कारण याच निवडणुकीतून ग्रुप्स तयार होतात.एकमेकांबद्दल द्वेष आणि ईर्षा निर्माण होते आहे. ती तरुणाई आपल्या मित्रासाठी जीव द्यायला तयार होते. तिच तरुणाई या निवडणुकीमुळे एकमेकांच्या जीवावर उठत आहे. याला जबाबदार फक्त आणि फक्त निवडणुकाचे बदलते स्वरूप आहे. कारण निवडणुकीमुळे तुझा पक्ष माझा पक्ष असे ग्रुप्स तयार होत असतात आणि न कळत आपण आपला मोठेपणा सिद्ध करण्यासाठी एकमेकांवर कूरघोडी करायला चालू करतो. यच कूरघोडीतून पुढे जाऊन मोठे वाद निर्माण होत जातात. या सगळ्यातून मग सुरुवात होते स्वार्थाच्या आणि विनाशाच्या साम्राज्याला. हे सर्व असं घडत असताना यात भर म्हणून की काय इंटरनेट, व्हाटस्ऑप, फेसबुक यामध्ये पण निवडणुकीचा प्रचार चालू असतो. त्यामुळे आजची तरुणाई यामुळे न कळत निवडणुकीकडे वळत आहे. इंटरनेटचा वापर अभ्यासासाठी, संशोधनासाठी करण्योएवजी पक्षाचा प्रचार करण्यासाठी तरुणाई करताना दिसत आहे. पण या तरुणांना हे कळत नाही की आपण खरंच ज्याच्यासाठी इतकं कष्ट घेत आहोत त्यांना त्यांची कदर आहे का ? सध्या या स्वार्थी जगात देव पण लोक सोईनुसार बदलतात. तिथे यांच्या मदतीची, कष्टाची, सहभागाची खरंच कदर आहे का ? आजची यंग जनरेशन ही फक्त आजचा विचार करणारी आहे. 'Today is last day, so enjoy it' अशी मानसिकता आहे या तरुण वर्गाची. आज पोट कसं भरेल चांगलं चुगलं खायला कसं भेटल ? याचा विचार करुन ही तरुण मंडळी निवडणुकीत एखाद्या पक्ष्याला आपला संपूर्ण वेळ देते. आपल्याकडून होईल ती मदत करते. पण खरंच तो लोककल्याण करेल का ? आपल्या देशाला विकसीत करून जगात भारताचं नाव मोठं करेल का ? याचा विचार का करत नाही ही यंग जनरेशन.

निवडणुकीत दिवसभर सभेसाठी, रॅलीसाठी, रात्री पार्ट्यासाठी या युवा मंडळीकडे वेळच वेळच असतो. पण घरी आई-वडिलांसाठी थोडापण वेळ नाही. व्हाटस्ऑप, फेसबुक वर एस.एम.एस. करायला त्यासाठी लागणाऱ्या नेटपॅकला, प्रचारासाठी स्वत:च्या खिशातून पैसे काढून पॅम्प्लेट वाटायला याच्याकडे पैसे आहेत, पण गरीब लोकांना, दृष्काळग्रस्त कुटुंबीयांसाठी थोडी मदत म्हणून द्यायला पैसे नाहित या यंग लोकांकडे. ही परिस्थिती कुठेतरी बदलायला हवी. निवडणुकीच्या या मादक व्यसनामुळे सध्याचा युवा वर्ग बिघडत आहे. न कळत व्यसनाच्या, वाईट गोष्टीच्या आहारी जात आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे.

निवडणुकीतील तरुणाईचा सहभाग ही काळाची गरज आहे. कारण आजची तरुणाईच उद्याचा उज्ज्वल भारत घडवणार आहे. पण या तरुणाईत समाजसेवा, लोककल्याण, देशाची उन्नती याचा विचार व त्याचप्रमाणे प्रयत्न व कृती असली पाहिजे तरच आपला देश पुढे जाईल आणि निवडणुकीतला तरुणाईचा सहभाग, त्यांचं योगदान खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.

# माणुसकीच्या आपुलकीचं दालन - कुटुंब

✍..... कु. मनाली शिवाजी केसरकर
(बी.कॉम. भाग-२)

माणूसकीच्या पटलावर जीवन जगत असताना समूहाची कल्पना सर्वांनाच अनुभूतीतून मोलाची वाटली. त्यामागे आजपर्यंतच्या जीवनाचा 'सार' अंर्तभूत आहे. अनुभवाची सिद्धता स्पष्ट झाली आहे. म्हणून, 'जमलो आम्ही, जुळली मने' या मनांच्या सांधण्यात आपुलकीचे कुटुंब फुलले असे म्हणण्यात काहीच हरकत नाही. आई-वडील, मुले-मुली, भाऊ बहीण यासह अन्य रक्ताची नाती दिवसभर आपल्या व्यापातून सायंकाळी निवांत होऊन रंगलेल्या गप्पांचा संवाद एकमेकांतील आनंद वाटून घेणारा असतो. जीवनाच्या वाटचालीत हातात-हात घेऊन, सुख-दु:खाचे गणित सोडवित एकमेकांना आधार देत जगणाऱ्या नात्यांचा समूह म्हणजे 'कुटुंब' होय. हे कुटुंब आज 'छोटं कुटुंब - सुखी कुटुंब' होत चाललय.

सध्या विकसित होत चाललाय तो विभक्त कुटुंब प्रकार. भारतीय संस्कृतीतील संयुक्त कुटुंब ही संकल्पनाच लोप पावत चालली आहे. खेडे गावांमध्ये ही पद्धत मोठ्या प्रमाणात दिसून येत होती. अगदी हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच संयुक्त कुटुंबे आपल्याला आज पाहायला मिळतात. 'खेड्यांकडे चला' या गांधींच्या संदेशाचं आधुनिकीकरण होवून आज शहरांकडे चला असा संदेश निर्माण होतो आहे. 'एकी हेच बळ' असं आपण म्हणतो; पण संयुकत कुटुंबातील ही एकी आपण हरवत चाललेया. एकीच बळ आपल्याला पाहायचेच असेल तर, जनशेदजी टाटा-भारतातील एक प्रसिद्ध उद्योगपती यांना पाहा. यांनी त्यांच्या कुटुंबाच्या एकीवरच उज्ज्वल यश संपादन केलं आहे. यांच्यासारखी आणखी खूप उदाहरणं आपल्याला पाहायला मिळतील.

संयुक्त कुटुंबातील लोक पिढ्यान-पिढ्या एकत्र राहत होते. घरामध्ये एखादी अडचण निर्माण झाल्यास घरातील सर्वजण मिळून त्यावर चर्चा करून ती अडचण सोडविण्यासाठी प्रयत्न करीत. यातूनच घरातील प्रत्येक व्यक्तीशी एक मायेचं, प्रेमाचं असं अतुट बंधन तयार होत होतं. एकमेकांच्यात संवाद होत असे. संयुक्त कुटुंबामध्ये आजी-आजोबा, आई-वडील, काका-काकू असे मागील आणि पुढे जन्माला येणाऱ्या पिढीतील लोक एकत्र राहत असत. त्या वाड्यातील लगी आज शहरातील दहा बाय दहाच्या खोलीत लोप पावत चालली आहे.

घर बांधणं आणि इमारत बांधणं यामध्ये जमीन अस्मानाचा फरक असतो. घर बांधणं म्हणजे कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तीला एका छताखाली आणून त्यांच्या मनात एक सरळ भावबंध निर्माण करून, सुख-दु:खात एकत्र येवून, जीवाला जीव देणारी, विस्कटलेली रक्ताची नाती पुन्हा एकाच छताखाली आणणे आणि इमारत बांधणे म्हणजे दगड-माती-वीटा आणि महागडे साहित्य यांची रचना करून लोकांना आचंबीत करणारी दिखावू वस्तू उभी करणे. आज इमारतीचं प्रमाण वाढत चाललं आहे. घराचं प्रमाण कमी होत चाललं आहे. आपण आपलं घर सोडून, रक्ताची नाती सोडून त्या सिमेंट-काँक्रीटच्या महागड्या वास्तूत राहायला जातो आणि गावाकडचं घर हे पर्यटन स्थळाप्रमाणे वर्षातून एकदा पाहून जातो.

*'ऊन ऊन खिचडी, त्यावर साजूक साजूक तूप*
*वेगळं राहण्यातच नव्या पिढीला वाटतंय सुख।'*

संयुक्त कुटुंबातून बाहेर पडून आपण विभक्त कुटुंबाकडे चाललो आहोत. विभक्त कुटुंब पद्धती वाढण्यामागे अनेक कारणे आहेत. नोकरीमुळे शहरातच आपलं छोटं कुटुंब मांडलं जातं. दांपत्य आणि त्यांची अविवाहित मुले अशी स्वतंत्र कुटुंबाची रचना विकसित होत चाललेय. त्यामध्ये नवरा-बायको दोघंही सुशिक्षित, दोघंही नोकरी करणारे. मग आई-वडील दोघंही नोकरीला गेल्यानंतर उरतो प्रश्न घरातील लहान बाळांचा. त्यांना सांभाळणार कोण ? आजी-ओजाबा हे स्वतंत्र तरी असतात किंवा वृद्धाश्रमात मग मुलांना खेळविण्यासाठी पर्याय उरतो तो पाळणाघराचा. विभक्त कुटुंबामुळे नकळतच पाळणाघर आणि वृद्धाश्रम यांची संख्या वाढत चालती आहे. कारण ज्या वयात नातवंडं खेळवायची त्या वयात आपल्याच आई-वडिलांना आपण वृद्धाश्रमात पाठवतो आणि आपल्या मुलांना खेळवायला कोणी नाही म्हणून त्यांना पाळणाघरात पाठवतो.

पाळणाघर हे सुद्धा एक आश्रमच आहे ना. फरक एवढाच की, तिथे आपण मुलांना दिवसातले आठ-नऊ तास खेळण्यासाठी पाठवतो आणि वृद्धाश्रमातील आई-बाबांना कायम वास्तव्यासाठी.

आज पाळणाघर आणि वृद्धाश्रम यांची संख्य वाढत

चाललेय कारण, विभक्त कुटुंबांची संख्या वाढत चाललेय. आज प्रत्येकजण लग्नानंतर स्वतंत्र कुटुंब मांडतोय. लग्नाआधी आई-बाबा हवे असतात पण लग्न झाल्यावर त्या तिराहीत व्यक्तीसाठी आपण आपलं सर्वस्व, आपले आई-बाबा यांना सोडून स्वतंत्र राहत असतो. असं म्हणतात की, 'म्हातारपण हे दुसरं बालपण असतं.' मग ज्या आई-बाबांनी आपल्याला आपल्या पहिल्या बालपणात साथ दिली ज्यांच्यामुळे आज अपण अपलं तरुणपण पाहतोय त्यांच्या दुसऱ्या बालपणात मात्र आपण त्यांना स्वतंत्र ठेवतो. आपण असेच वागत राहिलो तर आपल्या शिक्षणाचा फायदाच काय ?

विभक्त कुटुंबामुळे फक्त आपला एकटेपणा वाढत चाललाय, मुलांचा एकटेपणा वाढत चाललाय. आई-वडील सतत त्यांच्या कामात मग्न असतात. मग मुलांना देण्यासाठी त्यांच्याकडे वेळ कमी असतो. मुलांचा एकटेपणा दूर व्हावा म्हणून घरी टी.व्ही. आणला जातो. कॉम्प्युटर, लॅपटॉप त्यांना दिला जातो. त्यावर तासून तास बसून आठ-दहा वर्षाच्या मुलांना देखील आज चष्म्याची गरज भासत आहे. आज दहावी झालेल्या प्रत्येक १० मुलांकडे मोबाईल आहे. या मोबाईलच्या फेसबुक आणि व्हॉट्सअॅपच्या दुनियेत मुलं इतकी रमून जातात की शेजारच्या घरी जाऊन बसून त्यांची चौकशी करायला त्यांना वेळ नसतो. आपण भले चंद्रावर गेलो-आलो पण शेजारच्या भल्या माणसाला भेटण मात्र होत नाही. ज्या व्यक्तीला आपण पाहिलं देखील नाही त्याच्याशी आपण फेसबुकवर तास-तासभर बोलत असतो पण शेजारच्या माणसाची साधी चौकशी देखील करायची नाही. हे केवळ दुर्दैव.

आज देशाला स्वातंत्र्य मिळून ६९ वर्षे झाली. या देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच कुटुंबांचं विभक्तीकरणही वाढत चाललय.

परकीय देश भारतीय संस्कृतीचा गर्व करतात. भारताची संयुक्त कुटुंबपद्धती त्यांच्या देशात नेण्याचा प्रयत्न करतात आणि आपला भारत मात्र आपल्याच संस्कृतीचा हात सोडून दुसऱ्या देशाच्या संस्कृतीत मिसळायच्या प्रयत्नात आहे. श्रीमती विमल लिमये यांनी आपल्या कवितेत लिहीले आहे -

*'घर असावं घरा सारखं, नकोत नुसत्या भिंती*
*तिथे असावा प्रेम, जिव्हाळा, नकोत नुसती नाती।'*

तो जिव्हाळा, ते प्रेम मिळण्यासाठी घरामध्ये त्या मोयची माणसं असावी लागतात, हे तत्व आपण विसरलोत का मग ? आपण मोठ मोठे बंगले बांधतो, बंगल्यात आठ-दहा खोल्या काढतो. पण त्या खोल्यांत माणस मात्र तीन किंवा चारच राहतात. 'घरं मोठी पण कुटुंब छोटी' होत चाललेत. त्या छोट्याशा कुटुंबामध्ये मस्ती करून घरी उशीर आल्यावर आई-बाबांना न सांगता हळूच दार उघडणारे आजी-आजोबा नसतात, की ममी-पप्पांना न सांगता हळूच खाऊसाठी पैसे देणारे काका-काकू नसतात. मग असतं तरी काय या छोट्या कुटुंबामध्ये ? तिथे असतो तो फक्त एकटेपणा आणि हा एकटेपणा दूर करण्यासाठी मग आपण मोबाईल, इंटरनेट, फेसबुक आणि व्हॉट्सअॅपच्या दुनियेत रमून जातो.

मग हे जर कमी करावयाचं असेल तर आपल्याला पुन्हा संयुक्त कुटुंब ही पद्धती आत्मसात करावी लागेल. संयुक्त कुटुंब ही काळाची गरज बनलेय असं म्हटलं तर काही ते चुकीचं ठरणार नाही.

परिस्थितीच्या जंजाळात अडकून आज हे 'छोटे कुटुंब-सुखी कुटुंब' या नावाखाली मी, माझं याच त्रिकोणात जगण्याचा आनंद घेत आहे. माणूस कुटुंब वत्सल असावा ही सर्वांची भावना असते. पण जगण्यात सर्वांच्याच तोकडेपणा येत आहे. कष्टाची वलये वढलेल्या निष्पर्ण वृक्षासारखी आणि राबत्यांची चापलुशी असे विदारक चित्र कुटुंबात पाहायला मिळते. म्हणूनच जगण्याच्या पटलावर गुलाल-बुक्क्याप्रमाणे आपल्या कुटुंबावर सुख उधळणाऱ्या नटसम्राटाला 'जगावं की मरावं' हा एकच सवाल घेऊन आपल्याच घरच्यांनी नाकारले म्हणून कष्टकऱ्यांचा आधार घेऊन जगाताना, स्वतःच्या वेदना घेऊन जगत असताना, इतरांच्या वेदनाही घेऊन निदान इतरांसाठी झिजण्यात आनंद मानावे लागले. जगता-जगता समाज कुटुंब बनण्याची शक्ती निर्माण झाली ती आपुलकीच्या जिव्हाळ्याच्या प्रेरकतेने होय.

याच प्रेरकतेतून पुन्हा एकदा संयुक्त कुटुंब निर्माण होण्याची गरज आहे.

## सुविचार

मृत्यूने जीवनाला विचारले, 'माझ्यापेक्षा तुझ्यावरच सारे प्रेम का करतात ?' जीवन उतरले, 'कारण मी मायावी सौंदर्य आहे, तर तू कटू सत्य आहेस.'

✍..... कु. सोनम श्रीराम गुप्ता
(बी.कॉम.भाग-३)

# २१ व्या शतकाकडे

✍..... अंकिता सदानंद दिवटे
(बी.एस्सी. भाग-१)

प्रत्येक माणसाच्या त्याच्या मनात एक कोलंबस दडलेला असतो. 'तो' सुपरिचित कोलंबस नवीन भू-खंडांचा शोध घेत होता. हा मनातला 'कोलंबस' स्वप्ननगरीचा अखंड शोध घेत असतो. भौतिक सुखं हात जोडून त्याच्यासमोर उभी असतात ती उगीच नाही... आज माणूस २१ व्या शतकाकडे जणू सांताक्लॉज म्हणून पाहत आहे तो सांताक्लॉज अत्युच्च सुखांचा खजिना लुटवणारा आहे. त्याची सारी नवीन स्वप्न तो सत्यरुपात आणणार आहे.

माणसाच्या आयुष्याचे प्रत्येक क्षेत्र सोन्याच्या झळाळीने चमकदर होणार आहे. आयुष्य ही सर्कस न राहता जादुमय होणार आहे. आकाशातील चंद्र, मंगळ, गुरु, शुक्र त्याचे दास-दासी होणार आहेत. स्वर्ग पृथ्वीवर आवतरणार आहे. पृथ्वीमातेनं नाकारलं तरी त्याच्या सर्व सुखसाधनांना साक्षात सूर्यदेव आपल्या ऊर्जेचें बळ देणार आहे. टी.व्ही. संगणक, धुलाई यंत्रे, दिवाबत्ती, व्हिडीओ फोन्स, स्वंयपाकघर इतकच नव्हे तर त्यांची वाहनेसुद्धा त्यावर चालणार आहेत. सूर्यदेवाच्या बरोबर पवनदेव, सागरदेव सारेच मानवाच्या सेवेत रूजू होणार आहेत. या साऱ्या ऊर्जांबळांनी त्याच्या जीवनाचा दर्जा अधिकच उंचावणार आहे... प्रदूषण दैत्याचा यामुळे पराभव होणार आहे.

लोकसंख्येचा भस्मासूर आज कितीही विकट हसू दे, २१ वे शतक त्याला स्मितहास्य करण्यास भाग पाडणार आहे. परग्रहाची वस्ती, इंटरनेटवरील बाजार खरेदी, बँक व्यवहार, घरात बसून चालवता येणारे कारखाने इतकेच काय Conect school.com म्हणजे घरच्या घरी शाळा... मग कशाला दिसेल रस्त्यावर गर्दी? कशाला होईल ट्रॅफिक जॅम? कशाला होईल पार्किंग प्रॉब्लेम? रस्त्यावरचं ओझं कमी झालं की काय हवं मग ? कॉम्प्युटर, कॉम्पॅक्ट सी.डी. आपल्या छोट्या पोटात अख्खी वाचनालये साठणार आहेत. कागदविरहित समाज आता अशक्य नाही...अद्भूत सेवा करणार आहे. दीर्घायुष्य होणार आहे.

दीर्घायुष्य ही दंतकथा न होता वास्तवता होणार आहे. 'शातायुषी' मासिक 'पंचशतायुषी' म्हणून प्रसिद्ध होणार आहे... 'काळयंत्रा' (time machine) च्या आधारे तर काळावरही मात करता येणं शक्य होणार आहे... रामाच्या पायांना प्रत्यक्ष स्पर्श करून, कृष्णाबरोबर मथुरेत दूध पिऊन, सम्राट अशोकाबरोबर कलिंग युद्धाचा संहार बघून, शिवाजी महाराजांबरोबर घोडदौड करून, आइनस्टाईन, न्युटन, गॅलिलिओ, एडिसन यांच्याशी shake hand करून येणं हाताचा मळ ठरणार आहे... आणि हो... पण म्हणून का तो सुखी होणार आहे' तसं पाहिलं तर निसर्गाचे चंद्र, सूर्य, तारे, जमीन, पाणी, फुले, झाडे, वारे, पक्षी... काहीच बदलले नाही, ते जसे बदलले नाहीत...

तसे मनातील हलकट भाव, धनलाभ वृत्ती, भांडखोर स्वभाव, त्याची कपटी निती... सारं तेच आहे रामायण, महाभारत त्यांनीच घडविली. व्यक्ती बदललाच्या वृत्ती त्याच राहिल्या ! यंत्रिकीकरणाने कोमल भावनांची वाफ होऊन, खारट क्षार आयुष्यात आले आहोत. जगण्यासाठी काम करत नसून माणूस कामासाठी जगत आहे... आशा-अकांक्षाचं, स्वप्नांचं, हावरटपणाचं रुपांतर होत आहे. सारी पृथ्वी सुवर्णमय करुनही मिडास राजाप्रमाणे तो तहानलेला आहे.

जीवनाच्या गाडीला २० व्या शतकातच खूप वेग आला आहे... ही सारी दृष्ट विकार, आचार, विचार यांची मलीन वस्त्र परिधारन करून जर मानवाने २१ व्या शतकात प्रवेश केला, षड्रिपूंना बरोबर येण्यास मज्जाव केला आणि परमेश्वराचे अस्तित्व मनोमन स्वीकारले तर सुखी माणसाला सदरा नक्कीच शिवला जाईल-अन्यथा -

*'कशास भाषा व्यर्थ बोलता*
*एकविसाव्या शतकाची ?*
*एक विसावाही न दिसावा*
*व्यथा आमुची शतकांची !'*

असंच म्हणावं लागेल.

# अन्नदात्याचे दुःख

✍..... अंकिता महादेव पोवार
(बी.एस्सी. भाग-१)

शेतकरी आपला अन्नदाता आहे. तो साऱ्या जगाला जगवतो. आज आपण त्याच्यामुळे पोटभर जेवत आहोत. शेतकरी शेतात राबतो. पण शेतकऱ्याला न्याय मिळत नाही. शेतकरी उन्हात नांगर फिरवत आहे. कधी आपण त्याचा चेहरा बघितला आहे का? शेतकऱ्याचा चेहरा नेहमी तेजस्वी असतो. शेतकऱ्याला आपण कधी विचारले आहे का? त्याची स्वप्ने काय आहेत? शेकऱ्याचे एकच स्वप्न असते. त्याला हिरवेगार शेत पाहायचे असते. त्याला त्याच्या कष्टाचे मोल मिळाले पाहिजे. आपण शेतकऱ्याच्या घरासमोरून जाताना नाकावर रुमाल धरतो. कारण आपल्याला शेणाचा वास येतो, पण आपल्याला कधी शेतकऱ्याने गाळलेल्या घामाचा व कष्टाचा वास का नाही येत?

जगात शेतकऱ्याला सन्मानाची वागणूक मिळत नाही. जसे एका नवविवाहितेला तिच्या सासऱ्याच्या मंडळी हुंड्यासाठी छळतात, तसेच आपले सरकार बळीराजाला छळत आहे ही वस्तूस्थिती आहे. सुमारे ७० टक्के भारताची लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. पण ह्या ७० टक्के शेतकऱ्यांसाठी आपले सरकार मदत करत नाही. बड्या-बड्या उद्योगपतींना मदत करण्यासाठी सरकारकडे पैसा आहे. कारण उद्योगपतींनी मदत कल्याणसाठी सरकारमधील लोकप्रतिनिधी निवडणूक लढतात. पण सरकार हे विसरत आहे की बळीराजामुळे आपण जगत आहोत.

आज आपला शेतकरी अनंत संकटांशी झुंज देत आहे. ज्यांच्या जमिनी घेऊन सरकारने धरणं बांधली त्या बळीराजाला हक्काचे पाणी व वीज मिळत नाही. त्याच्या पिकाला योग्य तो हमीभाव मिळत नाही. त्याच्या प्रत्येक हक्कासाठी त्याल संघर्ष करावा लागत आहे. ऊसाला चांगला हमीभाव मिळण्यासाठी त्याला दरवर्षी झगडावं लागतं. पोलिसांच्या लाठ्या सहन कराव्या लागतात. आज खासदार राजू शेट्टीमुळे महाराष्ट्रातील साखर कारखाने शेतकऱ्याच्या ऊसाला चांगला दर देत आहेत, पण उर्वरित भारताचं काय?

आजकाल शेतकऱ्याला निसर्गाची म्हणावी तशी साथ मिळेना. ह्या वर्षी शेतकऱ्याला भयंकर दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. कित्येक जनावरे चारा व पाण्याचा कमतरतेमुळे मरत आहेत. सरकार चारा छावण्यांसाठी पैसे जाहीर करते. पण ते शेतकऱ्यांपर्यंत पोचतात कुठं? आज दुष्काळी भागात सरकारमधील लोकप्रतिनिधी भेट देतात. मदत करण्यासाठी आश्वासनं देऊन जातात. कित्येक करोडो रुपयांचे पॅकेज जाहीर करतात. पण हा लाभ शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही. मधल्यामध्ये ही रक्कम मंत्री, आमदार, खासदार लोक गायब करत आहोत. हे उघड सत्य आहे. दुष्काळाची स्थिती खूप भयंकर आहे. कित्येक जनावरे पाण्याच्या आणि चाऱ्याच्या कमतरतेमुळे प्राण गमावत आहेत. शेतकरी पावसाच्या आशेने आकाशाकडे आशाळभूतपणे डोळे लावून बसला आहे. तरी शासन ह्या समस्यांवर मग गिळून गप्प आहे. त्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्या करत आहेत आणि आपण टी.व्ही. वर एकच बातमी वारंवार पाहत आहोत, ऐकत आहोत, की प्रत्येक शेतकरी कर्जात बुडून आत्महत्या करत आहेत. जर आपल्या देशातील पोशिंद्याची संख्या अशीच कमी होत गेली तर आपण पोटाला पैसे खाणार आहोत काय? शहरातील सुशिक्षित लोक खेड्यातील लोकांना आडाणी समजतात पण त्यांनीही एवढं लक्षात ठेवावं की शेतकरी शेतात राबतो म्हणून शहरातील लोक दोन वेळचे अन्न खाऊ शकतात.

आज शेतकऱ्यांना व त्यांच्या मुलांना पैशाच्या कमतरतेमुळे उच्चशिक्षण घेता येत नाही. त्यामुळे किमान त्यांच्यासाठी काही जागा. प्रत्येक महाविद्यालयात आरक्षित करता येतील का? हा विचार सरकारने करावा. गरीब शेतकऱ्यांचे दु:ख आपण का नाही जाणत? आपण यावर आवाज उठवायला हवा तेव्हाच आपला देश कृषीप्रधान देश म्हणून खऱ्या अर्थाने गणला जाईल आपले माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम ह्यांचे भारत महासत्ता होण्याचं स्वप्नं सत्यात येईल. ह्यात काही शंका नाही मित्रहो लक्षात ठेवा, जर शेतकरी सुखी तर आपण सुखी.



# पुस्तक वाचा, मस्तक सुधारेल

..... नीलम तुकाराम गोडसे
(बी.कॉम. भाग-३)

खरंच मला कळत नव्हतं, पुस्तक वाचणारी लोकं आगळीवेगळी का असतात? पण मी पुस्तक वाचल्याने आयुष्याला कलाटणी मिळते. पुस्तक वाचकाच्या मनामध्ये चीड निर्माण होते समाजात कसे वागावे याचे ज्ञान होते ? समाज कसा आहे ? त्यांचे जीवन काय आहे? गरीब-श्रीमंत यातील दरी याचा बोध होतो. माणूस कसा घडला पाहिजे हेही पुस्तक वाचनामुळे कळते.

काही वाचक मनोरंजक पुस्तके वाचतात. त्यामध्येही काही गोष्टी शिकंण्यासारख्या असतात. त्यामुळे माणसं बदलतात. काही वाचक राजकारणाची पुस्तके वाचतात. त्यांना त्याविषयी ज्ञान मिळते. म्हणजेच वाचक ज्या प्रकारचे पुस्तक वाचेल त्याचे ज्ञान त्यांना होते व त्याच्यात परिवर्तन होते. कोणतेही पुस्तक, कथा, कादंबरी वाचलो तरी त्यातील वाचकाला काहीतरी भावार्थ/आशय घेण्यासारखा असतो तो वाचक घेत असतो.

प्रत्येक लेखक पुस्तक लिहिताना त्या पाठीमागे काहीतरी योग्य हेतू ठेवूनच लिहितो. त्यातून वाचकाला चांगले ज्ञान व्हावे, त्याच्या मनामध्ये ते राहावे, त्याचा आशय त्याला सहज कळावा व त्याच्या मनामध्ये परिवर्तन होवो हा दृष्टिकोन ठेवून लेखक पुस्तक लिहितो.

वाचक हा कोणतेही पुस्तक वाचत असताना तन-मन-धन एकत्र करून वाचत असतो. त्यामुळे वाचकाच्या मनामध्ये पुस्तक वाचलेले लक्षात राहते. पुस्तक वाचक हा वाचन करत असताना मनाची एकाग्रता करून पुस्तक वाचताना पहिल्या दोन-तीन पानावरील वाचन करतान ते लक्षात राहत नाही पण पुढे वाचत राहिले की आपली एकाग्रता वाढत जाते आणि पुस्तके वाचत राहावे वाटते.

कॉलेजचे विद्यार्थी प्रेमाच्या कथा असलेल्या कथा, कादंबऱ्या व पुस्तके वाचतात. पण त्यामुळे प्रेम हे कसं होतं? त्याचे परिणाम काय? हे त्यामध्ये असते. त्यामुळे हे विद्यार्थी न बिघडता सुधारावेत अशा हेतूने लेखक ही पुस्तके, कथा व कादंबऱ्या लिहीत असतात. पण त्यासाठी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पुस्तकांचे वाचन करणे गरजेचे आहे. पण आजकालच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना व्हॉट्सअप, फेसबुक, इंटरनेट यामधून पुस्तके वाचायला वेळच कुठं आहे? यामध्ये सर्व विद्यार्थी गुंततात. पण मी असंही म्हणणार नाही ते वाईट आहे. त्याचा चांगला उपयोग केला तर चांगला आणि वाईट केला वाईट आहे. पण मला म्हणायचं आहे त्याबरोबर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचन करावे त्यांच्या आयुष्यात जे बदल घडायचे असतात ते कॉलेज जीवनात घडतात आणि पुस्तके वाचल्यामुळे त्याच्यात बदल होतात. पुस्तक वाचनामुळे फक्त मन परिवर्तन होत नाही तर आपली संस्कृती, आपली एकाग्रतेची क्षमता वाढते.

पण मला वाटतं पुस्तक वाचल्यामुळे जे सुख जो आनंद मिळतो जे संस्कार होतात ते व्हॉट्सअॅप, फेसबुक, इंटरनेट मुळे होत नाहीत. त्यामुळे सर्वांनी पुस्तक वाचन करणे गरजेचे आहे.

सध्या पत्र वाचनाची पद्धत ही बंद झाली आहे. एकमेकाच्या खुशालीच्या त्यानिमित्ताने का होईना पण लोक पात्र लिहायचे, वाचायचे. पहिल्या काळात पत्र वाचून लोकांना आनंद व्हायचा तो आता फोनवरून बोलून अथवा मेसेज मधून होत नाही.

आधुनिक काळात पुस्तकं हे रद्दी म्हणून वापरत आहेत पण ते चुकीचे आहे. पुस्तक वाचन करून ज्ञान मिळवायला उशीर लागतो पण ते ज्ञान वाचकाला अर्थपूर्ण व परिपूर्ण ज्ञान असते. त्यामुळे वाचकामध्ये परिवर्तन होते त्याचबरोबर मिळालेल्या ज्ञानामुळे आनंद होतो.

पुस्तक वाचनामुळे वाचकांच्या मनामध्ये चांगले विचार निर्माण होतात. पुस्तक वाचल्यामुळे वाचकाचे मस्तक सुधारते. मला इतकंच सांगायचं आहे जर आपल्याला समाजामध्ये चांगले वागायचे असेल, चांगले राहायचे असेल, आपला व्यक्तिमत्त्व विकास करायचा असेल तर वाचनाशिवाय पर्याय नाही. लोकांना, विद्यार्थ्यांना सुधारण्याच्या संधीही वाचनामुळे मिळत असतात. वाचकाच्या आयुष्याला कलाटणीही पुस्तक वाचनाने मिळते. पुस्तक वाचताना वाचकाची भावनाही प्रकट होते. लेखक ज्या भावनेने पुस्तक लिहितो त्या फक्त वाचकालाच कळतात. एकूणच या सर्व विवेचनावरून हेच सांगता येते. पुस्तक वाचा, मस्तक सुधारेल.



# आत्महत्या : एक संकट

..... बाळकृष्ण बाळू परीट
(एम.कॉम. भाग-२)

आदिशक्ती तुळजाभवानी, छ.शिवाजी महाराज, लोकमाता, धर्ममाता, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, फर्जेंद शहाजीराजे, धर्मवीर संभाजी महाराज, गुरूवर्य कै. शिवशाहीर बाबासाहेब देशमुख आणि मात्यापित्यांना नमन करून मी बाळकृष्ण परीट तुमच्याशी थोडं हितगुज करत आहे.

मंडळी डोळ्यातून पाणी येईल अशी ही सत्यकथा मी तुमच्याशी मांडत आहे. आजची पिढी आत्महत्या करून आपला जीव देत आहे. खूप वाईट वाटतं ऐकून, बघून आणि वाचून. का करतात ही तरुण मुलं-मुली आत्महत्या ? म्हणून मला तुमच्याशी थोडं बोलावसं वाटतं म्हणून मी हा लेख ह्या लोकांकरीता लिहीत आहे. मुले-मुली आत्महत्या का करतात ? हा एकच प्रश्न नेहमी मला सतावत असतो. म्हणून लेखनातून माझा विचार मी तुमच्यासमोर मांडतोय. हे दु:ख त्यालाच कळेल, ज्याच्याजवळची व्यक्ती आत्महत्या करून कायमची सोडून गेली आहे. कायमच्या आठवणी सोडून. पण मी एक सत्यकथा सांगतोय जी नुकतीच घडलेली आहे.

ती एकुलती एक 'ताई' घरातील लाडकी. बापाचं काळीजच जणू तळहाताच्या फोडाप्रमाणे बापनं जपली. घरची परिस्थिती गरिबीची होती, तरी ओव्हरटाईम करून बापानं तिला शिकविले. मुलगी शिकते आणि तिचे भाऊ मात्र बोंबलत फिरण्यात पटाईत. बापाच्या रोजच शिव्या खाणार अरे काम नाही धंदा नाही तरीही हे भाऊ कधी उपाशी राहिले नाहीत. याचं कारण एकच. त्यांची 'ताई' ती त्यांना गुपचूप जेवण आणून द्यायची. अशी ही ताई अभ्यासात हुशार, स्वयंपाकात हुशार, आईच्या हृदयाचं स्फंदनच जणू... बापासाठी जीव की प्राण आणि ती मंडळी वयामध्ये आली. स्थळ बघायला सुरूवात झाली. एका ठिकाणी जमलं आणि सुरु झाली त्या ताईच्या लग्नाची गडबड...

मंडळी त्या बापानं कर्ज काढलं काही झालं तरी तिचं लग्न थाटामाटात झालं पाहिजे. भावांचा उत्साह तर सांगायलाच नको. कारण त्यांच्या एकुलत्या ताईचं लग्न होतं ना? आईचा वरमाईचा तोरा तर सांगायलाच नको... लग्न अगदी थाटामध्ये पार पाडलं. ताईच्या सुखामध्ये आईच समाधान, बापांचं सुख जणू पोरीच्या सुखामध्ये, भावांचा आनंद ताईच्या सुखामध्ये... सगळे जणू तिच्याच सुखासाठी झटत होते आणि ती 'ताई' नांदायला गेली. ताईच्या लग्नाचं कर्ज फेडायचं म्हणून दोन्ही मुलं काम करायला लागली. बाप काम करतच होता. आठवण आली की सगळे ताईला फोन करायचे... आई, बाबा, दादा मी सुखामध्ये आहे असं तिच्याकडून ऐकलं की, काळीज कसं सुपाएवढं व्हायचं आणि एकेदिवशी अचानक फोन आला, ताईनं 'आत्महत्या' केली. ताईनं आत्महत्या केली या तीन शब्दांचा तप्त शिलारस कानामध्ये गेला. कोणाचाच विश्वास बसेना. बाप कोसळला. आई स्तब्ध झाली. भावांना काहीच कळेना...

लोक जमले, गाडी केली आणि निघाले. अरे, ज्या पोरीच्या लग्नात अक्षता टाकायला गेले होते तेच आता तिच्या शेवटच्या दर्शनाला निघाले. त्या ठिकाणी पोहचले, गर्दी झाली. समोर आपल्या लाडक्या ताईचं प्रेत पाहिलं आणि भावांनी आक्रोश केला. आईची किंकाळी फुटली, टाहो फुटला, काळीज चिरणारे ते दृश्य सर्वांनी जवळून पाहिले. अगं, ताई उठ ना... बाबा रागावले तर आता त्यांना शांत कोण करणार? ताई तू आम्हाला कधी उपाशी झोपू दिली नाहीस आणि तू मात्र कायमची झोपलीस? बाळा, उठ ना! आम्ही आलोय बघ, तुझे बाबा... तिरडी बांधली गेली. अन् ती लाडकी निघाली शेवटच्या प्रवासाला. सर्वांना सोडून गेली ती कायमचीच. ताई घरी नव्हती पण सासरला तर सुखात होती या भावनेनं जगणारं ते कुटुंब आता मात्र कोलमडून पडलं. आता आपली ताई आपल्याला कधीच दिसणार नाही. काही दिवसांनी तिनं आत्महत्या का केली? यांच कारण समजलं. अरे, तिच्या नवऱ्याला गाडी घ्यायची होती. तो म्हणत होता एक लाख रुपये बापाकडून आण. पण त्या पोरीला बापाची अवस्था माहीत होती. कर्ज काढून बापांन माझं लग्न केलंय. आता ते कर्ज फेडताहेत तर मी कसे पैसे मागू. तिचा रोज छळ व्हायला लागला. पण बाबांचा फोन आला की ती सांगायची मी सुखात आहे आणि एक दिवस आपल्यामुळे आपल्या बाबांना त्रास नको, भावांना त्रास नको आणि म्हणून त्या बहिणीनं स्वत:ला संपवून घेतलं. केली तिनं आत्महत्या? तिला दुसरा मार्ग नव्हता का? का संपवलं तिनं

आयुष्य? का देऊन गेली ती कायमचे दु:ख?

मित्रांनो हाच प्रसंग नाही तर असे हजारो प्रसंग आपल्या अवती भोवती घडतात. अरे, कित्येक मुलं, मुली, पुरूष, महिला अशा आत्महत्या करतात. केवळ एकच कारणामुळे. एका दु:खाने असं का करतात? आपण आपल्याला आलेल्या संकटाशी का लढत नाही का लगेच हार मानतो? अरे आपलं दु:ख आपलं संकट एवढं मोठं आहे की, लगेच जीव द्यावा? यासाठी माझ्या मित्रांनो, तुम्ही 'शिवचरित्र' वाचा... मग कळेल तुम्हाला की, संकटाशी कसं लढायचं ते. अरे, स्वराज्यावर चारही बाजूंनी संकट आलं. आता स्वराज्य संपणार... लाखोंची फौज घेऊन शायिस्तेखान, आबू तालीम लाल महालाला वेढा देऊन बसलाय... तीन वर्षे ? पन्हाळ्याला चाळीस हजार हषमांचा वेढा सिद्दी जोहरने घातलाय चार महिन्यापासून... अरे बहुतेक गडाला शत्रूचे पहारे लागले. मग आता काय करावं शिवाजी राजानं? आता सारं-सारं संपलं. आता स्वराज्य संपलं. अरे सगळं काही सपलं... पण तरीही यातून शिवाजी महाराज सही सलामत बाहेर पडले. अरे, तो अफजलखान आला, मिर्झाराजे जयसिंग आला, तो फतेहखान आला. आता काय करावं शिवाजी राजानं? तरीही शिवाजी राजे जिंकले. शत्रूच्या घरात, शत्रूच्या समोर हजारोंच्या पहाऱ्यामधये मृत्यूची वाट बघण्यावाचून पर्याय नाही, काय करावं त्या शिवाजी राजानं.. तरीसुद्धा शिवाजी महाराज आगऱ्याहून सुटले. वडिलांना ओलीस ठेवलंय. आईच कुंकू पुसलं जाणार. आता सांग शिवाजी, 'वडील' पाहिजे की 'स्वराज्य'? अरे, काय करावं त्या शिवाजी राजानं? तरी सुद्धा यातून शिवाजी राजे सुटले. एवढी संकटे शिवरायांवरती आली पण कधी मनाला विचारही शिवला नाही आत्महत्या करावी म्हणून? अरे, आम्ही उठता-बसता शिवाजी महाराज, शिवाजी महाराज करतो. पण त्यांचं गुण घेतो का आपण?

संकटे आली म्हणून शिवाजी महाराज कपाळला हात लावून बसले नाहीत, की आता मी काय करू? आता माझं कसं होणार, असं म्हणत ते कर्माला झोडत बसले नाहीत. अरे, प्रत्येक संकटांतून राजे शिकले, अनुभव घेतले, मार्ग काढले, वाटा शोधल्या आणि नव्या वाटा निर्माण केल्या. याच्यातून जन्म झाला तो छ. शिवाजी महाराजांचा... शिवबांचा. छ. शिवाजी होणे ही सामान्य बाब नव्हती. ही काटेरी वाट चालले. दु:ख सहन केलं, अपमान सहन केला आणि आम्ही... काय केलं? आणि आज आमची पोरं-पोरी आत्महत्या करतात. घरचे बोलले की कर आत्महत्या? बाहेरचे बोलले की कर आत्महत्या? शिक्षक बोलले, की कर आत्महत्या? कुणी अपमान केला तर कर आत्महत्या? अपयश आलं, कर आत्महत्या? कुणी मन तोडलं, कर आत्महत्या? अरे, कर्ज झालय कर आत्महत्या? पेपर अवघड गेला कर आत्महत्या? हट्ट पुरवला नाही कर आत्महत्या? टेन्शन आलं, कर आत्महत्या? बायकोनं त्रास दिला कर आत्महत्या? नवऱ्यानं छळलं, कर आत्महत्या? मुलगी झाली, कर आत्महत्या? अरे, झालं काय आत्महत्या करायला? आजचा पेपर वाचा, टी.व्ही. पहा. रोज कुठे ना कुठे, कुठल्या ना कुठल्या कारणानं कोणी तरी आत्महत्या करीत आहे. हे पाहिले, वाचले तरी काळजात अगदी धस्स होतं.

मित्रांनो, काय चाललय हे ! जीवन एवढे स्वस्त आहे का? आपण शिवाजी महाराज, संभाजी महाराजांच्या महाराष्ट्रात राहतोय आणि आत्महत्या करतोय यासारखं दुर्दैव ते तरी काय? अरे, काय शिकतोय आपण शिवाजी महाराजांकडून? कोणता आदर्श घेतला त्यांच्यापासून? काय प्रेरणा घेतली? मग कशासाठी करायची शिवजयंती ती पण तीन-तीन वेळा? अरे, का नाव घ्यायचं त्याचं? का जयजयकार करायचा? कधी याचा विचार करणार आहोत की नाही आपण. आपल्याला जेवढी संकटे आली त्यापेक्षा हजार पट्टीने संकटे छ. शिवाजींना आणि छ. संभाजींना आली. अरे, पण त्यांनी कधी 'आत्महत्या' करण्याचा विचार केला नाही. म्हणून माझ्या मित्रांनो 'शिवचरित्र' वाचा त्यांचे विचार आपल्या मनात रुजवा. स्वत:मधये बदल करा. शेवटी विजय त्यांचाच होतो. जे चांगले विचार करतात म्हणून आपण सर्वांनी तर याचा विचार करायला हवा ना आणि 'आत्महत्या' हे एक संकट थांबवायला हवा.

## वेळ

कामासाठी वेळ द्या
ते कष्टाचे फळ आहे.
ज्ञानासाठी वेळ द्या
ते यशाचे साधन आहे.
विचारासाठी वेळ द्या
ते प्रगतीचे स्थान आहे.
जीवनासाठी वेळ द्या
ते मनोरंजनाचे साधन आहे.

✍..... प्रमिला लक्ष्मण धुरे
(बी.कॉम.भाग-१)



# हवामान बदल आणि त्याचे मानवावरील परिणाम

✍..... अजित रघुनाथ पाटील
(बी.एस्सी. भाग-३)

*''परिवर्तना भवन्ति गच्छन्ति लभ्यन्ते च पुन: पुन: ।
पुन: कदापि नायाति गतं तु नवचैतन्यम् ॥''*

हवामानात बदल हे होतच असतात. ते बदल आणि त्याचे निसर्गावर व मानवावर परिणम हे होत राहतात. दक्षिण आशियाकडे हे सार्कच्या रजत महोत्सवी शिखर परिषदेचे सूत्र आहे. पण याचा आणि आपला संबंध काय? पॅरिसमध्ये ३० नोव्हेंबर २०१५ ते ११ डिसेंबर २०१५ दरम्यान संयुक्त राष्ट्र संघाची (युएन कॉन्फरन्स ऑन क्लायमेट चेंज) 'वातावरण बदल परिषद' झाली आहे. या परिषदेसाठी २०३० पर्यंत कार्बन नियंत्रणासाठी करावयाचे उपायांचा तपशील गेल्या ऑक्टोबरमध्ये पाठविला होता.

जगातील एक दशांश लोकसंख्या हिमालयातील जलस्त्रोतांवर अवलंबून आहे. हवामानातील बदल हा जागतिक तापमाना वाढीमुळे होणारा सर्वात मोठा बदल आणि चिंताजनक परिणाम आहे. गेल्या काही वर्षात जागतिक तापमानवाढीमुळे हिमालया बरोबरच शतकानुशतके लागून असलेली हिमखंडेही वितळू लागले आहेत. हिमनद्या वेगाने वितळत असल्याने सागराच्या पाण्याची पातळी वाढत आहे. त्यातून काही कमी उंचीच्या बेटांना जलसमाधी मिळाली आहे. काही त्या मार्गावर आहेत.

समुद्राच्या पाण्याचे तापमान हा एक महत्त्वाचा घटक आहे. या घटकामुळेच एखाद्या खंडाच्या भागात किती पाऊस पडणार, कधी पडणार हे ठरते. तसेच त्या खंडाचे तापमान किती राहणार हे देखील ठरते. महासागरातील गरम व थंड पाण्याचे प्रवाह या तापमान घटकामुळे काम करतात. युरोपला अटलांटिक महासागरातील गल्फ-स्ट्रीम या प्रवाहामुळे उबदार हवामान लाभले आहे. पाण्याचे तापमान वाढल्याने बाष्पीभवनाचे प्रमाण वाढते, यामुळे पावसाचे प्रमाण, चक्री वादळांची संख्या व त्यांची तीव्रता वाढलेली आहे. २००५ मध्ये अमेरिकेत आलेल्या 'कतरिना' या चक्रीवादळाने हाहाकार माजवला. त्याच वर्षी जुलै २६ रोजी मुंबईत व महाराष्ट्रात 'न भूतो' असा पाऊस पडला होता. युरोप व अमेरिकेत देखील पावसाचे प्रमाण वाढले आहे. परंतु बर्फ पडण्याचे प्रमाण लक्षणीय रित्या कमी झाले आहे व पूर्वीप्रमाणे थंडी अनुभवयास मिळत नाही हा तेथील लोकांचा अनुभव आहे. परिणामी दुष्काळांचे प्रमाण वाढले आहे. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर असे परिणाम दिसत आहेत. तर ईशान्य भारतात देखील पावसाचे प्रमाण कमी होण्याचे भाकित आहे. तर थारच्या वाळवंटात पावसाचे प्रमाण वाढेल असे भाकित आहे. थोडक्यात हवामान बदल अपेक्षित आहेत.

हवामानातील बदल युरोप व अमेरिकेसारख्या देशात स्पष्टपणे दिसून येतील. इटलीमध्ये भूमध्यीय समुद्रीय वातावरण आहे. असेच वातावरण तापमानवाढीमुळे फ्रान्स व जर्मनीमध्ये पश्चिम युरोपीय हवामान प्रकारच्या देशात अनुभवणे शक्य आहे. वाळवंटाचीही व्याप्ती वाढणे हवामनातील बदलांमुळे अपेक्षित आहे.

महासागराच्या पाण्याच्या तापमानात बदल झाल्याने महासागरातील महाप्रचंड प्रवाहांच्या दिशा बदलण्याची शक्यता आहे. गल्फ स्ट्रीम व उत्तर अटलांटिक प्रवाह बदलल्यास युरोप व अमेरिकेचे तापमान यात बदल होवून तेथे हिमयुग अवतरण्याची शक्यता आहे.

गेल्या अडीचशे वर्षापासून वातावरणात कार्बनचा थर निर्माण झाल्यामुळे उष्ण हवा बाहेर पडण्याचा मार्ग बंद होतो. परिणामी तापमान वाढते. त्यामुळे 'ग्लोबल वार्मिंगचे' भूत जगाच्या मानगुटीवर बसले आहे. नैसर्गिक हरितगृह वायूंच्या प्रमाणात वाढ झाल्याने या समस्या निर्माण झाल्या आहेत.

*''वसुंधरा भिजली ओलीचिंब झाली,
पावसाच्या एकेक सरीला चातकावाण आतुरली''*

ऋतुचक्र बदलल्याने त्याचा परिणाम पावसावर देखील झाला आहे. कोरडे टापू अधिकच शुष्क होत चालले आहेत. परिणामी शेती ओसाड दिसत आहे. पिकं करपून निघाली आहेत. दुष्काळाची परिस्थिती जाणवत आहे. याचवर्षी बघा ना, मराठवाडा, विदर्भ भाग कोरडा पडला आहे.कमी पावसाने धान्याच्या उत्पादनात कमालांची घट झाली आहे.

उष्ण कटिबंधातून थंडी नामशेष होत चालली आहे.

ओझोनच्या थरात भोक पडल्यामुळे जगात किरणोत्सर्ग वाढत आहे. ही भाषा तांत्रिक वाटली तरी घरात बसलेल्या प्रत्येक व्यक्तीला या हवामान बदलाचे फटके बसलण्यास सुरूवात झाली आहे आणि हे समजून घेणे आता क्रमप्राप्त झाले आहे.

वातावरणांचा परिणाम एकूण पर्यावरणावर होत असतो. शिवाय याचा परिणाम मानवी आरोग्यावरही होत आहे. वातावरणाच्या बदलाच्या परिणामामुळे मानवाची लैंगिक क्षमता कमी होत असल्याचा दावा अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी केला आहे. लैंगिक क्षमता कमी झाल्याने अमेरिकेतील जन्मदर घटल्याचेही नमूद केले आहे.

वातावरणातील बदलामुळे पृथ्वीवरील तापमान वाढत आहे. त्याचा परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे. डोकेदुखी, शारीरिक थकवा, शरीराचे बाह्य तापमान वाढणे, त्यांचा परिणाम लैंगिक क्षमतेवर होत आहे. उष्णतेत वाढ होत असल्याची कारणे या लैंगिक क्षमतेशी संबधित आहेत.

जन्मदर हा नेहमीच घटत किंवा वाढत असतो. त्याची विविध कारणे आहेत. संतती नियमन, कुटुंब नियोजन, महिलांचे व्यवसायाला अधिक महत्त्व देणे. आदि कारणामुळे जन्मदर घटत असतो. लोकसंख्येचा भस्मासूर रोखण्यासाठी हे योग्य आहे. वातावरणातील बदल, जागतिक तापमानवाढ यामुळे मानवाची कार्यक्षम क्षमता कमी होत आहे. असा दावा अमेरिकेतील नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनॉमिक्स रिसर्चचे सदस्य ॲलन बॅरेका करतात.

उष्णता वाढत असल्याने त्याचा परिणाम लैंगिक समतेवर होत आहे. त्यास पर्यावरणाचा होणारा ऱ्हास जबाबदार असल्याचा अंदाज ॲलन सांगतात जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी आपण काही उपाय केले पाहिजेत. नेतृत्वाखाली एक पथक वातावरणातील बदलाचा अभ्यास करत आहे. थड हवामानामुळे लैंगिक क्षमता वाढते. तर उष्ण वातावरणामुळे लैंगिक क्षमता कमी होते.

जीवितहानी आणि रोगराई हे वातावण बदलामुळे होणारे सर्वात मोठे परिणाम आहेत. पूर, अवर्षण, त्सुनामी, उष्ण लाटा, उष्माघात आणि इतर काही नैसर्गिक आपत्ती हवामान बदलामुळे येत असतात. त्यामुळे हजारो लोक मारले जातात. २००४ च्या आशियन त्सुनामीत २८८०००० लोक मारले गेले. तर २००३ च्या युरोपियन उष्ण लाटामुळे फ्रान्सच्या १५००० लोकांना जीव गमवावा लागला. उष्ण तापमानाचा परिणाम जास्त प्रमाणात वृदध तसेच शेतकरी आणि उन्हात काम करणाऱ्या कामगारांवर होत असतो. हवामान बदलामुळे मलेरिया, कॉलरा इ. रोगांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे रोगराई वाढत आहे. तसेच दवाखान्यातून रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. तसेच हवामान बदलामुळे कुपोषणाचा वाढता दर तसेच मानसिक अस्वस्थता इ. समस्या समोर येत आहेत. शेतकऱ्यांना कमी पावसाच्या परिणामाने अन्नधान्य कमी मिळाले. त्यामुळे देशातील काही लोक भुकेने तर लहान मुलं कुपोषणाला बळी पडत आहेत. पूर, अतिवृष्टी, वादळी वारे यामुळे काही लोकांनी आपली घरे, आपली कुटुंब, तसेच मालमत्त गमावली आहे. असे लोक मानसिक दबावाखाली येतात. त्यांच्यातील जगण्याची उमेद नाहीशी होते.

हवामान बदलाचा परिणाम समाज तसेच आर्थिक विकासावरही होत असतो. कमी पावसाने सध्या मराठवाडा, विदर्भात पाण्याचा तुटवडा भासत आहे. एकट्या बीड जिल्ह्यात ४९३ टँकरनी पाणीपुरवठा करावा लागला. तसेच दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. परिणामी नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यासारख्या अभिनेत्यांना दुष्काळग्रस्त कुटुंबांची आर्थिक मदत करण्यासाठी 'नाम' सारख्या संस्थेची स्थापना करावी लागली आहे.

भूतानमध्ये थिंम्पू येथे रजत महोत्सवी शिखर परिषद पार पडली. यामध्ये भूतानने आपल्या विकासाची काही कारणे सांगितली आहेत. मानवाने आपली कौशल्ये पणाला लावून आर्थिक सुबत्ता मिळविली. त्याचा परिणाम हवामानावर होऊन उलट त्याचे दुष्परिणाम मानवाला भोगावे लागले. यामुळे मानवाच्या आरोग्याला, गुणवत्तापूर्ण जीवनाला तिलांजली मिळाली आहे. जैविक विविधेबरोबर मानवाचे जीवन संकटात आले आहे. भूतानने आर्थिक विकासाला प्राधान्य देणे टाळले आहे. भूतानने जंगले राखली आहेत. भूतान हा ऋण कार्बन देश आहे.

तसेच हवामानाबदलामुळे होणाऱ्या या निसर्ग व मानवावरील परिणामांना आपण सामोरे गेले पाहिजेत. आपल्याला सर्वांच्या हितासाठी आर्थिक विकासाची वेगळी वाट रचता आली पाहिजे. ज्यामुळे आपल्या चिरंजीवी विकासाला प्राधान्य मिळेल.



# मैत्री - एक गरज

✍..... वैभव मनोहर रेडेकर
(बी.कॉम. भाग-३)

माझ्या मते ज्याला कुणी मित्रमैत्रिणी नाहीत अशी एकही व्यक्ती शोधून सुद्धा मिळणार नाही. प्रत्येकाला मित्र-मैत्रिणी या असतातच आणि हवेतच. प्रत्येक विद्यार्थ्याला मित्र-मैत्रिणी असावेत म्हणजे त्या विद्यार्थ्यांची भावनिक घुसमट होत नाही.

मैत्री कधी पटकन होते तर कधी थोडा कालावधी लागतो. अगोदर ओळख. नंतर एकमेकांवर हक्क. अधिकार सांगण्यापर्यंत आपली मैत्री होत असते. विश्वासाच्या रेशीमधाग्यांनी ही मैत्री बांधली जाते. मग एकमेकांवर रागावणे, रडणे नंतर थोड्यावेळाने रूसवे, फुगवे दूर करणे एकमेकांच्या भावना समजावून घेणे व सुख-दु:ख सांगून मन हलके करणे, त्याच्या खांद्यावर डोके ठेवून दबलेल्या अश्रूंना वाट करून देणे. ज्या गोष्टी आपण आपल्या नातलगांना, वडीलधाऱ्यांना, भावंडांना सांगू शकत नाही अशा गोष्टी मनातून वाहू देण्याचं ठिकाण म्हणजे मैत्री होय.

मैत्री म्हणजे सुख-दु:खाचे वाटेकरी. मैत्री म्हणजे जीवनाची आधारशिडी. मैत्री ही एकतर्फी असूच शकत नाही. मैत्री वाढवताना दोन्ही बाजूंनी साद-प्रतिसाद हवा. आपण दिलेल्या सादाला थोडातरी प्रतिसाद हवाच. त्याच्याशिवाय प्रतिसाद होऊच शकत नाही.

माझी मैत्री म्हणजे एक जीवन. पण त्याला समाजाचा सहवास असतो. मैत्री म्हणजे जीवनाला कलाटणी देणारे सहप्रवासी. पण त्याला मित्र-मैत्रिणींचा सहवास असतो. पण ही मैत्री टिकवत असताना आपण आपल्या स्वार्थसाठी कधीच मैत्री करू नये. मैत्री नि:स्वार्थी मनाने करावी. जो निस्वार्थी मनाने मैत्री करतो त्याची मैत्री कायमस्वरूपी टिकते व अतुट बंधनासारखी राहते. फायद्यासाठी जी मैत्री केली जाते ती खरी मैत्री नव्हे. तिला फक्त ओळख म्हणता येईल. मैत्री म्हणजे सुख-दु:खात सहभागी होणे. ज्यांना खरी मैत्री कळत नाही, त्यांनी आपला दृष्टिकोन बदलून पाहावा. जेव्हा कळेल मैत्री सारखा आनंद संपूर्ण जीवनात नाही. मैत्रीमुळे मानसिक आधार मिळतो.

मैत्री अशी असावी की प्रत्येक सुख-दु:खात मदत आणि साथ देणारी. जी आपल्याला प्रत्येक संकटातून बाहेर काढेल. प्रत्येक दु:खावर एक क्षणात उपाय शोधून काढणारी असावी. प्रत्येक संकटातून हसत हसत मात देणारी पाहिजे. ज्यामुळे आपल्या आयुष्यामध्ये सतत ही भावना रहावी की जिवाला जीव लावणारं एकच अतुट नातं म्हणजे मैत्री.

*'डोळ्यातील पाणी पुसायला,*
*खुदकन गाली हसायला,*
*गुणांचे रोप वाढवायला,*
*दोषांची किड काढायला,*
*मैत्री ही हवीच...'*

असे म्हणतात की, 'संकटकाळी मदत करतो. तोच खरा मित्र.' पण असले हे मित्र-मैत्रिणी प्रत्यक्षात अडचणीच्या प्रसंगी लांब पळतात. खऱ्या मैत्रीत कुठलीही वासना, स्वार्थ व अहंकार नसतो. मैत्रीत नकारही देता आला पाहिजे व दुसऱ्याने तो न रागावता स्वीकारलाही पाहिजे. मैत्रीचं नातं हे निर्मळ, स्वच्छ असलं पाहिजे. दु:खाच्या वेळी आपल्याला आपलं मन ज्याच्याजवळ व्यक्त करावसं वाटतं तो म्हणजे आपला मित्र. आपल्या मनातील भावना न सांगताच ओळखतो तो म्हणजे मित्र. मैत्री ही मुद्दामहून केली जात नाही तर ती आपोआप, सहज होते. मैत्रीत फक्त देणं असतं घेणं नसतं. मैत्रीत असतं ते समजावणं व हक्कानं रागावणंही. आजकाल अशी मैत्री सापडतच नाही.

आपण देशदेशात पाहतो, ती केवळ स्पर्धा, स्वार्थ व द्वेष हे सगळं थांबवायचं असेल तर शत्रूत्वाचा विचार सोडून मैत्रीचे संबंध दृढ केले पाहिजेत. त्यामुळे मैत्री ही हवीच... कोणीतरी

म्हटलं आहे, 'मैत्री असावी मनातील भावना जपणारी. सुख-दु:खाच्या प्रत्येक क्षणी, आपलेपणाची साथ देणारी.'

दु:खाच्यावेळी आपल्याला गरज असते ती आधाराची, आपुलकीची व मायेच्या स्पर्शाची आणि ती गरज पूर्ण करण्याचे ऐकमेव साधन म्हणजे मैत्री... त्यामुळे आपल्या जीवनात मैत्री ही हवीच... मैत्री ही हवीच...

*मैत्री अशी असावी*
*भरकटलेल्या पाखराला*
*घराची वाट दाखवणारी*
*सुकलेल्या फुलांना बहर आणणारी*
*दु:खाच्या वाळवंटात*
*प्रेमाचा पाझर आणणारी*
*एकटेपणाला सहवासाला*
*दिलासा देणारी*
*शब्दाविणा सर्व काही*
*समजून घेणारी*
*न सांगताच डोळ्यातील*
*भाव ओळखणारी*
*अशी असावी मैत्री...*
*अशी असवी मैत्री...*





# राष्ट्रीय मतदार दिन

✍..... सिद्धलिंग वि. हिरेमठ
(बी.ए. भाग-१)

आपला देश हा लोकशाही देश आहे आणि लोकशाही देशामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या विचाराला अत्यंत महत्त्व (मोल) आहे. लोकशाहीची व्याख्या अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी अशी केली आहे. 'लोकशाही म्हणजे लोकांचे लोकांसाठी आणि लोकांनी चालवलेले शासन होय.' लोकशाहीचा जुना इतिहास हा प्राचिन ग्रीसशी संबंधित आहे. जगात अनेक देशात लोकशाही पद्धतीचा वापर केला जातो. यात प्रामुख्याने इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, पाकिस्तान इ. देशांचा समावेश होतो. जगात इंग्लंडने सर्वत्र राज्य केले. त्यांच्या देशात त्यावेळी लोकशाही शासन प्रणाली प्रचलित होती. त्यामुळे सर्व राष्ट्रांनी याच पद्धतीचे अनुकरण केले.

भारतीय राज्यघट : कारांनी आपल्या देशातील नागरिकांना मतदानाचा अधिकार दिलेला आहे. कारण नागरिकांद्वारे एक उत्तम सरकार चालविण्याच्या हेतूने लोकशाही प्रणालीमध्ये नागरिकांच्या मताला अनन्य साधारण महत्त्व दिलेले आहे. ज्या देशात जेवढे नागरिकांचे मताधिकार जास्त, तेवढी त्या देशातील लोकशाही अधिक सक्षम असे समजले जाते. या प्रकारे भारतात मतदानाचा अधिकार प्राप्त झालेल्या नागरिकांचे प्रमाण जास्त असल्याने जगातील एक सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताला ओळखले जाते. भारतीय संविधानाच्या कलम ३२५ व ३२६ मध्ये मानसिक विकाराने ग्रस्त, अपराधी अशा व्यक्तींना वगळून २१ वर्षे वय पूर्ण असलेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार दिलेला आहे. कोणताही नागरिक हा लिंग, वंशभेदाच्या कारणाने मतदानापासून वंचित राहू शकत नाही. संविधानापूर्वी भारतात १९१९ ला मतदारांचे प्रमाण १४% इतके होते. त्यावेळी मताधिकारासाठी अनेक नियम, अटी होत्या. त्यावेळी विशेष स्थिती असलेल्या व शिक्षित व्यक्तींनाच मतदानाचा अधिकार होता. पुढे १९८९ साली ६१ वी घटना दुरूस्तीने नागरिकांच्या वयात घट करण्यात आली ती २१ वरून १८ वर्षे करण्यात आली.

मतदान करणे व प्रतिनिधी निवडून देणे हा नागरिकांचा हक्क आहे आणि हा हक्क सर्वांना समान असतो. जात, वर्ग, धर्म, वर्ण किंवा स्त्री-पुरूष असा फरक न करता सर्वांना मतदानाचा हक्क दिलेला आहे. म्हणून याला प्रौढ मताधिकार म्हणून आपण ओळखतो.

घटनाकारांनी राज्यकारभार चालविण्यासाठी लोकप्रतिनिधींची निवड करावी यासाठी मतदानाचा अधिकार आपल्याला दिलेला आहे. आपण आपल्या मताचा वापर करून आपल्याला हव्या त्या व्यक्तीची निवड करू शकतो. जर आपण मतदान केलेच नाही तर, आपल्याला जो उमेदवार योग्य वाटेल तो निवडून येईलच असे नाही. जर आपण मतदान केले तर तीच व्यक्ती निवडून येईल असेही नाही. जी व्यक्ती राज्यकारभार करण्यासाठी सक्षम, कुशल नेतृत्व व कार्यतत्पर, विश्वासू आहे अशा व्यक्तीला नागरिक आपल्या मतदानाद्वारे निवडून देतात आणि अशा प्रकारचे नेता, उमेदवार निवडून येण्यासाठी प्रत्येकाने मतदान करणे गरजेचे आहे. काही वेळा उत्कृष्ट राजकीय नेते एका-एका मताने पराजित होतात आणि त्यांना आपल्या पदाला मुकावे लागते. अशा अनेक घटना आपल्या देशात घडलेल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीचे एक मत हे आपले देशाचे भवितव्य घडवित असते. त्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकांने मतदान करणे गरजेचे आहे.

देशात राजनिती संबंधी लोकांच्या मनात उदासिनता आहे हे पाहून २५ जानेवारी हा दिवस मतदारांना जागरूक करण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. असा संकल्प आपल्या सरकाने घेतलेला आहे. पण, काय याच्याने मतदारांच्यात जागरूकता आणली जाईल का ? थोडक्यात नाही. कारण भारतात पाणी जोपर्यंत डोक्याच्या वर जात नाही तोपर्यंत जागरूकता आणली जात नाही. मतदानाच्या दिवशी काही लोक मतदान करतात तर काही लोक मतदानाच्या सट्टीचा मतदान न करता मौजमजा करण्यासाठी, प्रवासात घालवतात काही दिवसांनी राजकारभारात भ्रष्ट घडले तर नेत्यांच्या नावाने शंख मारतात पण प्रत्यक्ष तो नेता त्या पदावर जाण्यासाठी हे लोक स्वत: जबाबदार असतात. याचा विचार कोणीही भरत नाही. सरकार आपल्यासाठी निवडणूका घेत असते. परंतु त्यांचा सदुपयोग करणे हे आपले कर्तव्य आहे. कारण आपण जर जागरुकतेने मतदान केले तर आपल्याला एक सक्षम, कर्तबगार नेता लाभेल. अन्यथा वाईट विचाराचे भ्रष्ट लोक निवडून येतील. हा समाज भ्रष्टाचारी होईल

त्यासाठी प्रत्येकाने मतदान हे केलेच पाहिजे.

निवडणूका ह्या फक्त सत्ता बदलण्याच्या यांत्रिक आणि औपचारिक घटना राहिलेली नसून ती अती संवेदनशील बाब बनली आहे. आजपर्यंत सत्तेच्या बाहेर राहिलेले अनेक घटक जागे होत आहेत आणि नव्याने भाग घेऊन निवडणूकीत हस्तेक्षप करू लागलेले आहेत. निवडणूक प्रक्रियेचे स्वरुपच आज पूर्ण बदललेला आहे. केवळ निवडणूक प्रणाली कायदेशीर चौकट किंवा मतदनाची आकडेवारी सांगून निवडणक क्षेत्रातील या बऱ्यावाईट बदलांची ओळख होऊ शकत नाही.

नव्वदी नंतरच्या दशकात भारतीय राजव्यवस्थेचे झपाट्याने बदल झाली आहेत. आजच्या राजकारणात अनेक पक्ष उदयास आलेले आहेत मग ते प्रादेशिक असोत वा राष्ट्रीय प्रत्येक पक्षाला या देशात, राज्यात आपले सरकार, सत्ता असावी असे वाटते. सत्तेशिवाय आपण काहीही करू शकत नाही. अनेक पक्ष ह्या समाजाच्या अडचणी नागरिकांसमोर ठेवून निवडून येतात तर काही पक्ष हे सत्तेच्या काळात केलेल्या कार्याने निवडून येतात तर काही पक्ष हे दहशत माजवून निवडून येतात म्हणून सध्या सारे विश्व कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे व आपला देश त्या प्रकारचे प्रयत्न करत आहे का? आपल्या देशातील नेते जबाबदारीने कार्य करतात का? हे सर्व पाहून आजच्या मतदाराने मतदान केले पाहिजे. पण आपल्या देशात राजकीय नेते, पक्ष किंवा निवडणुकीस पात्र व्यक्ती मतदारांमध्ये जाती, धर्म, वर्ण, समाज, प्रदेश यांच्यात फूट पाडून निवडून येण्याचा प्रयत्न करतात. आपल्या राष्ट्रात अशी एक परंपरा रूजलेली आहे की हिंदू-हिंदू व्यक्तीला, मुस्लिम-मुस्लिम व्यक्तीला, दलित-दलित व्यक्तीला अशा प्रकारे मतदान करतात यासाठी याचाच फायदा घेऊन हे लोक निवडून येतात पण आपल्या नागरिकांनी असे न करता आपण सर्व एक आहोत आणि 'एकीचे बळ हे सर्वश्रेष्ठ असते' हे समजून प्रत्येकांनी आपले मतदान करावे.

सध्याचे नागरिक हे मतदानासाठी पैसे घेतात याचाच अर्थ ते आपले मत विकतात आणि मत विकणे म्हणजेच आपण स्वत:ला विकून घेणे आणि पुढील व्यक्ती सांगते त्या प्रमाणे करणे. पण मतदान या शब्दातच याचा अर्थ दडलेला आहे. आपले मत, विचार ज्या व्यक्तीच्या विचारांशी जुळतील त्याला दान करणे. आपण त्याला स्वमर्जीने दान करून निवडून देणे. यामुळे तो आपल्या मागण्या, अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहतो. पण आपण मत विकले असेल तर तो आपल्याला आपली जागा लगेच दाखवतो. तो म्हणतो तुझी किंमत मी तुला पूर्वीच दिलेली आहे. समाजातील प्रत्येकाने मत विकल्याने निवडून आलेली व्यक्ती भ्रष्टाचारी बनते आणि व्यक्ती राजकारणात भ्रष्टाचार वाढवू शकते. त्यासाठी कोणत्याही व्यक्तीने आपले मत विकू नये. मत हे दान करावे.

आपल्या राज्यघटनाकरांनी सर्व बाबतीत स्वातंत्र्य दिले आहे. राज्यकारभार कशाप्रकारे चालवावा हेही सांगितलेले आहेत. मताधिकार दिलेले आहेत पण मतदान न करणाऱ्यांबाबत कोठेही कांहीही उल्लेख केलेला नाही. याचाच फायदा मतदान न करणारे नागरिक घेतात. आपण मतदान करत असताना इलेक्ट्रॉनिक मशिनवर त्या उमेदवारांचे नाव व चिन्ह असते यांच्यापैकी जर एकही उमेदवार आपल्याला पसंद नसेल तर त्या सर्व मतदारांच्या नंतर सर्वात खाली एक बटण असते ते दाबावे याचाच अर्थ आपल्याला वरील कोणतेही उमेदवार या पदासाठी पात्र नाहीत असा होतो. म्हणजेच जरी आपल्याला उमेदवार पसंद नसेल तरीही आपण मतदानाला जावे व आवश्यक वाटल्यास नापसंतीचे सर्वात शेवटचे बटण दाबावे. मतदान करताना जागरूकतेने मतदान करावे. एकूणच मतदारांना मतदानाचे महत्त्व लक्षात यावे यासाठी २५ जानेवारी हा दिवस मतदार दिन म्हणून पाळूया. आजच्या काळात मतदान हे सक्तीचे केले पाहिजे. तरच लोक शुद्धीवर येतील नाहीतर याच्याशी आपला काहीही संबंध नाही असे वागतील. जर आपण या देशाचे एक जबाबदार नागरिक असाल तर अवश्य मतदान करा. आपले मत हे अनमोल आहे.

# आठवणीचा पाऊस

गेलेले दिवस कधी
परत नाही येणार...
पाऊलखुणा मैत्रीच्या
तशाच राहणार...
माहीत नाही मित्र-मैत्रीण
पुन्हा कधी भेटणार...
पण आठवणीच्या पावसात
डोळे नक्की भिजणार...

..... कु. पूजा रामा कोचरी
(बी.कॉम.भाग-३)

# पुरोगामी विचाराची हत्या

✍..... शुभम बाबासाहेब चौगुले
(बी.कॉम. भाग-३)

१७ फेब्रुवारी, २०१५ चे वर्तमान पत्र वाचले अन् धक्काच बसला. कारण होते पुरोगामी महाराष्ट्रावर झालेलया भ्याड हल्ल्याचे. या लोकांनी तर एका मोठ्या वृक्षाच्या फांद्या तोडल्या नाहीतर ते संपूर्ण झाडच तोडले. पानसरे सरांसारखा पुरोगामी विचाराच्या माणसावर झालेला हल्ला हा फक्त पनसरे सरांवरचा नसून तो संपूर्ण पुरोगामी महाराष्ट्रावरचा हल्ला होता. या हल्ल्यात त्यांना आपला जीव गमवावा लागला. मी प्रथम त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.

कोल्हापूर म्हटले की आपल्यासमोर काही चेहरे चटकन उभे राहतात. शाहू महाराज हा चेहरा तर संपूर्ण भारताला परिचयाचा आहे. हे वेगळे सांगायचे गरज नाही. पण त्याचबरोबर मला म्हणण्यापेक्षा संपूर्ण महाराष्ट्राला ज्यांची ओळख आहे ते म्हणजे गोविंदराव पानसरे वा प्रा. एन. डी. पाटील असे कोल्हापूरमध्ये अनेक चेहरे आहेत. पण हे दोन चेहरे म्हणजे कायम संघर्षामध्ये ज्यांचे पूर्ण आयुष्य गेले. अन्यायाला विरोध करणारे ते हे दोन चेहरे. मग तो अन्याय कोणावरही असो. तेथे त्याला विरोध हा होणारच. तसा कोल्हापूर आपला चळवळीचा, सहकाराचा जिल्हा. पण या चळवळी ज्यांच्या नेतृत्वाखाली होतात. ते नेतृत्व जर हे असे संपत असेल तर येणाऱ्या पिढीनं करायचं काय? हा हल्ला कोणी केला? कशासाठी केला हे मला माहीत नाही? पण मनाला झटका बसून तो या गोष्टीचा की, एक पुरोगामी विचार नष्ट झाल्याचा.

जगातील सर्वात तरुण देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. पण आपल्या तरुण-तरुणींचे आदर्श कोण आहेत? आजची तरुणाई काय करते आहे? आजच्या तरुणाईला पानसरे माहित आहेत काय? पुरोगामी म्हणजे काय? आजच्या तरुणाईला पुरोगामी म्हणजे काय? हे माहित आहे काय? आपण ज्या राज्यात राहतो ते महाराष्ट्र राज्य पुरोगामी राज्य सहकारात अग्रेसर आहे म्हणून या महाराष्ट्र राज्याकडे पाहिले जाते. पण ही ओळख पुसली जात आहे. मग ती राजकारणामुळे किंवा कोणत्याही इतर कारणामुळे तो भाग वेगळा. आजचे तरुण हे जागृत नाहीत. हा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकरांचा, शिवाजीराजेंचा असे म्हटले जाते. त्यांचे विचार आजच्या समाजात रुजवण्याचे काम करणे हे गरजेचे आहे. हे आजच्या तरुणांनांमध्ये विचार रुजवण्यामध्ये अनेक लोक पुढे येत आहेत पण त्या थोर पुरुषांचे विचार मांडण्यापूर्वी किंवा ते विचार पोहचवण्यापूर्वीचे त्यांची हत्या होत आहे. हे थांबवण्यासाठी सर्व तरुणांनी जागृत राहिले पाहिजे. हेच पुरोगामी विचार सांगतो. माणसाने बदलणाऱ्या आधुनिकतेबरोबर बदलावे. पण आपली संस्कृती मागे ठेवून आपण बदलणे योग्य आहे का? भारतीय संस्कृती जग प्रसिद्ध आहे. मग ती संस्कृतीच राहीली नाही तर ओळख कशी राहणार? आज दिल्लीमध्ये काय चाललंय? ज्या मोदी लाटेने संपूर्ण मोठे मोठे पक्ष वाहून गेले त्यामध्ये आपसारखा पक्ष, ज्या पक्षाने विरोधी बाकारवर बसण्यासाठी लागणाऱ्या जागा देखील भाजपला दिल्या नाहीत. या पक्षाचा जन्म कसा झाला हे आपल्याला माहीतच आहे. एक सर्वसामान्य चेहरा काय करु शकतो ते तुम्ही पाहिले. तसेच तेथे झालेल्या निर्भया प्रकरणाचे तीव्र पडसाद कसे उमटले ते पाहिले. आजच्या तरुणाईत किती ताकद आहे ते आपण विविध आंदोलनातूनच पाहतोच. पण आंदोलने, मोर्चे काढून आपले काम झाले का? पुढे त्याचे काय झाले याकडे आपण पाहतो का? नाही. याचा विचार कुठेतरी झाला पाहिजे. निर्भयाच्या प्रकरणातील आरोपींच्या मुलाखतीमुळे लोकसभेत, राज्यसभेत तीव्र पडसाद उमटले आणि 'इंडियाज डॉटर' या माहिती पटाबरील बंदी मागे घ्यावी या मागणीसाठी बंगळूर शहरात १३ मार्च २०१५ रोजी मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये युवती मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. त्यामधील एका बॅनरवर असे लिहिले होते की, 'Don't tell me how to dress tell them not to rape.' तुम्ही आम्हाला कपडे कसले घालायचे सांगू नका, तर तुम्ही बलात्कार करु नका. हे काही लोकांना पटले काहींना नाही. पण याचा कोठेतरी विचार, चर्चा झाली पाहिजे. याची सुरुवात कोठून होते याची वाट पाहण्यापेक्षा याची सुरुवात आपल्यापासूनच होणे गरजेचे आहे. वेट अँड वॉच (Wait & Watch). आता हे थांबवा हे म्हणण्यापर्यंत ठीक आहे.

एका पानसरेंना मारल्यामुळे पुरोगामी विचार संपले असे जर त्यांना वाटत असेल ते पूर्ण चुकीचे आहे. उलट परत जोशात, नव्या उमेदिने ते काम यापुढे अखंड चालू राहील. यासाठी या संपूर्ण गोष्टीचा त्या व्यक्तींचा तसेच त्यांच्या विचारांचा प्रभाव

तरुणांवर व देशातील समाजावर होणे गरजेचे आहे. या गोष्टीचा कुठेतरी विचार होणे मला गरजेचे वाटते. आजची युवा पिढीही Facebook, Whats-app या इंटरनेटच्या आधुनिक जगतात पूर्णपणे बुडालेली आहे. त्यांना बाहेर काढणे शक्य नाही आहे. याच Whats-app व Facebook च्या माध्यमातून पानसरे सरांना कोणी-कोणी श्रद्धांजली वाहिली. मला वाटत नाही कोणी मनापासून वाहिली असेल. कारण हा करतो म्हणून आपणही करावं किंवा त्याने केली ना श्रद्धांजली मग आपण कशाला करायची? असे विचार समाजातील लोकांमध्ये आहे. हे विचार पूर्णपणे बाजूला सारून त्याच्यामध्ये नवीन बदल करावा आणि त्यांच्यात प्रगती व्हावी, त्यांचे विचार बदलावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे अश्वासन मी या तरुण पिढीला देतो आहे. त्यांनी या अश्वासनाचा पूर्णपणे विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.

***फरक फक्त विचारांचाच,***
***व्यसने विकत घेता येतात***
***पण... संस्कार घेता येत नाहीत,***
***मुळात खाणच सुपीक असावी लागते***
***कितीही केलं तरी वाळवंटात अन्***
***समुद्रात पीक घेता येत नाही,***
***देह सगळ्यांचा सारखाच***
***पण फरक फक्त विचारांचाच...***

विचार बदला तर संपूर्ण जग बदलेले फक्त तो विचार सकारात्मक असावा की नकारात्मक असावा हे प्रथम ठरविले पाहिजे.

पानसरे सरांच्या निमित्ताने मला माझे विचार मांडण्याची संधी मिळाली, २०२० मध्ये ए.पी.जे. अब्दुल कलामांच्या स्वप्नातला भारत पाहण्यासाठी जर आपण इच्छूक असाल तर तरुण वर्गांनी निधड्या छातीने पेटून उठले पाहिजे. आत्मविश्वास घेवूनच पुढच्या क्षेत्रात आपले पाऊल ठेवले पाहिजे. कलामांच्या स्वप्नातला भारत पाहण्यासाठी मात्र या गोष्टींचा विचार होणे मला गरजेचे वाटते. मी पुन्हा एकदा पानसरे सरांना आदरांजली वाहतो. तर मित्रहो, जागे व्हा ! आणि २०२० मध्ये कलामांच्या स्वप्नातील भारत पाहण्यास तयार व्हा.

# लहानपणीचा आनंद

✍..... **प्रितमराजे आनंदा बेलवाडे** (बी.कॉम.भाग-२)

थंडी असली तरीही २६ जानेवारीची पहाट आमच्या लहानपणी दिवाळीची पहाट असायची. चुलीवरच्या गरम पाण्याची आंघोळ आणि शाळेची कपडे जुनी असली तरी तांब्यात विस्तव घालून केलेली इस्त्रीची कपडे, नव्या कपड्यांपेक्षा जास्त आनंद द्यायची.

मुलांपेक्षा प्रजासत्ताक दिनाचा आनंद कुटुंबात जास्त होता. सकाळी शाळेची भली मोठी घंटा खणखण वाजायची. देशभक्तीपर गीतांनी सगळं गाव भारून जायाचं. थंडीच्या कडाक्यातही देशभक्तीचा उबदारपणा साऱ्या गावाला जाणवायचा. 'आदर्श विद्या मंदिर' असलेली शाळा नव्या नवरीगत नटायची. आनंद, उत्साह, जोश पावसाळ्याच्या नदीसारख्या अखंड वाहत असायचा.

***'एक रुपया चांदीचा... देश आमचा गांधीचा', 'भारत माता की जय'***

या घोषणंनी गाव दणाणून जायचा. प्रभात फेरी म्हणजे आपलेच गाव पण ऐटीत, अभिमानाने पाहण्याचीच मौज. घराजवळून प्रभात फेरी जायाची त्यावेळी आई घराच्या कोपऱ्यावर असायची. नकळत आईच्या डोळ्यात पाणी तराळायचं... सगळ्या गावाचा सहभाग असलेली ही फेरी खरंच न्यारी असायची, शाळेच्या ग्राऊंडवर कवायत रंगात यायची.

मग जोरदार आवाज यायचा 'सावधान' आणि तिरंगा फडकावयचा. झेंड्याला सलामी देताना इवलूशी छाती देशभिमानाने भरून यायची. गेल्या दोन आठवड्यापासून सुरु असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या तालमींच्या निकालाची वेळ आता येऊन ठेपते. बोबड्या बोलीपासून सुरू झालेला कार्यक्रम रंगत जातो. कौतुकाच्या, बक्षिसांची पाठीवर थाप मिळायची... गुरुजी खुश. 'अध्यक्ष महाशय, गुरुजन वर्ग आणि इथे जमलेल्या माझ्या बंधू आणि भगिनींनो' अशी सुरुवात करून सुरू झालेली भाषणे मग तासभर चालायची. अशा प्रकारे सर्व कार्यक्रमांची रेलचेल असायची शेवटचा गोड कार्यक्रम गोळ्या-बिस्किट वाटपाचा असायचा.

२६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन आहे. पण लहानपणी तो आपला आनंद सोहळा असायचा. दिवाळी प्रमाणे तो साजरा केला जायचा. सध्या हा आनंद फक्त जिल्हा परिषदेसारख्या सरकारी शाळेतच मिळतो, खाजगी शाळेत आता आनंदही खाजगी झालाय!

***जय शिवराय, जय महाराष्ट्र ।***

# बळीचं राज्य येऊ दे !

..... विकास शिवाजी मोरे
(बी.बी.ए. भाग-२)

'नेहमीच येतो पावसाळा' हे सर्वांच्या ओठी असलेले वाक्य भूतकाळात रमून गेलंय. कारण सध्या निसर्गाचे चाललेले पोरखेळ पाहून 'नेहमीचा येतो दुष्काळ' किंवा 'दुष्काळात तेरावा महिना' ही वाक्ये मनात रेंगाळत असतील यात नवल नाही. याला सर्वस्वी जबाबदार कोण? अर्थातच माणूस 'मऊ लागले म्हणून कोपराने खणू नये' आणि 'ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये' हे उमजण्याइतपत तरी बुद्धी नष्ट होऊ नये. पण तरीही 'शाश्वत विकास' संकल्पना पायदळी देणे सुरूच आहे.

फार वर्षापूर्वी पराक्रमी राजांची राज्ये असत, नंतर इंग्रजांचे राज्य आले आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपण लोकशाहीच्या मार्गावर मार्गस्थ झालो आहेत. कितीतरी शतके सरली, कितीतरी युगे अवतरली, पारतंत्र्य जाऊन स्वातंत्र्य मिळाले, कितीतरी पिढ्या मातीत दफन अगर राख झाल्या, तरी देखील बळीचं राज्य अस्तित्वात आलं नाही. 'एखादी गोष्ट मागून मिळत नसेल, तर ती हिसकावून घ्यावी' हा प्रघात असूनही बळीराजा याला अपवाद आहे. भारतात ठिकठिकाणी खनिजांच्या खाणी आहेत, पण तुम्हाला धान्याची खाण शोधूनही सापडणार नाही. माती जशी खनिजे पुरवते, तशीच ती पिकंदेखील पोसते. त्याच मातीला बळीराजा घामाचा नैवेद्य अर्पण करतो, तेव्हाच शेतात धान्याची रास उत्पन्न होते, सर्वांची भूक भागवली जाते आणि साऱ्या जगाचे रहाटगाडगे व्यवस्थितरित्या चालू राहते.

ठिकठिकाणी शाही भोजन असते, श्रीमंतांच्या घरी पंचपक्वान्न असते, मेजवान्या असतात, मोठाल्या पंगती उठतत आणि अन्नाची भयंकर नासाडी होते ही एक वस्तुस्थिती, तर दूसरीकडे काहीजण भुकेने तडफडून प्राण सोडताहेत किंवा काहींच्या आतड्यांना छिद्रं पडताहेत आणि हजारो बालके कुपोषणाला बळी पडत आहेत ही दुसरी वस्तुस्थिती. तर तिसरी वस्तुस्थिती अशी आहे की साऱ्या जगाचा अन्नदाता-बळीराजा शिळं तुकडं पाण्यात भिजवून खातोय, चटणी-भाकरी चवीनं खातोय. डोक्यावर कर्जाचा डोंगर, तडा गेलेली नापीकतेकडे झूकणारी धरणीमाय आणि डोळ्यांत उदयाचे हिरव्यागार शिवाराचे स्वप्न उराशी बाळगून त्याचं जगणं सुरू आहे. डार्विनच्या सिद्धांतानुसार इथं अस्तित्वासाठी संघर्ष सुरू आहे. दिवस फुटण्यापूर्वीपासून ते मिट्ट काळोख होईपर्यंत रक्त आटवणे सुरूच आहे.

वरूणराजाची मिजास तर पाहा, एकीकडे महापूराने हैराण करण्यात मशगूल, तर दूसरीकडे पावसाचा थेंब नाही. माणसांना वाळीत टाकण्याची प्रथा असते. निसर्गाने ह्याच प्रथेचा अवलंब केला नसेल ना? वरूण राजाला किमान बळीराजाची तरी कणव यावी, पण हूलकावणी देत काळे ढग पुढे-पुढे सरकतात. मग पुन्हा बळीराजाच्या डोळ्यांतून आसवांचा महापूर येतो.

*'अवंदाचं वरीस बी कोरडच जाणार,*
*पाचवीला पुजलेला दुस्काळ येणार...'*

एक गोष्ट नमूद करण्यासाखी आहे, ती म्हणजे सुकाळ असो अथवा दुष्काळ. बळीराजा अतिथींचा पाहुणचार करण्यस चालढकल करत नाही. एकवेळ स्वत: उपाशी राहील, पण पाहुण्यांच्या आदरातिथ्यात कसर सोडणार नाही. एखाद्या वेळेस मुलींच्या लग्नकार्यात जमिनी गहाण टाकल्या जातात. हुंडा पद्धतीवर आळा बसत नाही, मग नंतर हुंडाबळींची संख्या वाढत जाते. त्यात लबाड सावकार बळीराजाला सळो कि पळो करून सोडतात. अडाणी बळीराजा अंगठा देऊन बसतो, त्यामुळे सावकारशाही सुसाट धावते आणि बळीराजांच्या जमिनी गिळंकृत करते. बळीराजांचे संसार उघड्यावर येतात. पुन्हा वेठबिगारी सुरु. त्यात कित्येक पिढ्या नाहक बळी जातात. वितभर पोटाची खळगी भरण्यासाठी गुलामासारखी पिळवणूक सुरू होते.

बळीराजादेखील दोन गटात मोडला जातो. पहिला सधन किंवा मोठा शेतकरी व दूसरा निर्धन किंवा छोटा शेतकरी. मोठ्या शेतकऱ्यांकडे सुपीक व कसदार जमीन असते. तर छोट्या शेतकऱ्याकडे खायचे वांधे असतात. एक तर जमिनीत काही पिकत नाही, तरीही रक्त आटवणे सुरूच असते किंवा ती वर्षानुवर्षे सावकाराकडे गहाण पडते व वेठबिगारीचा नवीन अध्याय सुरू होतो. सावकारशाहीच्या जात्यात बळीराजा भरडला जातो. तर काहीजण दुसऱ्यांच्या शेतात खपत संसाराचा गाडा ओढतात आणि

दोन घास कमी खाऊन मुलांना शिक्षणाचे अमृत पाजतात. आरक्षण नावाचे भूत काही बळीराजांच्या पोरांच्या मानगुटीवर बसते. वशीलेबाजी, खासगीकरण आणि डोनेशन फी त्यामुळे शेतकऱ्यांच्या पोरांना शिक्षण घेणं कठीण होऊन जातं.

*'पैशांशिवाय मग चालत नाही,*
*मेलेला मुडदादेखील पैशांशिवाय जळत नाही'*

ही इथली वास्तवता आहे. खरंच लोकशाहीत शेतकऱ्याला कवडीमोलाचे स्थान आहे का? कायदे-कानून बनवणाऱ्यांनी बळीराजाला दुर्लक्षीत तर केले नसेल ना?

जमिनी मशागतीचा वाढलेला खर्च, खते, कीटकनाशके यांचे गगनाला भिडलेले दर, लहरीबाज पाऊस, सावकाराचा तगादा यांत बळीराजा पिचत चाललाय. त्यात भर म्हणून व्यापारी वर्ग शेतकऱ्यांकडून कवडीमोलाने धान्य विकत घेतात आणि चढ्या भावाने शहरात विकसात. यात ग्राहकांची जशी फसवणूक होते, तशीच शेतकऱ्यांची अवहेलना होते. नगदी पिकांचे देखील तीच गत. बळीराजाला क्रुसावर चढवले जात असूनही बळीराजा येशूप्रमाणे लोकांना क्षमा करत आहे. नोकरदार किंवा शिक्षकांनी संप पुकारलाकी पगारवाढ होते, भत्ते वाढतात. पण मला खात्री आहे शेतकऱ्यांनी संप केला तर पाठीत लाठ्या बसतील कितीतरी डोकी फुटतील व छातीत गोळ्या घुसतील. लोकशाहीतील ही तफावत, ही दरी कधी मिटणार?

*'दुष्काळावेळेस नेमकं काय घडतं,*
*देव पाण्यात घालून सारं गाव रडतं !'*

मध्येच कुठेतरी टांगलेला देह दिसतो, गळा दाटून येतो, बांगड्या फुटतात आणि अनुदानाची भीक पदरात टाकली जाते. केंद्रातून हजारो कोटींचा निधी येतो, टँकरला गळती लागते तशी त्या निधीला गळती लागते, मग पुन्हा टांगलेले देह दिसतात. कर्जमाफीची गाजरे दाखविली जातात, दुष्काळाच्या नावावर अजीर्ण होईस्तोवर पैसा खाल्ला जातो. बळीराजाच्या हातात ना बंदा रुपया पडतो ना मुखात पाण्याचा थेंब पडतो. अशा वेळी मग काहीवेळा दुष्काळ निवारणासाठी खारीचा वाटा उचलला जातो. पण इतक्याशा मलमपट्टीने घाव भरून निघत नाही. अर्थात ठिकठिकाणांहून मदतनिधी, गवत फाटा, अन्नधान्याचा साठा जमा केला जातो, तरी देखील दुष्काळ निवारण होत नाही. पाचवीला पुजलेल्या दुष्काळाला 'नाम' नावाची संस्था कुठवर पुरणार? तिच्या शाखा विस्तारण्यासाठी खतपाणी द्यायला हवे. अशा हजारो संस्थांनी पुढाकार घ्यायला हवा. तेव्हाच ज्यांनी झोपेचे सोंग घेतले आहे, त्यांना जाग येईल. तेव्हाच ते आत्मपरीक्षण करतील. शून्य अंशात राहणे जसे कठीण असते, तसेच ४५ अंशात शेतात राबणं किती कठीण असते हे पंख्यांची हवा खाणाऱ्यांना व डुलकी घेणाऱ्यांना नाही समजणार. त्यासाठी त्यांनी कधीतरी उन्हात यायला हवं आणि एक दिवस बळीराजा म्हणून जगायला हवं.

राजकारण दलदल आहे की नाही याबद्दल मतभेद असतील. एक विधान असेच विवादात्मक 'शेतकरी प्रेमकरणातून आत्महत्या करतात.' मला वाटतं की ज्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर असेल आणि ज्याची बायको-पोरं उपाशी मरत असतील त्यांच्या आत्म्यालाही कधी प्रेम प्रकरणांचा स्पर्श होणार नाही. शेतकरी धरणीमातेवर, बायकोपोरांवर जीव ओवाळून टाकतील, पण असले प्रकार करणार नाहीत, हे त्यांच्या बालबुद्धीला उमजणे मुश्कील ! असो, विषयांतर होईल.

'शेतकऱ्याचा असूड' नावाच्या पुस्तकात महात्मा फुलेंनी बळीराजाची दैनावस्था विशद केली आहे. राज्यकारभार चालवणाऱ्यांनी आपला बहुमूल्य वेळ देऊन त्याचे वाचन करायला हवे आणि दुष्काळावर आपली मतं प्रकट करण्याऐवजी या दुष्काळरूपी दैत्याशी कसे लढता येईल यावर भर दिला पाहिजे. 'मेक इन इंडिया' प्रमाणे बळीराजाच्या उन्नतीवर भर दिला पाहिजे.

किमान कुणब्याच्या पोरांनी या समाजव्यवस्थेविरूद्ध एकजूट झालं पाहिजे. त्यासाठी शिक्षणाशिवाय गत्यंतर नाही. आई-बापाला डोळ्यांसमोर ठेऊन त्यांनी शिकलं पाहिजे आणि बापाचं नाव मोठं करता-करता 'शेतकऱ्याचं पोर' म्हणून मिरविलं पाहिजे. बळीराजाला जाचातून मुक्ती मिळायची असेल, तर त्याच्या पोरांनी शिकलंच पाहिजे, जातीधर्म झूगारून, उपाशीपोटी राहून का असेना आणि व्यवस्थेशी लढून देशाला महासत्ता करायचं असेल तर बळीराजा सक्षम व्हायलाच हवा. यास्तव लेख लिहिण्यास धजावलो.

*'दुष्काळ-आत्महत्या टळू दे,*
*बळीराजाला खंडीभर मळू दे,*
*पोटाला पोटभर मिळू दे,*
*साऱ्या जगाला जरा कळू दे,*
*बळीचं राज्य येऊ दे !'*



# सावित्रीबाई फुले : एक अलौकिक समाजसेविका

..... कु. शितल डी. परीट
(एम.ए. भाग-१)

ज्या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळत नव्हते, शिक्षणापासून आणि स्वातंत्र्यापासून दूर ठेवून स्त्रीला परावलंबी आणि पारतंत्र्यात ठेवले जात होते. त्या काळात सावित्रीबाईचा जन्म झाला. पुढे मात्र सावित्रीबाईंना ज्योतिबा फुले यांचा उदार दृष्टिकोन मिळाल्यामुळे स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडविण्याची संधी प्राप्त झाली.

महाराष्ट्रातील महान समाज सुधारक व दलितांचे उद्धारकर्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संघर्षमय समाज सुधारण्याच्या कार्यात त्यांना खांद्याला खांदा लावून स्त्री शिक्षण व दलित्तोधाराचे कार्य करणाऱ्या त्यांच्या सौभाग्यवती सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील शिरवळपासून जवळच असलेल्या नायगावच्या खंडोजी नेवसे यांच्या घरी ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडील खंडोजी नेवसे पाटील त्यांच्या या एकुलत्या एक कन्या. त्या काळात बालविवाहाची पद्धत असल्यामुळे सावित्रीबाईचा इ.स. १८४० साली ज्योतीराव फुल्यांशी विवाह झाला. लग्नाच्या वेळी सावित्रीबाईचे वय नऊ तर ज्योतीरावांचे वय तेरा वर्ष होते. सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांना आपत्य नव्हते. त्यांनी यशवंत नावाचा मुलगा आणि त्यांच्या विधवा आईला आपल्या घरी सांभाळले पुढे सावित्रीबाईंनी ज्योतीबांशी विचारविनमिय करून यशवंतलाच दत्तक घेतले. पण यशवंताच्या खऱ्या आईला सावित्रीबाईंनी अत्यंत प्रेमाने वागविले. ही बाब त्यांच्या मनाच्या मोठपणाची साक्ष आहे. सावित्रीबाईंना लहानपणापासून शिक्षणाची ओढ होती पण ते प्रोत्साहन त्या काळात मिळणे अशक्य होते.

**※ भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका -**

मुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्थान अढळ आहे. एका अशिक्षित स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षिका बनावे आणि वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडणाऱ्या स्त्री-शुद्रानी ज्ञानाचा प्रकाश दाखवावा ही गोष्ट भारताच्या दोन हजार वर्षाच्या इतिहासात अपूर्व अशी आहे. शिक्षणाच्या क्षेत्रातून सामाजिक सुधारणांसाठी वाङमयाचे साधन हाती घेऊन कवयित्री आणि लेखिका बनावे. सर्व गाव, सर्व समाज, सुशिक्षित, सुसंस्कृत करण्याचे जनावरांप्रमाणे जिणे जगणाऱ्या स्त्री शुद्रांना माणसात आणण्याचे वेड घ्यावे, पतीच्या निधनानंतर शोक करीत न बसता सत्यशोधक समाजाच्या तत्त्वप्रसाराचे कार्य करण्याचे सतीचे वाण घेऊन अविश्रांत काम करावे. दीनदलितांसाठी पीडितांसाठी दिवस-रात्री घराबाहेर धावावे त्यांची सेवा करावी. प्लेगच्या साथीत त्यांना कडेवर घेऊन आपला दत्तक मुलगा डॉ. यशवंतराव फुले यांच्या दवाखान्यात घेऊन जावे. तेथे प्लेगच्या रोगाला आपण बळी पडत असल्याची जाणीव होऊनही रुग्णांची सेवा करीत राहावी आणि ही सेवा करता करता अनंतात विलिन होऊन जावे अशा या व्यक्तिमत्त्वास केवळ 'अलौकिक' हे एकच विशेषण योजिता येईल. सावित्रीबाईंच्या कार्यकतृत्त्वाच्या या पटावरून अशी सहज ओझरती नजर जरी टाकली तरी या स्त्रीचे व्यक्तिमत्व हे सामान्य नव्हते हे सहज लक्षात येते. एका समाजसुधारकाची पत्नी म्हणून त्यांचे एक सवंग अस्तित्व होते असे म्हणता येणार नाही. सावित्रीबाईंनी ज्योतीरावांना त्यांच्या इहलोकातील आयुष्याच्या अखेरच्या प्रवासापर्यंत साथ केली. परंतु ही साथ केवळ एका पतिपरायण स्त्रीची नव्हती तर त्यांची प्रेरणा स्वतंत्र अशी होती. सावित्रीबाईचा जन्म एका गरीब शेतकरी कुटुंबात झालेला शिरवळजवळच्या एका खेड्यात जेथे सबंध गावात शंभर-दिडशे उंबरा सापडणे कठीण. गावाला वर्षानुवर्षे दुष्काळाची परंपरा लाभलेली शिक्षणाचे संस्कार नाहीत. अशी ही निरक्षर कुटुंबात जन्मलेली वाढलेली स्त्री ज्योतीरावांच्या हाताखाली शिक्षणाचे धडे गिरवते. शिक्षण व प्रशिक्षण घेते आणि ज्ञानदानाचे व्रत घेऊन ज्ञानयोगिनी बनते.

**※ सामाजिक व शैक्षणिक कार्य :** ज्योतिबाबरोबर सावित्रीबाईंचा विवाह झाल्यावर त्यांना त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण करण्याची संधी चालून आली. ज्योतिबांच्या मते स्त्रियांनी

शिकावे असा विचार त्यांनी केला असल्यामुळे त्यांनी आपल्या पत्नीपासूनच स्त्री-शिक्षणाला आरंभ केला होता. ज्योतीबांच्या वडिलांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दलच विरोध केला होता. तेथे सुनेच्या शिक्षणाला नकार देतील यात संशय नव्हता. पण ज्योतिबांचा मुलींची शाळा काढण्याचा विचार निश्चित होताच. त्यामुळे आरंभ त्यांनी आपल्या पत्नी म्हणजे सावित्रीबाईपासूनच केला. शेती करतानाच झाडाखाली बसून काळ्या मातीत अक्षरे गिरवत सावित्रीबाई शिकू लागल्या. यामध्ये प्रगती झाल्यावर त्यांनी एका सरकारी शाळेत प्रवेश घेऊन पुढे शिक्षण चालू ठेवले. १४ जानेवारी १८४८ साली ज्योतीबांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली पण मुलींना शिकवायचे धाडस करायला कोण शिक्षक पुढे येईना. तेव्हा सावित्रीबाई शाळेत जावून मुलींना शिकवू लागल्या. स्त्रियांनी शिकणे म्हणजे महापाप व त्यांनी शिकवणे हे तर महाभंयकर पाप असे त्या काळी सर्वच समाज समजत असल्याने सावित्रीबाई शाळेत मुलींना शिकवायला जाऊ लागल्या की पुण्यातले अतिकर्मठ लोक त्यांच्यावर दगड, शेण, चिखल वगैरे फेकत, पण सावित्रीबाई या सर्व छळाला शांतपणे तोंड देऊन मुलींना शिक्षण देण्याचे काय चालू ठेवतात. सावित्रीबाई व ज्योतीबा फुले यांनी नंतर दोन शाळा काढल्या. भारतातल्या मुलींना पहिल्या शाळेतील या पहिल्या शिक्षकेने आपले शिक्षण देण्याचे व्रत चालूच ठेवले. फुले दामपत्याने शाळा काढल्या परंतु शाळांची जाळी विणीत ते बसले नाहीत. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. केवळ साक्षर करण्यासाठी त्यांना शिक्षण द्यावयाचे नव्हते. शिक्षणातून त्यांना समजाजागृती करावयाची होती. जुनाट रूढी-अंधश्रद्धा, जुन्या परंपरा, भोळ्या समजुती नाहीशा करावयाच्या होत्या. सामान्य लोक पशूतूल्य जीवन जगत होते. त्यांच्यात माणूसपण कसे आणता येईल, याचा सावित्रीबाईंनी विचार केला होता. आपल्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात त्या म्हणतात.

*'शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा*
*शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हाटते पहा.'*

मनुष्यत्वासाठी शिक्षण हा मूलभूत विचार सव्वाशे वर्षापूर्वी मांडणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या भारतातील थोर शिक्षणतज्ञ होत. लोकांना माणूस बनविणे, ताठ मानेने उभे राहायला लोकांना शिकवणे स्वत्व जपण्यास शिकविणे आणि त्याही पलीकडे माणसाबद्दल प्रेम निर्माण करण्यास शिकविणे एवढा शिक्षण विषयक व्यापक दृष्टिकोन ह्या लोकोत्तर स्त्रीच्या ठिकाणी होता. पण हे सर्व त्या पतीच्या पावलावर पाऊल टाकून अंधळेपणाने करीत नव्हत्या तर त्या कार्यावर त्यांची निष्ठा होती. म्हणून १८९० साली म. फुले यांचे निधन झाल्यानंतर सावित्रीबाईंनी त्यांच्या पश्चात सत्यशोधक समाजाची धुरा वाहिली ही धूरा समर्थपणे वाहिली. चूल आणि मूल ही पारंपारिक विचार सरणी झटकून ही स्त्री सार्वजनिक कार्यासाठी बाहेर पडली. सावित्रीबाई शिकल्या तेव्हा त्यांच्या ठायी असणाऱ्या कविमनाला जे काही आढळले ते त्यांनी कविता आणि अभंगाच्या रुपात शब्दबद्ध केले. १८५४ साली त्याचा 'काव्यफुले' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. मातोश्री सावित्रीबाईची भाषणे व गाणी या नावाने पुस्तकही १८९१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. काव्य-लेखनाप्रमाणेच त्यांनी 'गृहिणी' या मासिकात लेखही लिहिले. त्यांच्या लेखनाला स्वानुभवाचा भक्कम आधार असल्याने ते लेखन परिणामकारक झाले. सावित्रीबाईंनी ज्योतीबांच्या सर्व कार्यात मनाने भाग घेतला 'स्त्रियांनी शिकावे' हे त्यांचे ब्रिदवाक्य होते. अनाथांना आश्रय मिळावा ही त्याची कार्यक्षेत्रे त्यांच्या श्रद्धेने प्रभावी झाली 'सामाजिक कार्यात पुढाकार घेणे' हे त्यांचे ध्येय होते. त्यामुळेच १८७६-७७ मधल्या दुष्काळात त्यांनी खूप कष्ट केले. असे कार्य करणारी सावित्रीबाई फुले ही महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील पहिली स्त्री त्या काळी उच्चवर्णीय सुशिक्षित स्त्रिया नव्हत्या असे नाही. परंतु समाज जागृतीच्या कार्यालाही पारंपारिक मर्यादा होत्याच पुढे १८९७ मध्ये प्लेगची भयंकर साथ आली असताना त्यांनी आपल्या स्वत:च्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यांसाठी काम केले. दुर्दैवाने त्यांना प्लेगच्या या भीषण रोगाने ग्रासले आणि १० मार्च १८९७ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

समाजातील दलितांना मायेने जवळ करणाऱ्या स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून धडपडणाऱ्या सावित्रीबाई खऱ्या अर्थाने जोतिबांच्या सहचारीणी म्हणून शोभल्या. त्यांच्या थोर सामाजिक कार्याविषयाची कृतज्ञता म्हणून १८९५ पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईचा जन्मदिन हा बालिकादीन म्हणून साजरा केला जातो.



# आजची स्त्री

✍..... कु. स्वाती दत्तात्रय जाधव
(एम.ए. भाग-२)

स्त्री जीवनात विसाव्या शतकात मोठ्या प्रमाणात बदल झाले, त्याचे मुख्य कारण म्हणजे तिला सापडलेला शिक्षणाचा मार्ग. फुले, आगरकर, कर्वे आणि इतर अनेक समाज सुधारकांच्या प्रयत्नांतून तिला विद्यालयाची कवाडे उघडी झाली. पाटी-पेन्सिल हातात घेतलेल्या स्त्रीने अगदी अल्पकाळात विद्यापीठाच्या अंतिम परीक्षाही पार केल्या. आज एकविसाव्या शतकात प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक कसोटीत ती पुढे आहे. कोणतेही काम तिला अवघड राहिलेले नाही. अंतराळातही ती जाऊन पोहोचली. राजकारण, समाजकारण शिक्षण अशी सर्व क्षेत्रे तिने यशस्वीरीत्या पार केली. पण हे झाले असामान्य स्त्री-बाबत सर्व सामान्य स्त्रीबाबत काय आढळते? ती पण सुविद्य झाली, ती जागरूक झाली आहे. तिला आत्मभान आले आहे. तिच्या स्वत:च्या मताची जाणीव झाली आहे. तिला आत्मभान आले आहे. आपले घर, आपला संसार, आपली मुले याच्याही पलिकड ती विचार करु लागली आहे.

गेल्या शतकातील स्त्रियांवर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होत होती. स्त्री-भ्रूणहत्या, सतीची प्रथा, बालविवाह हुंडाबळी अशा प्रकारचे अन्याय तिच्यावर केले जात होते. स्त्रियांची स्थिती हलाखीची होती. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीच्या सती जावे लागत असे. स्त्रीने पतीच्या मृत्यूनंतर दुसरा विवाह करण्यास परवानगी नव्हती. विधवा स्त्रियांना अशुभ मानले जाई. त्यांना सण-समारंभात भाग घेता येत नसे. विधवांचा शारीरिक व मानसिक छळ केला जाई. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. मुलींना शिक्षण मिळावे म्हणून महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षण दिले. मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा १८४८ साली सुरू केली. यावेळी त्यांना अनेक समाज कंटकांचा विरोध सहन करावा लागला. अत्याचार सहन करावा लागला. सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी हार मानली नाही. त्यांनी मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला व विधवांना पुनर्विवाहाला मान्यता मिळवून दिली. स्त्रियांना बंधनातून मुक्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

गेल्या शतकात अनेकांच्या प्रयत्नांतून स्त्री थोडी थोडी बंधनातून बाहेर पडत आहे. शिक्षणाची दारे खुली झाल्याने तिने आपल्या प्रगतीचा वारु सोडला आहे. मानवी जीवनातील कोणतेही क्षेत्र तिला आता कठीण राहिलेले नाही. पुरूषांच्या बरोबरीने ती प्रत्येक क्षेत्रात अगदी रणांगणावरही आपली कर्तबगारी गाजवत आहे. असे असले तरी आजही स्त्री मुक्त आहे, असे म्हणता येईल का ?

ज्ञानामुळे स्त्री ही आता गुलाम राहिली नाही. अगदी बंगल्यातील, झोपडीतील स्त्रीही आपल्यावर होणारा अत्याचार मुकाट्याने सहन करत नाही. पण म्हणून तिच्यावर अन्याय, दडपशाही होत नाही असे नाही. झोपडीत राहणाऱ्या गरीब स्त्रिया आज मोलमजूरीची कामे करून दोन-तीन हजार रुपये कमवतात. त्यावर त्या आपल्या मुलाबाळांची, कुटुंबाची गुजराण करतात. प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन मुलांना चांगल्या शाळेत घालतात. त्यामागे त्या माऊलीचा हेतू एकच असतो की, त्या मुलांचे भवितव्य उज्ज्वल व्हावे. पण अशा या कष्टकरी महिलांचे दारूडे पती कामधंदा न करता या स्त्रियांना मारहाण करून दारूसाठी पैसे उकळतात. मग ही स्त्री मुक्त आहे असे म्हणता येईल का?

याला कारण आज ही आपला समाज स्त्रीकडे थोड्या अधिक संशयाने पाहतो. आजकाल समाजातील घटस्फोटांचे प्रमाण वाढले असले, तरी अजूनही समाज परित्यक्ता, घटस्फोटित स्त्रियांकडे थोड्या उपेक्षेनेच पाहतो. समाजाची ही दृष्टी बदलायला हवी. आजची सुशिक्षित स्त्री घरदार दोन्ही सांभाळत असते. ज्ञानसंपादनामुळे तिला स्वत:चे क्षेत्र निर्माण केलेले आहे. आज ती क्षेत्रे गाजवत आहे. तसेच सोबत आपले घरदार सांभाळत आहे. मुलांच्या विकासासाठी धडपत असते, परंतु ती मुक्त नसते. तिला आपले घर टिकवण्यासाठी अनेक तडजोडी कराव्या लागतात. क्वचित स्वत:च्या मतांना, इच्छांना मुरड घालावी लागते.

अशा घरातूनही अनेकदा हुंड्यासाठी स्त्रीला जाळण्यात येते, तिची हत्या केली जाते. तिच्यावर बलात्कारही केला जातो. स्त्रीवर अन्याय करणाऱ्या एखाद दुसऱ्या व्यक्तीला शिक्षा करून स्त्रीवरील अन्याय संपणार नाही. पुरूष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ हा मुळातील अन्यायकारक विचार नाहीसा झाला पाहिजे. खरं तर सर्व माणसे समान आहेत, या तत्वाला आपल्या जीवनात जेव्हा मानाचे स्थान मिळेल, तेव्हाच स्त्रीला सुद्धा समाजात मानाचे स्थान मिळेल. त्यातूनच निकोप आणि निर्भीड समाज निर्माण होईल.

आजच्या स्त्रीने एक सत्य जाणले आहे. आता ती कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाही. ती जास्तीत जास्त स्वावलंबी होऊ इच्छिते नोकरीबरोबर उद्योग, व्यापार क्षेत्रातही ती आपले कर्तृत्व दाखवत आहे. अगदी घरात राहणारी स्त्रीसुद्धा आपल्या फुरसतीच्या काळात काही ना काही काम करून अर्थार्जन करते. एकेकाळी स्वयंपाकाची कामे करते, मुले सांभाळणे ही कामे कमी प्रतिची मानली जात. पण बदलत्या काळानुसार आज 'पोळी भाजीचे केंद्र चालवणारी स्त्री स्वयपाकीण समजली जात नाही, तर उद्योजक मानली जाते' आणि 'पाळणाघर' चालवणे ही एक समाजसेवाच समजली जाते. आता ती स्त्री राहिली नाही तर तिने आपली क्षमता जाणली आहे.

कामाप्रमाणे स्त्रीने आपल्या पोशाखातही बदल केला आहे. राहणीमानात बदल केला आहे. पण तो आता कोणाला खटकत नाही. साडीपेक्षा, सलवार कुर्ता व टॉप-जीन हे पोषाख तिला अधिक सुटसुटीत व सोयीचे वाटतात. आजची स्त्री आपल्या स्वास्थाविषयी जागरूक आहे. त्यासाठी आपले शरीर तंदुरूस्त ठेवण्यासाठी योग वर्गात जाताना दिसते आहे. आजच्या छोट्या कुटुंबात मुलगा व मुलगी यांच्या संगोपानात फरक केला जात नाही. शहरातील हा आधुनिक विचार हळूहळू खेड्यापाड्यातही झिरपत आहे.

आजच्या युगातील स्त्री ही विचारी आहे. ती काळानुसार बदलू पाहत आहे. गेल्या शतकातील स्त्री आणि आजची स्त्री यात खूप बदल झाला आहे. आजच्या स्त्रीचा मार्ग विकासाकडे व प्रगतीकडे वाटचाल करू लागला आहे.

# "क" पासून Amazing Marathi

✍..... **सुमित विनायक रांगणेकर** (बी.कॉम.भाग-२)

जगातल्या कोणत्याही इतर भाषेत अशी ताकद नाही? ती मराठी भाषेत ताकद आहे? आणखी काहीच दिवसात मराठी भाषा पूर्ण जगावर राज्य करेल आणि लवकरच भगवे झेंडे फडकतील? ही मराठी भाषा खालील लेखात पहा.

केव्हातरी कोल्हापूरच्या कर्तव्यतत्पर केळकर काकांबद्दल काकांच्या कचेरीतल्या केशवने काकूंसमोर कागाळी केली. काकू कावल्या. काका काकूंनी कपाटातून कात्री काढून काकांच्या कामाचे कोरे करकरीत कागद कचाकचा कापले. काकांचे कापलेले कागद केशवनेच कचऱ्यात कोंबून काकांच्याच किचनमध्ये 'कजरारे-कजरारे' कवितेवर कोळीनृत्य केले.

काकूंनी कागद कापल्याचे कळताच काका कळवळले. काकांनीही कमालच केली. काकांनी कांकूंचे काळे कुळकुळीत केस कात्रीने कराकरा कापले. काका काय करताहेत काकूंना कळेनाच ! काकूंनी कर्कशश किंचाळून कलकलाट केला. काका-काकूंची कसली काळजी करणार ! काकांना कामाची काळजी. काकूंच्या कर्णकर्कश्श केला, केशवाने कचऱ्यात कोंबलेले कागदाचे कपटेन कपटे काढून काकांनी कचेरीकडे कूच केली. कचेरीच्या कामासाठी काकांनी कंबर कसली. कागदाच्या कापलेल्या कपट्यांचे काकांनी 'कोलाज' करुन कामकाज कार्यान्वयीत केले. केशवाचे कारनामे कळताच काकांनी काट्यानेच काटा काढला. काकांनी केशवालाच कोलाजचे काम करण्यासाठी कुथवला.

कपटी केशवने काकांवरच कामचुकारपणाचा कांगावा करून कामाचा कंटाळा केला. काकांनी कठोरपणे केशवाला कामावरून काढले. कासावीस काकूंनी कालच्या कडू कारल्याची कोशिंबीर कटाप करुन काकांसाठी कच्च्या कैरीचे कोय काढून कालवण केले. काकांनीही करूणेने काकूंचे कृत्रिम केस कुरवाळले. केळकरांच्या 'कोकणस्थ' कुटुंबातील कर्तव्यापुढे कर्मकांड केव्हाही कनिष्ठच. कर्तव्यदक्ष काकांच्या कार्यकाळात कचेरीने कर्मरुपी किल्ल्याचे किर्तीशिखर काबीज केले. कामावरुन काढलेल्या केशवाने कितीतरी काबाड कष्ट काढल्यावर कोल्हापूरच्या कॉम्रेड कणेकर कॉलेजने केशवाला कबड्डीचा कर्णधार केला. क्रीडापटू केशवाने कबड्डीतच करिअर केले. कालच्या कागाळीखोर केशवाला काळानेच केला कबड्डीतल्या किचकर कसरतीचां कर्ता.

कथासार - *क्रियेविणा करिता कथन,*
*किंवा कोरडेची कीर्तन,*
*कितीक किताब कष्ट विण काय कामाचे...*

खरंच अभिमान वाटतो, मी मराठी असल्याचा !

*जय शिवराय, जय महाराष्ट्र ।*

# ये मेरे वतन के लोगो

..... महेश मनोज माने
(बी.कॉम. भाग-२)

माझी लहानपासूनच आर्मी जॉईन करण्याची खूप इच्छा आहे. माझे वडीलसुद्धा आर्मीतच आहेत. हा वारसा मला तसाच जपून ठेवायचा आहे. मला आर्मीत जाण्यासाठी अजून एक गोष्ट खेचते ती म्हणजे दिवसरात्र आपल्या देशाची सेवा करणारे सैनिक. मला देखील आपल्या देशाची सेवा करण्याची खूप इच्छा आहे.

आजकाल सर्व विद्यार्थ्यांचा कल हा इतर क्षेत्रात आढळतो पण मला त्यांना आपल्या या इंडियन आर्मी विषयी दोन शब्दात सांगायचं आहे. त्यामुळे ते प्रेरीत होतील.

भारतीय भूसेना ही भारतातील सर्वात मोठी सशस्त्र सेना आहे. यात सध्या १३२५००० सैनिक हे सेवेवर रूजू आहेत. तर ११५५००० सैनिक हे विशेष राखीव दलात आहेत आणि म्हणूनच इंडियन आर्मी ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी स्थलसेना आहे आणि याचे उद्दिष्अ आहे, देशात शांतता प्रस्थापित करणे आणि बाहेरील धोक्यांपासून देशाचे संरक्षण करणे. याशिवाय नैसर्गिक आपत्तीमध्ये पहिली मदत ही इंडियन आर्मी कडूनच मिळते. देशाचा राष्ट्रपती हा आपल्या सैन्यदलाचा कमांडर इन चिफ असतो. याशिवाय चिफ ऑफ आर्मी, जनरल हे सैन्यदलाचे नेतृत्व करतात.

या इंडियन आर्मीची स्थापना भारत स्वतंत्र झाल्यावर म्हणजेच १९४७ साली झाली. त्यानंतर आजपर्यंत इंडियन आर्मी ने पाकिस्तान विरूद्धच्या चार युद्धात आणि चायना विरूद्धच्या एका युद्धात अत्यंत उल्लेखनिय कामगिरी केली आहे. याशिवाय ऑपरेशन मेघदूत, ऑपरेशन विजय, ऑपरेशन कॅक्टस अशा अनेक कामगिरी त्यांनी गाजवल्या आहेत. अगदी नुकत्याच झालेल्या २६/११ च्या मुंबई हल्ल्यातही इंडियन आर्मीच्या जवानांनी पराक्रमी कामगिरी करून दशहतवाद्यांना ठार केले आहे. इंडियन आर्मीमध्ये सध्या प्रामुख्याने गार्डस, पॅराशूट, मेकॅनाईज्ड इन्फॉरटरी, पंजाब, मद्रास, ग्रेनडिअर्स, मराठा लाईट इन्फंट्री, रजपूत, जाट शीख, आसाम, बिहार, महार, पॅरा स्पेशीअल फोर्स (कमांडो) इत्यादी अनेक दले कार्यरत आहेत. याशिवाय अरूणाचल प्रदेश आणि हिमाचल प्रदेश या दलाची उभारणी चालू आहे.

सध्या जनरल दलबीर सिंह सुहाग हे इंडियन आर्मीचे चिफ म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय फिल्ड मार्शल करिआप्पा आणि फिल्ड मार्शल माणेकशॉ हे आर्मीचे कमांडर म्हणून कार्यरत आहेत.

इंडियन आर्मी ही भारताची शान आहे. २६/११ च्या हल्ल्यापासून ते कॉमनवेल्थचा पडलेला पूल बांधण्यापर्यंत सर्व क्षेत्रात भारताला इंडियन आर्मीचीच मदत लागली आहे. इंडियन आर्मी हा आपल्या देशाचा अविभाज्य घटक आहे. थरार, ॲडव्हेंचर्स फक्त या शब्दातच आपण त्यांना मांडू शकतो. आपण आज जे आनंदाने जगत आहोत. ते केवळ यांच्यामुळेच आपण व्यवस्थित झोपू शकतो कारण ते तिकडे सीमेवर जागे राहून आपले आणि आपल्या देशाचे संरक्षण करत आहेत.

परंतु, सध्या इंडियन आर्मीकडे वळणाऱ्या तरुणवर्गाची संख्या कमी होत चालली आहे. इंजिनियर, डॉक्टर होऊन तरूण बक्कळ पैशाच्या पाठीमागे धावत परदेशी नोकऱ्यांच्या आमिषाला बळी पडत आहेत. त्यांना आपल्या कर्तव्याचा विसर पडत आहे. आपण ज्या देशात जन्मलो त्या भूमीचा आपण मान राखला पाहिजे आणि म्हणूनच माझे सर्व तरुणांना आव्हान आहे की जागे व्हा. कर्तव्याला जागा, आपल्या देशासाठी काहीतरी करून दाखविण्याची याहून मोठी संधी कोणती असेल? आणि आपल्या पालकांसाठी, मित्रांसाठी, समाजासाठी, देशासाठी याहून अभिमानास्पद गोष्ट कोणती असू शकेल?

*'जमाने भर में मिलते है आशिक कई,*
*मगर वतन से खूबसूरत कोई सनम नही,*
*नोटो मे भी लिपट कर, सोने मे सिमटकर मरे है कई,*
*मगर तिरंगे से खूबसूरत कोई कफन नही'*

भारतीय प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी त्याचबरोबर स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट या दिवशी अनेक भक्तिपर गीते आवर्जून ऐकायला मिळतात. अभिमानाने मान उंचावते खरी, पण डोळ्यात

पाणी आणायला लावणारं हे गीत -

*'ऐ मेरे वतन के लोगों, जरा आँख में भरलो पानी*
*जो शहीद हुए है उनकी, जरा याद करो कुर्बानी'*

मित्रांनो, त्यांची कुर्बानी आठवायला खरं तर १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीची वाट बघायला नको. सीमा भागात जगार करत असणाऱ्या या सैनिकांमुळे आपला रोजचा दिवस निर्धास्तपणे उगवत असतो. हे आपण विसरता कामा नये. या सैनिकांनी आपल्यासाठी काय केलं आठवून तर पाहा.

*'जब घायल हुवा हिमायल, खतरे में पडी आजादी*
*जब तक थी सांस लडे वो, फिर अपनी लाश बिछादी*
*संगीन पर धरकर, माथा सो गए अमर बलिदानी*
*जो शहीद हुवे है उनकी जरा याद करो कुर्बानी'*

थेट हिमालयावर झालेला हल्ला यांनी छातीचा हिमालय करून झेलला. अंतिम श्वासापर्यंत फक्त झुंजले. हार मानली ती फक्त मृत्युपुढे. जीवावर उदार होवून हे शूरवीर आपल्यासाठी लढत राहिले.

*'जब देश में थी दिवाली, वो खेल रहे थे होली*
*जब हम बैठे थे घरों में, वो झेल रहे थे गोली*
*थे धन्य जवान वो अपने, थी धन्य वो उनकी जवानी'*

फटाक्यांची आतषबाजी, फराळांची रेलचेल आणि आनंद, उत्साह उतू जात असतात. एक क्षण तरी विचार केला तरी हा आनंद आपण निर्धोकपणे अनुभवत असताना आपल्या सुरक्षेसाठी काही अनामिक शत्रूशी युद्ध करत असतात. आपण पाय पसरून फास्ट फूड घेवून टी.व्ही. बघत केवळ चुकचुकत बसतो. हे शूरवीर प्रत्यक्ष रणसंग्रामात गोळी झेलत असतात. हा विरोधाभास थांबवू या, आदर या त्या प्रत्येक अनामवीरांचा आठवूया त्यांची वीरगाथा.

*'कोई सखी, कोई जाट, मराठी कोई गुरखा कोई मद्रासी*
*सरहदपे मरनेवाला हर वीर या भारतवासी*
*जो खून गीरा परबत पे वो खून था हिंदुस्थानी...'*

एकविसाव्या शतकाचं एक शतक ओलांडूनही आपण जाती धर्मांच्या विळख्यातून स्वत:ला सोडवून घेत नाही. पण सीमेवर लढणारा जवान मी मराठा, मी शीख म्हणून लढत नाही. मी हिंदुस्थानी म्हणून लढतो. चाल करून येणारा शत्रू कुठल्याही धर्मावर चाल करून येत नाही. हिंदुस्थानावर चाल करतो. मृत्यूसुद्धा कुठल्या विशिष्ट धर्माच्या सैनिकाला लक्ष करत नाही. प्राणाप्रमाणे लढणारा भारतीय सैनिक धारातीर्थी पडतो तेही भारतीय म्हणूनच

*'थी खून से लथपथ काया, फिर भी बंदूक उठाके*
*दसदस को एक ने मारा, फिर गिर गए होश गवाके*
*जब अंत समय आया तो, कह गए हम मरते है*
*खुश रहना देश के प्यारो, अब हम तो सफर करते है*
*क्या लोक थे वो दीवाने, क्या लोग ए वो अभिमानी*
*जो शहिद हुए...'*

रक्तानं माखलेलं शरीर आणि अपराजीत इच्छाशक्ती याचं प्रतिक म्हणजे भारतीय सैनिक. इतक्या प्रचंड जखमांचा बाऊ न करता त्वेषाने बंदूक घेऊन शत्रूवर धावून जाणारा तोच भारतीय सैनिक मी मरेन, पण दहा जणांना लोळवूनच ही विजीगुषी वृत्ती घेऊन लढणारा आपला भारतीय जवान शेवटच्या क्षणापर्यंत लढत राहतो. देशवासीयांच्या रक्षणासाठी कोणत्या शब्दात वर्णावी ही वीरपराक्रमी वृत्ती? किमान त्यांची स्मृती तरी जपायला हवी.

*'तुम भूल ना जाओ उनको*
*इसलिए कही ये कहानी*
*जो शहिद हुए है उनकी*
*जरा याद करो कुर्बानी...*
*जयहिंद ! जयहिंद !'*

पुन्हा एकदा कळवळून विनंती त्या अनाम बलिदान आठवण्यासाठी, आपल्या देशाचा अभिमान बाळगण्यासाठी स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन अशी निमित्तांची वाट पाहू नका. नावागावाने आपल्याला संपूर्णत: अनोळखी असणारे हे जवान भारतीय म्हणून परिचयाचे असतात. विशिष्ट दिवशी त्यांच्यासाठी आसावे गाळू नका. त्यांच्या कार्याचा आपलय हृदयात आयुष्यभर अभिमान जपू या.

*सारे जहाँ से अच्छा, हिंदुस्था हमारा ।*

*जयहिंद !*

# आयुष्यातील खरी कमाई

✍..... संतोष बोरगांवी
(बी.कॉम.भाग-२)

एक आंधळा भिकारी रस्त्यावर एका बाजूला बसलेला. त्याच्याकडे कोणाचेही लक्ष नाही. तो एवढा दरिद्री आहे की त्याला अश्रू देखील महाग झालेत. गेली कित्येक वर्षे तो रडलेला नाही. एक लेखक पूर्णपणे दिवाळं वाजलेला. खिशात दमडीदेखील नाही आणि फिरायला बाहेर पडतो. त्याची नजर त्या भिकाऱ्याकडे आणि त्याच्या त्या करूण अवस्थेकडे जाते. त्या भिकाऱ्याच्या बाजूला एक पाटी आणि दोन-तीन खडू पडलेले.

हा लेखक त्या भिकाऱ्याकडे जातो आणि म्हणतो, 'मित्रा, मी एक लेखक आहे, ज्याच्याकडे एक पै देखील नाही, पण माझ्याकडे कला आहे. माझ्याकडे शब्दांची शक्ती आहे. ती मी तुला देऊ शकतो. तुझ्या परवानगीने मी या पाटीवर काही लिहू का?'

'साहेब', भिकारी म्हणतो.

माझ्याशी कुणी बोलतदेखील नाही. मी एक गरीब आंधळा भिकारी. तुम्हाला त्या पाटीचं जे ठीक वाटतं ते करा. तो लेखक त्या पाटीवर काहीतरी लिहून निघून जातो. त्या क्षणापासून भिकाऱ्याच्या लक्षात येते की, एकदम जाणाऱ्या-येणाऱ्यापैकी प्रत्येकजण थांबून त्याच्या पुढ्यात पैसे टाकू लागलाय. थोड्याच वेळाने तिथे पैशाची रास जमते. तो भिकारी बेचैन होतो. नाण्यांची रास वाढतच जाते. तो एवढा अस्वस्थ होतो की पैसे टाकणाऱ्यापैकी एकाचा हात पकडतो आणि म्हणतो, 'साहेब माफ करा तुमचा हात पकडल्याबद्दल. मी एक गरीब आंधळा भिकारी आहे. मला कृपा करून जर या पाटीवर काय लिहिलय ते वाचून दाखवलेत तर फार उपकार होतील हो.'

तो माणूस पाटी उचलतो आणि वाचायला लागतो.

**'वसंत ऋतू म्हणजे बहरलेली सृष्टी**
**आणि माझ्या नशिबी हरवलेली दृष्टी.'**

भिकाऱ्याच्या गालावरून अश्रू ओघळायला लागतात.

आयुष्य कुणी जास्त जाणलं ?

त्या ओळी वाचून पैसे टाकणाऱ्या लोकांनी ? त्या ओळी लिहिणाऱ्या लेखकानं ? की इतक्या वर्षांनी रडणाऱ्या त्या भिकाऱ्यानं?

तुमचे डोळे चांगले असतील तर तुम्ही जगाच्या प्रेमात पडाल पण जर तुमची वाणी गोड असेल तर हे जग तुमच्या प्रेमात पडेल.

माणसाला बोलायल शिकण्यास किमान दोन वर्षे लागतात, पण काय बोलावे ? हे शिकण्यास पूर्ण आयुष्य निघून जाते.

**सुख म्हणजे काय ?**
हे दुसऱ्याच्या हास्यात शोधल्याशिवाय कळत नाही.

**जबाबदारी म्हणजे काय ?**
हे ती उचलल्याशिवाय कळत नाही.

**काळ म्हणजे काय ?**
हे तो निसटून गेल्याशिवाय कळत नाही.

मला माणसे जोडायला आवडतात, माणसांशी नाती जोडायला आवडतात. जोडलेली नाती जपायला आवडतात, कारण माझा विश्वास आहे की, माझ्यानंतर मी कमावलेली संपत्ती मी बरोबर घेऊन जाणार नाही. परंतु मी जोडलेल्या माझ्या माणसांच्या डोळ्यांतील अश्रूचा एक थेंब हाच माझ्याकरिता लाखमोलाचा दागिना आणि हीच माझी आयुष्यातील खरी कमाई असेल.

# कॉलेज लाईफ

✍..... अभिजित शिवाजी कांबळे
(बी.ए.भाग-३)

किती सुंदर असतं ना हे जीवन ? म्हणतातच ना की, जीवनाचे सारं आनंद मिळण्यासाठी कॉलेजला गेलं पाहिजे. पण ह्या जीवनात आनंद तर असतोच पण तितकेच दुःखही. सारं काही मिळतं या जीवनात. आनंद, दुःख, चांगले-वाईट, अनुभव, नवनवीन मित्र-मैत्रिणी, शत्रू, आदर्श आणि बरंच काही.

कॉलेजमध्ये येताना कुणी खरंच शिकण्यासाठी येत असतो तर कुणी असंच... आई-बाबांच्या जीवावर कुणी जगत असतो. हट्टानं नवीन स्मार्ट फोन मागून घेतो आणि हळूहळू त्यात महागड्या कपड्यांची, गाडीची आणि बऱ्याच चैनीच्या वस्तूंची भर पडत जाते आणि ह्यांचा रुबाब कॉलेजमध्ये... लेक्चर्स मुद्दाम मीस करणं, कॅन्टीनमध्ये पडीक राहणं, व्हरांड्यातून चकरा मारणं, कोणी लाईन देतं का पाहणं वगैरे वगैरे... आणि हे सारं ग्रुप करुनच हिंडत करणं. कारण एकट्यामध्ये एवढा दम असतो तरी कुठं? त्यात आणि एकटा दुसऱ्या संगं नाही आला तर मैत्रीचा लिलावच! कधी तरी सेमीनारला, प्रॅक्टीकलला वर्ग कसला तो बघायचा... त्यांच्या डिक्शनरीत अभ्यास नावाचा शब्दच नसतो मुळी. अशी ही ह्यांची कॉलेज लाईफ

पण काही सिन्सिअरही असतात, जे खरंच शिकण्यासाठी येतात. शिक्षकांना आदर्श मानून एकही लेक्चर न चुकवता सर्व काही समजावून आदर्श मानून एकही लेक्चर न चुकवता सर्वकाही समजावून घेण्याच्या प्रयत्नात असतात. कॉलेज मधल्या सर्व कार्यक्रमात हिरीरीनं सहभागही घेतात, एखादा टॉपिक समजावून घेण्यासाठी शिक्षकांच्या इतक्या पाठी लागतात की, त्यांनाही वाटत असावं, किती पिडतोय? कारण तसे असतातही काही शिक्षक, पण काही खरोखर सिन्सिअर वाटणाऱ्या विद्यार्थ्याला आत्मियतेने मार्गदर्शन करतात आणि हीच मुलं नेहमी पुढं असतात.

कॉलेज जीवन म्हटलं तर हे वय वयात येण्याचं. प्रत्येक जण आकर्षक दिसण्याच्या प्रयत्नात असतो. आपल्या वागण्या-बोलण्या-चालण्यातून इतरांवर आपली छाप टाकण्याच्या प्रयत्नात असतो. प्रत्येकाचीच समज असते, आपलं काहीतरी स्थान आहे. म्हणजे इमेज आहे. म्हणून कुणी जर आपल्या विरूद्ध एखादी कमेंट मारली विशेषतः मुलींसमोर तर सवाल इमेजचा... मग काय? जागतिक महायुद्ध समून एखादा भांडणाचा खेळच...!

आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे प्रेम. अधिकार सगळ्यांनाच असतो. प्रेम करण्याचा ! पण हे सगळ्यांनाच माहिती नसतं. आपल्या श्रीमंती, मिजास आणि ऐटीवरून कोणी भूरळ पाडण्याच्या प्रयत्नात असतो आणि त्यालाच उत्तम प्रतिसादही मिळतो. एखादा गरीब बिचारा आशेवरच. कसेतरी समोरील व्यक्तीस मनातील खरी भावना सांगायला गेलं तर पदरी दुःखच पडतं, प्रसंगी त्याला मारहानही सहन करावी लागते. कारण तो कॉलेज करत असतो ते एखादा पार्टटाईम जॉब करत स्वःताचे कुटुंबही कधी-कधी हाच चालवत असतो. पण श्रीमंत घरच्या मुलांकडील संख्या पहायला गेलं तर... दोन काय अन् चार काय... हे तर त्यांना एखाद्या स्मार्ट फोनमधील एखादी गेम खेळल्यासारखं वाटतं. कारण तितका पाठींबाही असतो. काहींच्या बाबतीत असं घडतं, एखादी मुलगी लाईन देणारा मुलगा प्रपोज कधी मारतो याची वटच पाहत असते. पण तसं होतच नाही. कारण मुळातच तो मुलगा असतो तर एखादा विनाकारण सुंदर दिसणाऱ्या व आवडणाऱ्या मुलीला पिडत असतो. पण ती आईबाबांच्या विश्वासावर फक्त शिकायलाच आलेली असते. मुली पण काही कमी नसतात. पण ह्या सर्वांच्यात काहीच यशस्वी होतात, जे लव्ह मॅरेज करतात. नाहीतर मुली आई-बाबा बघतील त्याच मुलाला पसंत करतात. थोडक्यात अरेंज मॅरेज आणि पोरं अशीच जॉब शोधत हिंडत राहतात. काहीजण आज कुणाला फाडायचं याच विचारात असतात. नुसत्या आयत्या पार्ट्या खाणं हेच याचं काम. थोडक्यात 'खोबरं तिकडं चांगभलं' आणि ज्युनिअर, सिनिअरच्या दुसऱ्या वर्षापर्यंत आपल्याच तंदरीत असले एकमेकांपासून दूर जाणार ह्या विचारानं एकत्र येतात. एकमेकांचे वाढदिवस साजरे करतात. एकमेकांची घरं पाहण्यासाठी जातात. सर्वांचे फोटोज, सेल्फीज पाहून आठवणी काढत बसतात. मधल्या सुट्टीत आपल्या आठवणी, फ्युचर प्लॅन्स शेअर करतात. कधी हळवे होतात आणि सर्व आनंद, दुःख, चांगले-वाईट अनुभव, बरेच मित्र-मैत्रिणी काही शत्रू आणि काही आदर्श मिळवून एकमेकांपासून दूर जातात.

# स्वार्थ

जग हे सारे जणू
स्वार्थानेच भरलेले
सगळे सोबत असून सुद्धा
एकांतात सोडून गेलेले
काही जुने तर काही नवे
चेहरे इथे भेटत राहती,
माणुसकीच्या नावाखाली
फायदा मात्र सगळेच घेती.
काही चांगल्या आठवणी
अत्तराच्या कुपीत ठेवल्या जपून,
काही आठवणी मात्र कारल्यासारख्या
खाल्यातरी ही मन घट्ट करून.
आयुष्याच्या वाटेवर
नुसत्या उरल्या आता आठवणी,
स्वार्थापायी कोणीच नाही
आता कुणाच्या मनी.
सगळा झालाय नुसता
स्वार्थाचा बाजार.
आता उरलाच नाही आहे
जगी कोणाला कुणाचा आधार.
मोह, माया, आधार, त्याग सगळ्या
आता फक्त बोलण्याच्या गोष्टी
स्वार्थ आणि स्वार्थच आता
फक्त उरला आहे जगती.

..... कु. तेजश्री तानाजी विचारे
(बी.एस्सी.भाग-३)

# धुंद संध्याकाळी

डोंगराला टेकलेले निळेशार आभाळ
डोंगरावर दाटलेली अपूर्व हिरवाई
इवली-इवलीशी दिसणारी झाडे
मध्येच दिसणारे पक्ष्यांचे थवे
शांत-हळूवार पुढे सरकणारे ढग
संध्याकाळची नीरव शांतता
पश्चिमेकडील अवीट लाली
चित्रविचित्र आकार घेतलेले ढग
कुतूहलाने आभाळाकडे पाहणारी झाडे
हळूहळू सरत जाणारी धुंद संध्याकाळ !

घरट्यांकडे धाव घेणारे पक्षी
घरट्यांत वाट पाहणारी पिले
घराकडे जाण्याची ओढ असणारे शेतकरी
रस्त्यावरून संथ धावणाऱ्या बैलगाड्या
बैलगाडीत भाऱ्यांवर बसलेली चिमुरडी
गडद होत असलेले वातावरण
दूरवर ऐकू येणारा डेअरीचा भोंगा
रातकिड्यांची वाढत जाणारी किर्रकिर्रऽऽ
असंख्य आवाजांनी भरलेला आसमंत
ऐकून मंद होतो अशा धूंद संध्याकाळी !

..... विकास शिवाजी मोरे
(बी.बी.ए..भाग-२)

# वाचव वसुंधरा

प्रगतीच्या नावाखाली कारखाने फार वाढले,
स्वार्थासाठी आम्ही झाडे-वेली तोडले.
प्रदूषण तयार करतधरतीवर जगतोय,
उद्या येणाऱ्या मरणाची आजच वाट बघतोय.
माणसाच्या छळापुढे गुदमरत आहे भूमी,
बिघडतोय समतोल इथं आयुष्य होतय कमी.
तिच्यावर जीवन आमचे अज्ञान का राहिला ?
धरतीपुत्रांनी जागे व्हा वाचवा वसुंधरा आईला.

..... अमेय पांडूरंग कांबळे
(१२ वी कला)

# लेक वाचवा

रंगही नाही गंधही नाही
लावण्या तरी दिसणार कसे ?
उमलण्या आधी त्या कळ्यांचे
रंग भविष्याचे कळणार कसे ?
समस्त जनहो तुम्ही सारे
बनून का अविचारी
करू नका भ्रूणहत्या त्यांच्या
जाऊ द्या त्यांना नाभीपासून
नभांतरी...
केलात कधी का विचार तुम्ही
कळी उमलण्या आधी खुडण्याचा,
सोसणार आहोत दुष्परिणाम त्यांचे
आपण केल्या दुष्कृत्याचा.
पाहिलेत का प्रमाण तुम्ही
महिला आणिक पुरूषांचे,
घालाल जर घाव मुळांवर
होईल का स्वप्न पुरे
जीवन साथी मिळवायचे
जीवन साथी मिळवायचे...!

✍..... पंकज जयवंत खवरे
(१२ वी कला)

# मैत्री

मैत्री असावी फुलासारखी,
सुगंध एकमेकांना देणारी.

मैत्री असावी दिव्यासारखी,
प्रकाश सगळ्यांना देणारी.

मैत्री असावी चंद्रासारखी,
शितलता प्रदान करणारी.

मैत्री असावी साखरे सारखी,
सगळ्याना गोडवा देणारी.

मैत्री असावी जवानासारखी,
जी मृत्यूनंतरही अमर राहणारी.

✍..... नामदेव एस. कांबळे
(बी.ए.भाग-३)

# निरोप घेताना

खरच, त्या गर्दीत स्वार्थाच्या.
आपलंस कुणी भेटलच नाही
माझ्या दु:खाचं ओझं,
कुठं हलकं झालच नाही.
म्हणून मला जगावसं वाटलं नाही.
कोपऱ्यात बसून रडताना,
कुणाचा हात, अश्रू पुसायला पुढं आलाच नाही.
एकटा लढताना काळोखाशी,
सोबत कधी कुणाची मिळालीच नाही.
म्हणून मला जगावसं वाटलं नाही.
मिळेल कधी 'सुख' या प्रतिक्षेत ?
हे दु:ख कधी विरलच नाही,
चालताना ती वाट काटेरी
ती वाट शेवटास गेलीच नाही.
म्हणून मला जगावसं वाटलं नाही.
कोरताना ते शिल्प जन्माचे
आकार कोणता आलाच नाही,
म्हणे, जगणं खूप सुंदर असतं
पण मृत्यूबद्दल कुणी काही सांगितलं नाही.
म्हणून मला जगावसं वाटलं नाही.
शोधताना तो देव देवळात
माणसात देखील उरला नाही,
देऊळ तर होतं 'बंद'
देव तिथेही राहीला नाही.
म्हणून मला जगासवं वाटलं नाही.
मनाच्या आणि डोक्याच्या भांडणात
हे मन कधीही जिंकलं नाही
हरलेल्या त्या मनात आता
जगण्याची आसच उरली नाही
म्हणूनच मला जगावसं वाटलं नाही...!

✍..... बाजीराव रामचंद्र दळवी
(बी.एस्सी.भाग-३)

# आजचे युग अंधाराचे

खरंच काहीतरी व्हायला पाहिजे
अंधाराचे युग संपायला पाहिजे
गरीब आणि श्रीमंत
यातील ही तफावत
युगायुगाची अभेद्य भिंत
कोणीतरी फोडली पाहिजे.
मदिरेचे पेले कलंडलेच पाहिजे.
द्रौपदीचे वस्त्रहरण थांबले पाहिजे
झोपडीत वाढणाऱ्या अश्वत्थाम्याला
दुधाचा पेला मिळालाच पाहिजे.
खरंच, काहीतरी व्हायला पाहिजे
सरस्वतीच्या आगमनासाठी
चारही कवाडे उघडली पाहिजेत.
एकलव्याला न्याय मिळालाच पाहिजे.
लक्ष्मी मात्र राजमार्गानेच आली पाहिजे.
खरंच काहीतरी व्हायला पाहिजे
तुला आहे, मला नाही,
हे सारं थांबलं पाहिजे
खरंच काहीतरी व्हायला पाहिजे.

✍..... अंकिता सदानंद दिवटे
(बी.एस्सी.भाग-१)

# जीवनाचा खेळ

जीवन भावनाचा खेळ
प्रत्येकाला खेळावाच लागतो,
कोणी सुरळीत खेळतो
कोणी आडखळतो,
कोणी पुढे जातो,
कोणी मागे पडतो,
कोणी सुखात लोळतो
कोणी दुःखात घुसमटतो.
कोणी नाव करतो,
कोणी बदनाम होतो.
कोणी मरून मातीत मिसळतो,
कोणी मरून सुद्धा अमर होतो.

✍..... कु. प्रांजली बी. रावण (बी.कॉम.भाग-३)

# आई

आई ग आई विश्वाची तू दायी
वंदन मी करतो ठायी ठायी
वात्सल्य सिंधू प्रेमाचा तो बिंदू
सर्व श्रेष्ठ दयाळू आई माझी
मायेचा पाझर इथे आहे थोर
सकल विश्वात थोर माझी आई
निष्काम भक्ती दिव्य अशी शक्ती
असे जे ठिकाण माऊली माझी
नानाविध कला मायेचाच लढा
आढळेल माझ्या आई जवळी
नाजूक हात अंगाई गात
उचलूनी घेई मज कडेवरी
माझे बालपण जन्माची घडण
वळण तया लावी महान ही आई
प्रेमाचा हा पेला तया न मोबदला
ऋणमुक्त होण्या काही नच जवळी
शांतीचा सागर गुणांचा आगर
असे जे ठिकाण माझी आई
दोन अक्षर आई आ म्हणजे आत्मा
ई म्हणजे ईश्वर दोन अक्षरे आई
आई विना भिकारी स्वामी तिन्ही जगाचा

✍..... कु. सुनिता राजाराम जाधव (बी.कॉम.भाग-३)

# झोप

झोप म्हणजे नेमकं काय असतं,
कोणी कधी जाणलय का ?
कोणाला याचं उत्तर मिळालय का ?
डोळ्यांना स्वप्नाची लागलेली चाहूल,
की काळोख्यात नाण्याची ओढ.
मनातील सुंदर भावना
की मनातील दडपण,
हृदयातील धडधड की,
डोक्यातील विचार.
झोप म्हणजे शत्रू की,
जिवलग मैत्रीण
हे कोणी जाणलंय का?

✍..... कु. प्रियांका शिंदे (बी.ए.भाग-२)

## पाऊस

वर्षभर कष्ट करून त्याची
वाट बघत बसतो.
सर्वांना आपल्या येण्याची
हूरहूर लावून जातो.
कोणाच्यातरी डोळ्यातले स्वप्न
कोणाच्यातरी ओठावरचे पाणी तो बनतो.
क्षणात हसू तर,
क्षणात रडू असा तो असतो.
वर्षभर कष्ट करून त्याची
वाट बघत बसतो.
येण्याआधी गरजतो
आणि आल्यावर बरसतो, असा तो असतो
नाही आला तर दुष्काळ
आणि आला तर महाप्रलय असाही तो असतो,
वर्षभर कष्ट करून
त्याची वाट बघत बसतो,
तो दुसरा कोणीही नसून आपला पाऊस असतो...

..... **वैष्णवी विवेक जोशी** (बी.एस्सी.भाग-२)

## अंधार

गर्भात करुनी हत्या
डॉक्टर पापाचा धनी
नको म्हणे मुलगी
तेच मायबाप खुनी
फुलण्या आधी का ?
तोडली तुम्ही कळी
व्यर्थ झाले संगोपन
इथं अपराधीच माळी
जगी जन्मली नाही कन्या
तिचे महत्व उशिरा कळणार
आपल्या वंशाच्या दिव्याला
सांगा पत्नी कोठे मिळणार ?
हुंड्यासाठी छळवाद
स्वार्थामुळे नडेल
दिवा असून घरो-घरी
उद्या अंधारच पडेल.

..... **अमेय पांडूरंग कांबळे** (१२ वी कला)

## विश्वास

देवासमोर उभा होतो,
हताश मी हात जोडून
डोळ्यामध्ये पाणी होते
मनातून गेलो होतो पूर्ण मोडून...
मी म्हणालो,
देवा काय करू कळत नाही
प्रश्नाचं उत्तर मिळत नाही
देव म्हणाला, 'विश्वास ठेव.'
आज असं वास्तव आहे
जिथे आशेचा किरण नाही
उद्या काही छान असेल,
असा आजचा क्षण नाही.
